# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

(नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. महासभा दि. ११/१२/२०१३<br>मा. महासभा इतिवृत्तांत दि. १५/१०/२०१३<br>मा. महासभा सूचना क्र. ०८ दि. ०२/१२/२०१३ |
|---|---|

प्रकरण क्र. ५७ ते ५८ पर्यंत

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

८

१३/१४

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ १८९ /२०१३-१४ दिनांक :- ३० /०१ /२०१४.

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा बुधवार दि. ११/१२/२०१३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने पुरक घोषणा क्र. ८० ते ८२ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **मंगळवार, दिनांक ११/०२/२०१४ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या आदेशाने.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०२/१२/२०१३.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०८, दिनांक ०२/१२/२०१३.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ११/१२/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०८, दि. ०२/१२/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०८, दि. ०२/१२/२०१३ सोबतची विषय पत्रिका**

**सभा बुधवार दि. ११/१२/२०१३**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ५७ | दि. १९/१०/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – निरंक |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ५८ | मिरा भाईंदर शहरातील रहदारीच्या आणि मोक्याच्या ठिकाणी सुरक्षितता उपाययोजने कामी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणेकामी निर्णय घेणेबाबत. |
| ५९ | मिरा भाईंदर महानगर पालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये प्रायोगिक स्वरुपावर सेमी इंग्रजी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१४-१५ सुरु करणेबाबत. |
| ६० | विविध स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणेबाबत. |
| ६१ | मिरारोड व भाईंदर रेल्वे परिसर सुशोभिकरण करणे कामाबाबत निर्णय घेणे. |
| ६२ | मिरारोड येथील पार्कींग आरक्षण क्र. १८४ विकसित करणेबाबत निर्णय घेणे. |
| ६३ | राजीव आवास योजनेतंर्गत संक्रमण शिबिर बांधणे कामाच्या (पथदर्शी प्रकल्प) सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे |
| ६४ | राज्य शासनाचे आदिवासी विभागासाठी वसतीगृह बांधून देण्याबाबतचे आदिवासी विभागाच्या प्रस्तावावर निर्णय घेणे. |
| ६५ | मिरारोड व दहीसर स्टेशन दरम्यान नविन कल्वर्ट बांधणे कामाबाबत निर्णय घेणे. |
| ६६ | भाईंदर (प.) आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम विकसित करणेबाबत निर्णय घेणे. |
| ६७ | काशिमिरा नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज पूतळा परिसर सुशोभिकरण करणेबाबत निर्णय घेणे. |
| ६८ | उत्तन घनकचरा प्रकल्पाच्या जागेस कुंपणभिंत, संरक्षक भिंत बांधणे इ. कामाबाबत निर्णय घेणे. |
| ६९ | मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारती मध्ये आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व मा. पदाधिकाऱ्याकडे येणाऱ्या अभ्यांगताना बसण्याची व्यवस्था करणे, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व मा. पदाधिकारी दालनाचे नूतनीकरण करणे, आपतकालिन कक्ष, कॅटिन तयार करणे, मुख्यालय इमारतीची आवश्यक दुरुस्ती कामांबाबत निर्णय घेणे. |
| ७० | राजीव आवास योजनेतर्गत सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणे. |
| ७१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एनर्जी पार्क तथा सायंटीफीक प्ले पार्क विकसित करणेस धोरणात्मक मंजूरी देणेबाबत. |
| ७२ | छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करण्याबाबत निर्णय घेणे. |
| ७३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आरक्षण क्र. २३१ (मार्केट) व आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी सेंटर) विकसित करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| ७४ | पेणकर पाडा सर्व्हे क्र. १७३, २५९ येथे शासकीय जागेवर नविन बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे. |
| ७५ | घोडबंदर सर्व्हे क्र. २३३ येथील शासकीय जागेवर बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे. |
| ७६ | काशिमिरा येथे सर्व्हे क्र. १२३ (२४) (जकात नाका आरक्षण) या जागेवर बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा करणेस मान्यता देणे. |

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ७७ | उत्तन सर्व्हे क्र. ६५ व २५ मध्ये असलेल्या शेडचा वापर बस कार्यशाळेसाठी करण्याकरीता आवश्यक कामे करण्यास मान्यता देणे. |
| ७८ | उद्याने व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता आधुनिक पध्दतीने उद्याने विकसित करणेकामी लॅन्डस्केप आर्किटेक्चर प्लॅनरची नेमणुक करणेबाबत. |
| ७९ | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात पदनिर्मिती करणेबाबत निर्णय घेणे. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०२ डिसेंबर २०१३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ११/१२/२०१३ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **१९ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. २९/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये श्रीम. रिटा मॉटारो ह्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामामुळे त्या लगत असलेल्या इमारतीतील रहिवाश्यांना त्रास व व्यत्यय होत असल्याने सदर अनधिकृत बांधकाम तोडण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि. व इतर रहिवाश्यांनी दि. ०८/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३ व दि. २८/०२/२०१३ रोजी मा. आयुक्त व मा. उपायुक्त (मु.) ह्यांना भेटून दिली आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास सदर निवेदनानुसार अद्याप पर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) सदर इमारत अनधिकृत असल्याने ती तोडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२० श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारती संदर्भात महानगरपालिके विरुध्द दाखल केलेले सर्व दावे मा. न्यायालयाने फेटाळल्यानंतर मनपाच्या विधी अधिकारी यांनी सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावे असे निर्देश प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०३/२०१२ रोजी दिले आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास मनपाच्या विधी अधिकाऱ्यांच्या निर्देशनानुसार कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) निर्देशानुसार केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **२१ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारत झुकल्याने त्यापासून लगतच्या इमारतींना व त्यातील रहिवाश्यांना धोका निर्माण झाल्याने सदर झुकलेल्या इमारती व विकासका विरुध्द कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर ह्या गृहनिर्माण संस्थेने दि. ०७/१२/२०१२, दि. ०२/०१/२०१३ व लोकशाही दिन दि. ०४/०२/२०१३ व दि. ०७/०२/२०१३ मध्ये ठेवून ही अद्याप कारवाई झाली नाही हे खरे आहे काय? |
| अ) कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) त्या भागातील रहिवाश्यांना होणारा धोका दूर करण्या संदर्भात केव्हा कारवाई करणार? |
| **२२ सौ. तारा विनायक घरत मा. सदस्या यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| सद्याच्या प्रभाग क्र. १३ मध्ये असलेल्या विकास आराखड्यातील आरक्षणाबाबत.<br>१) मिरा भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात सद्या अस्तित्वात असलेल्या पालिका प्रभाग क्र. १३ च्या हद्दीत किती व कोणकोणती आरक्षणे आहेत? त्याचे क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक काय आहे? |
| अ) किती व कुठली आरक्षणे विकसीत झालेली आहेत? |
| ब) किती व कुठल्या आरक्षणांवर अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम झाले आहे? |
| क) आरक्षणातील कुठल्या अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम व बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई आजतागायत झाली आहे? |
| ड) किती व कोणती आरक्षणे किती टीडीआर देऊन घेतली आहेत? |
| इ) टीडीआर देऊन मिळालेली आरक्षणाची जागा पालिकेच्या ताब्यात आहे काय? का त्यावर अतिक्रमण झालेली आहेत? |
| **२३ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन मजली इमारत बांधली आहे. ती पाडणेसंदर्भात महापालिकेने केलेल्या कारवाईच्या विरोधात संबंधित मालकाने मा. न्यायालयात दावा क्र. स्पे.सीसुट १४/२०१२ व अपिल क्र.६१/२०१२ दाखल केले होते. ते दावा-अपिल फेटाळण्याने सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावी असे निर्देश महापालिका विधी अधिकारी ह्यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०६/२०१२ ने प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना दिले होते, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास ९ महिने कालावधी होऊनही अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |

| |
|---|
| ब) अनधिकृत इमारत पाडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२४ सौ. प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन माळ्यांची इमारत बांधल्याने त्या लगतच्या विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर गृहनिर्माण संस्था व इतर इमारतीतील फ्लॅट धारकांची हवा व उजेड बंद झाल्याने त्या त्रस्त झालेल्या फ्लॅटधारकांनी सदर अनधिकृत बांधलेली इमारत पाडण्यात यावी, अशी मागणी करणारी दि. १४/१२/२०१२, दि. ०२/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३, दि. २०/०२/२०१३, दि. २८/०२/२०१३ व २४/०३/२०१३ ची निवेदने मा. आयुक्त ह्यांना प्रत्यक्ष भेटूनं दिली आहेत, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, त्रस्त झालेल्या नागरीकांच्या निवेदनांवर अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२५ डॉ. रमेश धरमचंद जैन मा. सदस्य यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मोकळ्या जागेवरील कराची परिणामकारक वसुली होण्याच्या दृष्टीने कोणत्याही जमिन मालक / विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारीत बांधकाम मंजूरी, जोत्याचा दाखला, भोवगटा दाखला देण्यात येवू नये असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो. ह्यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मनपा/१४३/२००८-०९, दि. २२/१२/२००८ व आदेश क्र. मनपा/आयुक्त/२९४/२००९-१०, दि. २३/१२/२००९ ने नगररचना विभागास दिले होते हे खरे आहे का? |
| अ) असल्यास, दि. ०१/०४/२००८ ते दि. ३१/०३/२०१३ पर्यंत ह्या कालावधीमध्ये नगररचना विभागाने दिलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, ज्योत्याचा दाखला, भोगवटा दाखल ह्यांची तपशिलवार माहिती (मौजे, सर्व्हे क्र., विकासकाचे नाव, मंजुर बांधकाम क्षेत्र, मंजुरी आदेश / दिनांक व भरणा केलेल्या मोकळ्या जागेवरील कराची पावती क्र. व दिनांक) प्रत्येक वर्षवार मिळावी. |
| ब) मा. आयुक्त सो. ह्यांचे आदेश असताना मोकळ्या जागेवरील कराची पावती वसुली न केल्याने मनपाचे कोट्यावधी रुपयाचे आलेल्या नुकसानीस जबाबदार कोण आहे? |
| **२६ श्रीम. दिपिका पंकज अरोरा मा. सदस्या यांनी दि. १५/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) हमारे मिरा भाईंदर मे किटकनाशक छिडकाओ गाडी कितनी है? |
| अ) यह गाडी एक प्रभाग मे कितनी बार एक सप्ताह मे जानी चाहिए? |
| ब) अगर यह गाडी महिनों से खराब हो जाए तो हमारे पास दुसरी गाडी का बंदोबस्त है? |
| क) दुसरी गाडी न होने पर, क्या Alternative पध्दती है छिडकाओं की? |
| **२७ सौ. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. ०४/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. आयुक्त सो. तसेच सर्व विभागीय अधिकाऱ्यांना नगरसेवकांनी पाठविलेल्या तक्रारीबाबत तसेच कामाबाबतच्या पाठपुराव्या संदर्भात पत्रांची उत्तरे किती दिवसांत दिली जातात का? असल्यास किती दिवसात देणे अपेक्षित असते? |
| **२८ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २९/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) विभिन्न एजन्सीयो को पेमेन्ट नही करने पर अथवा किस कारण से ०.७५% yearly से अधिक किस किस एजन्सी को किस-किस साल मे कितना-कितना पेमेन्ट किया गया है, जानकारी दे। |
| अ) महानगरपालिका का कितना फंड किस-किस जगह पर कितना-कितना किस Interest रेट पर डिपोजिट है, उसकी जानकारी दी जाये। |

# मा. महासभा
# दि.१९/१०/२०१३
# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. १९/१०/२०१३**

आज शनिवार दि. १९/१०/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ६ दि. ०८/१०/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १५) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १६) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १७) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १८) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १९) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २०) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २१) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २२) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २३) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २७) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २८) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २९) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३०) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३१) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३२) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३३) | शरद केशव पाटील | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| ३४) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३५) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३६) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३७) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३८) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३९) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४०) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४१) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४२) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४३) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४४) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४५) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४७) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४८) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४९) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५०) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५१) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५२) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५३) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५४) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५६) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५७) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५८) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५९) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६०) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६१) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६५) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६६) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६७) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६८) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६९) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७१) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७२) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७४) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७५) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७६) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७७) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७८) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७९) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८०) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८१) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८३) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८४) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८५) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८६) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८७) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८८) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८९) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ९०) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ९१) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| २) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| ३) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ४) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| ५) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ६) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरिता उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत करीत आहे. सर्व सन्माननीय सदस्य, पत्रकार बंधू व शहरातील नागरीकांना येणाऱ्या दिवाळी सणानिमित्त हार्दीक शुभेच्छा. दिवाळी सर्वांसाठी सुखमय, आनंदमय व सुरक्षात्मक जावो. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. सचिवांनी सभेस सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

*मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १९/१०/२०१३ रोजी सकाळी ११.००* वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. ०८/१०/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. ११ वाजुन ३० मिनिटे झाली आहेत. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होते. पहिला प्रश्न लियाकत शेख ह्यांचा आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नमस्कार. मा. महापौरांच्या मान्यतेने मा. आयुक्त सुरेश काकाणी साहेब मसुरी येथे ट्रेनिंगसाठी गेले आहेत. २१ ऑक्टोबर ते १३ डिसेंबर ह्या कालावधीसाठी आयुक्त ह्या पदाचा कार्यभार मी काल संध्याकाळपासून स्विकारला आहे. धन्यवाद।

**लियाकत शेख :-**

मा. महापौर मॅडम, माझा प्रश्न असा होता. मालकी किंवा सरकारी जागेतून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने बांधलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक रस्त्यावर आता प्रश्न असा आहे की, सार्वजनिक रस्ता म्हणजे नेमका काय?

**विधी अधिकारी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलते. महाराष्ट्र म्युन्सिपल कॉर्पोरेशन ॲक्ट आणि एम.आर.टी.पी. ॲक्ट अंतर्गत जर आपण जमिन ॲक्वायर करुन जो आपण रस्ता घोषित करतो त्याला सार्वजनिक रस्ता म्हटले जाते.

**लियाकत शेख :-**

*मॅडम माझ्या माहितीप्रमाणे बी.पी.एम.सी. ॲक्ट सेक्शन ५२ सार्वजनिक रस्त्याची व्याख्या तिकडे स्पष्ट* केलेली आहे. नगरपालिकेच्या किंवा अन्य सार्वजनिक निधीच्या खर्चाने यापूर्वी समतोल करण्यात आलेला .परस बंदी करण्यात आलेला, खडी घालण्यात आलेला, पाणी वाहून जाण्याकरीता पाट काढण्यात आलेला, मलप्रणल खोदण्यात आलेला किंवा दुरुस्त करण्यात आलेला किंवा आणखी तीन चार आहेत. परंतू माझे असे म्हणणे आहे की, महानगरपालिकेच्या वतीने खर्च करुन बांधलेला रस्ता मग तो ॲक्वाझिशन असो किंवा नसो. त्याच्यात व्याख्या क्लियर कट आहे.

**विधी अधिकारी :-**

सर डेफिनेशनमध्ये तुम्ही वाचता सेक्शन ५२ सार्वजनिक रस्ता जरी जर असे तरी आपल्याला वी हॅव टू रीड द लो लॉग विथ द अदर सेक्शन. सर आपण २२४ कलम वाचल तर किंवा हा शब्द म्हटलेला आहे. *कूठलाही रस्ता कुठलीही जमिन ॲक्वायर केल्याशिवाय आपल्याला कूठल्याही प्रकारचा सार्वजनिक प्रयोजन* तिथे आरक्षीत करता येत नाही. ही कायद्यामध्ये प्रोव्हिजन आहे.

**लियाकत शेख :-**

तुम्ही ऑलरेडी सार्वजनिक रस्ता डिक्लेर करुन लोकांना पत्रही दिले आहेत त्याचे पत्र कुठे आहे.

**विधी अधिकारी :-**

सर, तुम्ही कोणत्याही केसबद्दल बोलता.

**लियाकत शेख :-**

मी पर्टीक्यूलर दोन केसबद्दल बोलतो. एक शिरे रस्ता आणि समाज मंदिर उत्तन, दर्या माता चर्चनी बांधलेला रस्ता मॅडम तुम्हाला पूर्ण केस माहित आहे.

**विधी अधिकारी :-**

तो जो विषय आहे चर्च ऑफ अवर लेडी वेलंकनी चर्च ते प्रकरण कोर्टामध्ये न्यायप्रविष्ठ आहे.

**लियाकत शेख :-**

ते न्यायप्रविष्ठ का झाले आपल्या एका चूकीमुळे. आपल्या प्रशासनाच्या चूकीमुळे सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले. उगाच त्यांना भूर्दंड येतो. आपल्या चूकीच्या नोटिसमुळे समोरचा कोर्टात जातो. तो स्टे घेतो आणि उगाच आपल्याला भूर्दंड येतो.

**विधी अधिकारी :-**

बांधकाम विभागामार्फत जी नोटिस देण्यात आलेली आहे. ते अनधिकृत बांधकाम आहे ते काढण्यासाठी दिलेले आहे.

**लियाकत शेख :-**

होय. पण अनधिकृत बांधकाम ते नोटिसच द्यायची गरज नव्हती. तुम्ही एक ठिकाणी म्हणता मा. आयुक्तांना तसा अधिकार आहे नोटिस न देता सेक्शन २३१ नुसार स्पष्ट म्हणता. मग असा अधिकार असताना तुम्ही त्याचा वापर का करत नाही? त्यांना नोटिस का देता? समोरच्यांना कोर्टात जाण्याची मूभा देतो का?

**विधी अधिकारी :-**

बांधकाम अनधिकृत असल्यामुळे अनधिकृत बांधकामाला कायद्यानुसार आधी नोटिस देणे बंधनकारक आहे.

**लियाकत शेख :-**

मॅडम मी अनधिकृत बांधकाम बोलत नाही. सार्वजनिक रस्त्यात केलेला अडथळा दूर करणेबाबत २३१ नुसार कारवाई करता. तो सार्वजनिक रस्ता आहे किंवा नाही. परंतू तुम्ही तसे पत्र २००२ साली दिले आहे की, सदरचा रस्ता सार्वजनिक रस्ता आहे. अशा परिस्थितीत मा. आयुक्तास नोटिस न देता २३१ खाली कारवाई करण्याचा अधिकार असताना त्यांना परस्पर संधी का देण्यात येते. आपल्या एका चुकीमुळे नाहक माणूस कोर्टात जातो आणि त्याचा त्रास समोरच्याला झाला म्युन्सिपाल्टीचा झाला.

**विधी अधिकारी :-**

सर विषयांकित प्रकरणे तुम्ही २००२ चे तत्कालिन सिटी इंजिनियरचे पत्र रिफर करता त्याच्यामध्ये त्यांनी विषयांकित रस्ता जो आहे तो सार्वजनिक स्वरुपातले असल्याचे पत्र दिले आहे. परंतु कायद्यातील तरतुदीनुसार ही सदरची जमिन ॲक्वायर केली गेली नाही. आपली जी प्रोसीजर आहे त्यानुसार ती जमिन सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करण्यात आलेली नाही.

**लियाकत शेख :-**

हे पत्र चुकीचे आहे का? तूमच्या इंजिनियरने दिलेल पत्र चूकीचे आहे का?

**विधी अधिकारी :-**

सर प्रोसिजर इज इम्पॉरटन्ट.

**लियाकत शेख :-**

बरोबर आहे. तुम्ही जर प्रोसिजर न करता तुम्ही पत्र देता आम्ही काय समजावे की, सदरचा रस्ता सार्वजनिक आहे. तुम्ही प्रोसिजर पूल अप करत नसाल तर त्याच्यात आमचा काय दोष.

**विधी अधिकारी :-**

त्यांनी जे पत्र दिलेले आहे. त्या पत्रानुसार कोणत्या बेसवर पत्र दिलेले आहे. ते सगळा रेकॉर्ड बघून सांगता येईल.

**लियाकत शेख :-**

मॅडम रेकॉर्ड बघण्यासाठी सात महिने झाले. १४/३ पासून हे प्रकरण चालू आहे. मी कितीतरी वेळा ह्या बाबतीत पाठपूरावा केला आहे. त्या विषयावर आता काय करणार?

**विधी अधिकारी :-**

तत्कालीन इंजिनियरने २००२ ला जे पत्र दिले आले आहे ते कोणत्या बेसवर दिले आहे त्याचा अभ्यास करावाच लागेल.

**लियाकत शेख :-**

ठिक आहे. ही पूर्वीची गोष्ट झाली पण ह्याच्यानंतर असे काही प्रकार घडू नये ह्याची दक्षता घेण्यात यावी अशी तुमच्याकडून अपेक्षा आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ठीक आहे. निश्चित काळजी घेण्यात येईल.

**लियाकत शेख :-**

धन्यवाद.

**नगरसचिव :-**

पूढचा प्रश्न श्री. मदन उदित नारायण सिंग ह्यांचा आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. आयुक्त साहेब, मी हा प्रश्न १८/०२/१३ ला विचारला होता. जसे आता पूढच्या प्रश्नात घडल की, लियाकत शेखनी विचारल ४/३ ला विचारलेला प्रश्न आतापर्यंत म्हणतात की ते बघावे लागेल किंवा अभ्यास करावा लागेल. सदर प्रश्न ७/८ महिन्यांपूर्वी विचारला गेला. पण ते प्रकरण किती वर्ष चालते. मी माझा प्रश्न १८/०२/१३ ला विचारला होता. त्यात उत्तर दिले की, सोबत यादी दिली आहे. पण मला तर कुठे सापडत नाही. यादी कुठे आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

पत्रासोबत यादी दिलेली आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

कोणाला दिली.

**सत्यवान धनेगावे :-**

आपल्याला दिली.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मला तर माहित नाही की मला दिली आहे. माझ्या हातात तर नाही. आता प्रश्न दिला त्याच्यात पण यादी नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

परत नव्याने यादी देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

यादी द्या मग त्या प्रश्नावर चर्चा करुया. उत्तराची माहिती असल्याशिवाय त्या प्रश्नावर चर्चा काय करणार.

**सत्यवान धनेगावे :-**

ह्याच्यात नाही. आपल्या प्रश्नाचे जे उत्तर दिले त्या पत्रासोबत यादी दिलेली आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मला मिळाली नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

परत नंतर देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मग हा प्रश्न पूढे ढकलायचा का?

**सत्यवान धनेगावे :-**

आपण चर्चा करा मी आपल्याला उत्तर देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

उत्तर मला माहितच नाही. मग चर्चा काय करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

आपल्या हातात जी कॉपी आहे त्यामध्ये पण उत्तर आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ह्या उत्तराचे काही मतलब नाही. त्या यादी शिवाय काहीच बोलता येणार नाही. प्रश्नांची संपूर्ण माहिती मिळाल्याशिवाय काय बोलणार.

**मा. महापौर :-**

आपके पोच का सिग्नेचर उनके पास है। आपको यादी मिला है।

**सत्यवान धनेगावे :-**

हे लेटर आमच्याकडे दिले आहे. यादी सोबतची त्याची पोच आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

हो सकता है दिया है पर मुझे मिला नही।

**मा. महापौर :-**

हो सकता है मत बोलो, आपका सिग्नेचर है उनके पास।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मेरे पास इस समय नहीं है।

**मा. महापौर:-**

आपने प्रश्न पूछा उसका उत्तर दिया है। उन्होंने यादी दिया है। अभी आप बोल रहे हो मेरे पास यादी नहीं है। तो अब मैं कैसे करु। आप कैसे करेंगे। वो कैसा वो प्रश्न थोडेही आगे ढकलेंगे।

**मदन उदितनारायण सिंग :-**

प्रश्न का उत्तर देते है, उसके साथ में आना चाहिए।

**मा. महापौर :-**

है ना उनके पास पोच है। आपने लाया नही उन्होंने दिया है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मुझे नहीं मिला।

**मा. महापौर :-**

तो आपका इधर सिग्नेचर कैसे है। रिसीव्हड कॉपी का सिग्नेचर है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

अभी आठ महिने के बाद आया।

**सत्यवान धनेगावे :-**

१८ मार्च २०१३ को दिया।

**मदन उदितनारायण सिंग :-**

कितना महिना हो गया।

**मा. महापौर :-**

उन्होंने आपको दिया तो है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मेरे पास नहीं मिला है।

**मा. महापौर :-**

आपका प्रश्न आ रहा है, आपको पता है। तो आपको उन्होंने यादी भेजा तो आपने घर पे रखा होगा।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मुझे नहीं मिला।

**मा. महापौर :-**

नही मिला ऐसा मत बोलो आपके पास बराबर रखा नही ऐसा बोलो। आपका इधर सिग्नेचर है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

सिग्नेचर होगा वह मार्च का है। सात महिना हो गया।

**मा. महापौर :-**

आपको जो क्वेशन है आप उनको पूछ लो।

**मदन उदितनारायण सिंग :-**

ठीक है। पहला प्रश्न मिरा भाईंदर विकास नियंत्रण नियमावली दि. १५/१०/२००० रोजी मंजूर झाली असून दि. २८/२/२००० ला नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून नियमावलीत किती आरक्षणे आहेत त्याचा तपशीलवार माहिती आपने बोला इसमें माहिती है। यह जो नियमावली मंजूर झाली आहे त्याची काही मुदत आहे का? किती वर्षाकरता.

**सत्यवान धनेगावे :-**

डेव्हलपमेन्ट प्लॅननुसार १४/५/९७ ला मंजूर होऊन १५/७/९७ ला अमलात आला आहे. ह्या डेव्हलपमेंट प्लान आणि डी.सी. रुलचा व्हॅलीडीटी २० वर्षाची आहे. म्हणजे जुलै १७ पर्यंत इफेक्टीव आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ह्याच्यात उत्तरमध्ये दिले आहे की, २००० मध्ये मंजूर झाले आणि फेरबदल २००९ झाले. जो फेरबदल २००९ झाला तो पण २०१७ पर्यंत असणार की, तो २०२९ पर्यंत जाणार.

**सत्यवान धनेगावे :-**

मूळात, जे मंजूर झाले आहे त्या डेटपासून २० वर्षांसाठी त्याची अंमलबजावणी असते.

**मदन उदितनारायण सिंग :-**

फेरबदल झाला असेल तरी पण.

**सत्यवान धनेगावे :-**

फेरबदल २०१७ पर्यंत आवश्यकतेप्रमाणे किंवा शासनाच्या निर्देशाप्रमाणे फेरबदल मंजूर होऊ शकतात.

**मदन उदितनारायण सिंग :-**

जे आरक्षण आपण ठरवल होत ते आपल्याला २० वर्षांच्या आतच करायचे असे ग्राह्य धरल जाईल.

**सत्यवान धनेगावे :-**

बरोबर.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आणि जर ते नाही झाले तर?

**सत्यवान धनेगावे :-**

२० वर्षांच्या अगोदर दोन वर्षापूर्वी डेव्हलपमेंट प्लॅन रिव्हीजनच प्रोसेस सुरु होते. नंतर डेव्हलपमेंट प्लॅन रिव्हीजन होते त्यामध्ये ते आरक्षण डेव्हलप झाले आहे ते आरक्षण डेव्हलप म्हणून दाखवतात आणि जे

डेव्हलप झाले नाहीत किंवा त्या आरक्षणाव्यतिरिक्त अन्य आरक्षण निघाले तर उपडिव्हीजन ऑफ डि.पी. मध्ये ती प्रोसेस सुरु होते.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ते बाद होणार नाही. त्वरीत कोणी अतिक्रमण करुन दुसरे काय केल असेल तर.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याबाबतची योग्य कारवाई होते अतिक्रमण विभाग आहे, प्रभाग अधिकारी आहे, महापालिका मुख्य कार्यालय आहे. जी काही प्रकरण असतील प्रत्येक केस टू केस कारवाई होत असते. असे जनरल उत्तर त्याच्यात देता येणार नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आजपर्यंत एखाद्या प्रकरणावर कारवाई झाली आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

कुठल्या आरक्षणाच्या बाबतीत आपण विचारता.

**मदन उदितनारायण सिंग :-**

जे आरक्षण आपण ॲक्वायर केल नाही. आपण ताब्यात घेतले नाही त्याचे डेव्हलपमेन्ट सुध्दा झाले नाही. कुणीतरी अतिक्रमण करुन दुसरे काही यूज केले त्याच्यावर कारवाई झाली आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षणाचे नाव द्या, डिटेल द्या. त्यानुसार मला उत्तर देता येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

हे सगळ आम्ही करायच का? मग विभागाने काय करायचे.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण ३८६ आहेत त्याच्यातील १२९ आरक्षण आपण ताब्यात घेतली आहेत. मग त्याची जनरल माहिती कशी सांगता येणार.

**मदन उदितनारायण सिंग :-**

माझ्याकडे ते पण आहे मी देतो. दुसरा प्रश्न यादी शिवाय त्याच्यावर काहीच बोलता येणार नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

आपल्याकडे डी.पी. रिपोर्ट पण दिले त्या डी.पी. रिपोर्टमध्ये ३८६ आरक्षणाची यादी आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आरक्षणाची यादी आहे. आपण कुठले ताब्यात घेतले आणि ते कोणाच आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याचा पूर्ण चार्ट दिला. त्याची पूर्ण प्रिंटआऊट दिली आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

सध्या नाही ना.

**सत्यवान धनेगावे :-**

परत आपल्याला प्रिंटआऊट देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मग विषय पुढे ढकलण्यात यावा.

**मा. महापौर :-**

आपके पास ऑलरेडी दिया हुआ है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

ठीक है। सात महिना हो गया।

**मा. महापौर :-**

आपको मालूम है आपका प्रश्न है तो, दो दिन पहले आपको मंगाना चाहिए था।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मैं सचिव साहब के पास आया था।

**मा. महापौर :-**

ऐसा थोडी होता है। प्रश्न पुढे ढकलो, पुढे ढकलो फिर कैसा होगा। अभी कॉपी देती हूँ, उसपे चर्चा करो।

**मदन उदितनारायण सिंग :-**

आतापर्यंत आपण किती स्क्वेअर मिटर जागा ताब्यात घेतलेली आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

डी.सी. रुलला तरतुद आहे. टी.डी.आर. देऊन आरक्षण ताब्यात घेण्यासंदर्भात जी तरतूद आहे त्या तरतुदीनुसार टोटल ७ लाख ५२ हजार ५२१ चौ. मी. जागा ताब्यात घेतलेली आहे. त्यापैकी रिझर्व्हेशनचा एरिया ५४ हजार मिटर आहे. बाकी रोडचा एरीया २१ हजार मीटर आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

एकूण आपल्याजवळ टी.डी.आर. मार्फत देण्याचे आरक्षणाची एकूण किती जागा आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

एकूण ७ लाख ५२ हजार ५२१ मीटर .

**मदन उदितनारायण सिंग :-**

नाही आपण आरक्षण घोषित केलेली एकूण जागा.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण घोषित केलेला त्याच्यात रिझर्व्हेशन एरिया असतो त्याच्यात रोडची एरिया नसते. आरक्षण क्षेत्र वेगवेगळ आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

सगळे आरक्षण ३८६ आपण दिलेले आहे. त्याची एकूण जागा किती.

**सत्यवान धनेगावे :-**

टोटल डेव्हलपमेंट प्लॅनचा एरिया ७९.४ स्क्वे.कि.मी. आहे. त्याची साधारण २० कि.मी. प्रमाणे येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

किती येईल.

**सत्यवान धनेगावे :-**

१४ हेक्टर येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

स्क्वेअर फूटामध्ये किती येईल.

**सत्यवान धनेगावे :-**

स्क्वेअर फूटामध्ये गुणीले मीटर गुणीले १०.७ .....................

**मदन उदितनारायण सिंग :-**

करुन दाखवा, आपण टेक्नीकल पर्सन आहात आम्ही नॉन टेक्नीकल आहोत.

**सत्यवान धनेगावे :-**

ह्याचा अर्थ असा नाही की, ते कॅल्क्यूलेशन करुन उत्तर द्यायला पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

द्यायला पाहिजे. टेक्नीकल पर्सन कशासाठी असतात. माझ्यामते एकूण जागा दोन करोड १० लाख स्क्वेअर फूटाच्या वरती आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

बरोबर.

**मदन उदितनारायण सिंग :-**

हे जर आपण टी.डी.आर. देतो किंवा आरक्षण देतो. सदर जागेला टी.डी.आर. दिले असेल तर त्याचे कंम्पाऊंड, संरक्षण भिंत आणि माती भराव त्याच्याकडून करुन घेतो. तर आपण ते संरक्षण भिंत आणि माती भराव करुन घेतल आहे की, त्याच्या मोबदल्यात पैसे घेतले.

**सत्यवान धनेगावे :-**

२०११ च्या अगोदर असे धोरण ठरवले होते की, ज्या जागेसाठी जायला रस्ता नाही अशा ठिकाणी जागेचा भराव आणि कुंपणभिंत त्या बाबतचे पैसे विकासकाकडून भरुन घेण्याबाबतचे धोरण होते. २०११ मध्ये त्या धोरणात बदल झाला आहे. टी.डी.आर. द्यायचा असेल तर त्याचा भराव करुन घेणे आणि कुंपण भिंत बांधून घेणे ही कारवाई २०११ पासून होते.

**मदन उदितनारायण सिंग :-**

त्याच्या मोबदल्यात आपण भरुन घेतल की, त्याच्याकडून पैसे घेतले.

**सत्यवान धनेगावे :-**

पैसे भरुन घेतले त्याच्यामधून कंम्पाऊंड आणि भरणी करुन घेतली त्यामध्ये रक्कम भरुन घेतले आहे. आणि ज्यामध्ये कंम्पाऊंड आणि भराव केलेला आहे त्यामध्ये रक्कम भरुन घ्यायचे कारण नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

किती जागेवर आपण कंम्पाऊंड आणि माती भराव करुन घेतले आणि किती जागेवर त्याच्या मोबदल्यात पैसे घेतले.

**सत्यवान धनेगावे :-**

२०११ च्या अगोदर जे रिझर्व्हेशनची फाईल आहे त्यामध्ये भरावाचे पैसे घेतले आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

किती जागेवरचे आणि कुठून.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याचे एक्झॅक्टली ॲनलिसेस नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ॲनलिसेस पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही ना साहेब.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब आपले जबाबदार अधिकारी आणि ही आरक्षण टी.डी.आर. नुसती गंमत जंमत आहे का? हे गंमती जमतीसाठी आहे की, लोकांच्या सुविधेसाठी आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण लोकांच्या सुविधेसाठी आहेत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मिरा भाईंदर वाढते शहर आहे. माझ्या मते, अख्या वॉर्डमध्ये फास्टेस पॉप्यूलेशन सिटी आहे. जे ३ लाखांपासून १५ लाखापर्यंत पोहोचले आहे. आणि आरक्षण आपण किंवा सरकारने जे ठेवले आहेत त्याची निगा करणे, देखभाल करणे आणि त्याच्या सुविधेमधून लोकांसाठी रुपांतरीत करणे हे आपले कर्तव्य आहे की नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

महापालिकेचे कर्तव्य आहे ह्या महापालिकेने अन्य महापालिकेशी कम्पेयर केल तर आपण ५० टक्के आरक्षण ताब्यात घेतले आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आपल्याला कम्पेर करायचे नाही. आपण बॉम्बेशी कम्पेयर करणार का?

**सत्यवान धनेगावे :-**

आपण लोकसंख्येशी कम्पेर करुन सांगितले म्हणून मी हे सांगतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आता तुम्ही जबाब दिला की, हे आम्हाला माहित नाही. हे जबाबदार अधिकारी असे उत्तर देत असेल.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, मी माहिती तयार नाही असे बोललो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पण मला ती माहिती पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

देतो ना.

**मदन उदितनारायण सिंग :-**

द्या ना आता.

**सत्यवान धनेगावे :-**

महासभा संपल्यावर देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मग प्रश्न पुढे कसा चालेल. मा. महापौर मॅडम, मी विचारलेली माहिती विभागाकडे तयार नाही. मग प्रश्न पुढे कसा चालेल.

**सत्यवान धनेगावे :-**

आपण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मी दिली आहेत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

प्रश्न ७-८ महिन्यांपूर्वी दिले तुम्ही मला यादी पण दिली. तुमची तयारी तर झाली पाहिजे. आणि मी समजा प्रश्न केला नसेल तर खड्डयात टाकायचे का?

**सत्यवान धनेगावे :-**

खड्डयात टाकण्यासाठी मी तयारी केली नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

तुम्ही सांगता तुमच्याकडे माहिती नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

आपल्याला माहिती देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मग द्या ना. मला आताच पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

आणखी विचारा कुठली पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

तुम्ही बोलले यादी देतो. तुम्ही प्रश्न चालू करा. मी प्रश्न चालू केले मला माहिती द्या मग आपण पुढे बोलू या.

**सत्यवान धनेगावे :-**

माहिती आपल्याला दिली ना २०११ च्या अगोदरचे आहे भराव आणि कंम्पाऊंड ....................

**मदन उदितनारायण सिंग :-**

मला ही माहिती पाहिजे की, आतापर्यंत आपण किती जागेवर माती भराव आणि संरक्षण भिंत बांधली आहे. आणि किती जागेवर पैशाचा मोबदला घेतला आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आपल्याकडे यादी दिलेली आहे त्यातल ७० टक्के आरक्षणाच्या बाबतीत पैसे आणि रक्कम भरुन घेतलेले आहेत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

टक्के बिक्के मला माहित नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

यादीत आहे ना.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ते मला मोजावे लागेल.

**सत्यवान धनेगावे :-**

मोजा ना मग. यादी दिली ना. यादी नव्हती तेव्हा यादी पाहिजे ..................

**मदन उदितनारायण सिंग :-**

आम्ही जनप्रतिनिधी टेक्नीकल नाहीत. आम्हाला जनतेने निवडून दिलेले आहे. देखभाल करण्यासाठी, विचारण्यासाठी, आपण टेक्नीकल पर्सन आहात. नगरपालिका किंवा शासन आपल्याला मानधन देते ते टेक्नीकल असण्याकरीता आमच्या सारख्यांना नगररचना प्रमुख म्हणून बसवेल का?

**सत्यवान धनेगावे :-**

मानधनापुरता काम केलेल आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

कामाबद्दल नाही बोलत एखाद्या अडाणी माणसाला शासन तुमच्या सीटवर बसवेल का?

**सत्यवान धनेगावे :-**

तसे शासन बसवित नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

नाही ना. मग मला ती माहिती द्या.

**सत्यवान धनेगावे :-**

माहिती आपल्याला दिली आहे. ११.७० टक्के आणि ३० टक्के आरक्षण पण आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आता मी विचारतो त्या प्रश्नांची मला माहिती द्या मग पुढे बोलू.

**सत्यवान धनेगावे :-**

दिली ना माहिती. आणखी काय माहिती पाहिजे ते सांगा. मी देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आतापर्यंत किती स्क्वेअर मीटरमध्ये आपण मातीभराव आणि संरक्षण भिंत केलेली आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आता पर्यंत आरक्षणाची एरिया ५४ हजार १५१ त्याच्यात ७० टक्के म्हणजे ३५ हजार ...............

**मदन उदितनारायण सिंग :-**

ती एरिया कुठे-कुठे आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

मिरा-भाईंदर शहरात आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

कुठल्या-कुठल्या आरक्षणामध्ये किती-किती मातीभराव .................

**सत्यवान धनेगावे :-**

तो एरिया प्रभाग निहाय असा सांगता येणार नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मला प्रभाग निहाय पाहिजे. तुम्ही जर मला असे उत्तर दिले तर मी कुठे शोधत बसणार.

**सत्यवान धनेगावे :-**

महासभा संपल्यानंतर परत मला प्रश्न द्या. मी तुम्हाला दुसर उत्तर देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आता दिलेले प्रश्न आठ महिन्यांनी आला परत प्रश्न दिला की आठ महिन्यांनी येणार.

**सत्यवान धनेगावे :-**

आठ महिन्यांनी प्रश्न आला तर तो सिक्वेन्सनी आला. माझ्यामुळे नाही ना .....................

**मदन उदितनारायण सिंग :-**

साहेब उत्तर तयार असायला पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

उत्तर तयारच आहे ना.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मग मी मागतो ते मला उत्तर द्या ना.

**सत्यवान धनेगावे :-**

सांगितले ना आणखी काय पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, मला वाटते ही वायफळ चालली आहे. त्यांना प्रश्नाची उत्तरं दिली आहेत. यादी दिली आहे. यादी त्यांनी हरवली किंवा आणली नाही त्या प्रश्नांवर चर्चा झाली आहे. वेळ संपलेली आहे. प्रश्न करणाऱ्यांना काय उपाय सुचवायचे असतील तर त्यांनी सुचवावे अन्यथा महासभेची वेळ काढू नये.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, मा. बर्नड डिमेलो साहेब जनतेचा प्रश्न आहे. जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. जनतेला सोयी सुविधा पुरवू शकत नाही. आरक्षण आहे त्या माध्यमातून लोकांना गार्डन, प्ले ग्राऊंड, मॅटर्निटी होम, स्विमिंगपूल, स्टेडियम देऊ शकतो तेच कुठे सापडत नाही. आणि अशा प्रश्नांवर आपले सन्मा. सदस्य म्हणतात की, ह्या प्रश्नाचा काय मतलब नाही. मग हे सदस्य महासभेत कशाला येतात. ह्यांना लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाचे काय पडले नसेल तर अशा सदस्यांचा इथे बसून काय फायदा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य बर्नड डिमेलोनी जो शब्द वापरला ही वायफळ चर्चा नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आम्ही वायफळ चर्चा करायला इकडे येतो का? आम्हाला काय कामधंदा नाही का?

**रोहिदास पाटील :-**

शब्द त्यांनी मागे घ्यावा.

**बर्नड डिमेलो :-**

काका, माझ्या बोलण्याचा प्रश्न येत नाही. यादी, माहिती सगळ दिलेली आहे. यादी तुम्ही आणली नाही हा तुमचा हलगर्जीपणा आहे. तुमच्या हलगर्जीपणामुळे ही वायफळ चर्चा ............

**मदन उदितनारायण सिंग :-**

मी यादी बद्दल बोलत नाही. मी विचारलेल्या प्रश्नाच उत्तर त्यांच्याकडे नाही.

**बर्नड डिमेलो :-**

पूढे ढकला हे काय चालले आहे. म्हणजे नक्की तुमचा विचार काय?

*(सभागृहात गोंधळ)*

**मा. महापौर :-**

आपको ऑलरेडी यादी दिया है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, यादी की बात नहीं है। प्रश्न जो पुछा है उसका उत्तर उनके पास नहीं है।

**सत्यवान धनेगावे :-**

उत्तर दिलेले आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

अभी आपने बोला हमारे पास माहिती नहीं है।

**सत्यवान धनेगावे :-**

डिटेल में इन्फॉर्मेशन दिया है। कौनसा टी.डी.आर. नंबर है, कौनसा सर्व्हे नंबर है, कौनसा एरिया है, टोटल एरिया कितना है, उसमें से कितना लिया है, कितना लेने का बाकी है।

**मा. महापौर :-**

उन्होंने पूरा डिटेल दिया हुआ है। वो कैसे बोलेंगे भरणी कहाँ हुआ है। आपको बाद में डिटेल दे देंगे।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मैं क्या प्रश्न पूछ रहा हूँ उसी प्रश्न के उपर यह प्रश्न डिपेंड है। जब तक उस प्रश्न का उत्तर नहीं मिलेगा इस प्रश्न का मतलब नहीं है।

**सत्यवान धनेगावे :-**

आपका जो सवाल है। वह सवाल के हिसाब से पूरा रिझर्व्हेशन के डिटेल्स है, रिझर्व्हेशन नंबर है, सर्व्हे नंबर है, रोड का लेन्थ है, रोड का एरिया है, सब है और क्या चाहिए।

**मदन उदितनारायण सिंग :-**

धनेगावे साहब आप जो बोल रहे है वह तो पंधरा सालसे हमारे पास बूक में है। मुझे लगता है सभी जनप्रतिनिधीयों के पास है।

**सत्यवान धनेगावे :-**

जो बूक मैं है उसके बाद काफी रिझर्व्हेशन डेव्हलप किए है। उन लोगो को सुविधा मिल रही है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

माती भराव बांधकाम का हम पैसा लेते है। आज तक कितना लिया है?

**सत्यवान धनेगावे :-**

आजतक कमसे कम सात करोड लिया है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

सात करोड है या कम है। ॲप्रोक्सीमेट है।

**सत्यवान धनेगावे :-**

लास्ट मार्च का फिगर है। उसमें चेंज हो सकता है। सात करोड का पैसा लिया। उसके बाद डेव्हलपमेंट भी किया है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

उस पैसे मे से कितने का डेव्हलपमेंट किया कितने का डेव्हलपमेंट नहीं किया।

**सत्यवान धनेगावे :-**

सात गार्डन का कंम्पाऊंड बना है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

कितने पैसा का?

**सत्यवान धनेगावे :-**

सात करोड का पूरा पैसा खर्चा हुआ है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

माती भराव और बांधकाम मैं।

**सत्यवान धनेगावे :-**

यस.

**मदन उदितनारायण सिंग :-**

यह पैसा कही दुसरी जगह नहीं गया।

**सत्यवान धनेगावे :-**

यह पैसा दुसरी जगह कैसा जाएगा। स्टँडींग कमिटी में अप्रूव्हल होता है। दुसरी जगह कैसा जाएगा।

**मदन उदितनारायण सिंग :-**

यही मैं आपसे पूछ रहा हूँ।

**सत्यवान धनेगावे :-**

बजेट के हिसाब से खर्चा होता है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

जितने आरक्षण हमने दिया है, उस सबपे माती भराव, बांधकाम और संरक्षण भिंत हो गई है क्या?

**सत्यवान धनेगावे :-**

सात आरक्षण का हो गया है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

हमने जितना आरक्षण लोगों को दिया है। टी.डी.आर रुप में या मोबदले के रुप में सब आरक्षण पे हमारा कब्जा, मातीभराव बांधकाम है क्या?

**सत्यवान धनेगावे :-**

है अपना पजेशन है, कार्पोरेशन का पजेशन है। कार्पोरेशन का ऑनरशिप है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

टोटल सब आरक्षण पे।

**सत्यवान धनेगावे :-**

हा पूरा।

**मदन उदितनारायण सिंग :-**

आप जबाबदारी से बोल रहे हो।

**सत्यवान धनेगावे :-**

जबाबदारीसे ही बोल रहा हूँ।

**मदन उदितनारायण सिंग :-**

सचिव साहब, धनेगावे साहब ने उत्तर दिया की, आज तक हमने जो भी आरक्षण, बांधकाम, मातीभराव करके लिया है, दिया है मोबदला सब आरक्षण पे हमारा मातीभराव बांधकाम हुआ है। जबाबदारी से बोल रहा हूँ यह रेकॉर्ड हो रहा है ना?

**सत्यवान धनेगावे :-**

सब रेकॉर्ड हो रहा है।

**मा. महापौर :-**

आपका माईक चालू है तो पूरा रेकॉर्ड होगा।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, धनेगावे साहेबांनी ह्याच्या अगोदर बोलले की, ७० टक्के जागेवर सर्व काही झालेले आहे. आणि आता तुम्ही सांगता फक्त सात. सात आरक्षणावर काम झालेल आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

भराव आणि कम्पाऊंडच्या माध्यामातुन जी रक्कम मिळाली आहे त्या रकमेच्या विनियोग किती आरक्षणासाठी केला हा पश्न होता त्या प्रश्नाच्या अनुषंगाने सात आरक्षणाच्या वरती कम्पाऊंड भिंत बांधुन घेतली आहे. आणि जे पैसे आपल्याकडे जमा झाले त्या पैशाचा विनियोग कशा पध्दतीने केला त्याचे उत्तर सात होते.

**शरद पाटील :-**

आता एकुण ७० टक्के आरक्षण आपल्या ताब्यात आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

७० टक्के आरक्षणाला भराव आणि कुंपण भिंतीचे पैसे घेतलेले आहेत हे मी स्टेटमेंट दिले.

**शरद पाटील :-**

त्या पैशांनी काम किती झाले?

**सत्यवान धनेगावे :-**

बांधकाम विभागाकडुन सात गार्डनचे कम्पाऊंड झालेले आहे.

**शरद पाटील :-**

सात गार्डनची टक्केवारी किती होते? आता आपण बोललात ७० टक्के ह्याचे आपण पैसे वसुल केले आहेत बरोबर आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

बरोबर आहे.

**शरद पाटील :-**

जे वसुल झाले ते सगळे पैसे खर्च झालेले आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

झालेले आहेत.

**शरद पाटील :-**

म्हणजे ते ७० टक्के जागेवर खर्च झाला पाहिजे असा हिशोब झाला ना.

**सत्यवान धनेगावे :-**

त्याचे कारण असे आहे २००५ ला टी.डी. आर दिला आणि २०१२ मध्ये कम्पाऊंड बांधले डी.एस.आर. रेट वाढतो त्यामुळे त्याचे पर्सेंटेज डायरेक्टली कम्पेअर करता येणार नाही.

**शरद पाटील :-**

म्हणजे आजपण ७० टक्के जागेवर माती भराव झालेला नाही.

**सत्यवान सत्यवान धनेगावे :-**

भराव पूर्ण जागेवर झालेला आहे फक्त कम्पाऊंड राहिलेले आहे.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम वेळ संपलेली आहे.

**प्रशांत केळूस्कर :-**

मॅडम माझा विषय या अनुषंगाने आहे पण मला काही बोलायचे नाही आपल्या ताब्यात ज्या जागा आहेत त्या जागेची देखरेख कोणामार्फत केली जाते.

**मा. महापौर :-**

वेळ संपलेली आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

माझा प्रश्न पुढे घेण्यात येईल ना.

**मा. महापौर :-**

नाही.

**मदन उदितनारायण सिंग :-**

असं कसं.

**मा. महापौर :-**

शेख साहबने खाली पाच मिनिट लिया.

**मदन उदितनारायण सिंग :-**

विषय की जानकारी मिलनी चाहीए।

**मा. महापौर :-**

आपको मालुम था आपका विषय है तो आप स्टडी करके आना चाहीए था।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मै स्टडी करके आया हूँ। मेरी पुरी स्टडी है।

**हेलन गोविंद :-**

मिरा भाईंदर शहर आहे सिटी आहे व्हिलेज नाही त्यांना त्यांच्या वॉर्डाचाच बघु दे प्रत्येकाच्या वॉर्डमध्ये प्रत्येकांनी जबाबदारी घेतली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आपको मालुम था आपका प्रश्न था आप स्टार्टींग मे बोले मेरा कूछ हुआ नही मेरे पास यादी नही है। अभी आप बोलते हो मै स्टडी करके आया हूँ।

**मदन उदितनारायण सिंग :-**

स्टडी करके आया हूँ।

**मा. महापौर :-**

स्टार्टींग मे बोले की नही हूआ है प्रश्न पुढे ढकला। अभी आप बोलते है मै स्टडी करके आया हूँ।

**मदन उदितनारायण सिंग :-**

स्टडी नही किया फिर भी चर्चा किया स्टडी करने के बाद मै और भी चर्चा करुंगा।

**मा. महापौर :-**

आपको स्टडी करने के लिए आठ महिना दिया।

**मदन उदितनारायण सिंग :-**

दिया ना मै नही बोला नही हुआ है।

**मा. महापौर :-**

लियाकत शेख का विषय था वह कैसे स्टडी करके आये।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मॅडम मेरी स्टडी हुई है डिपार्टमेंट को स्टडी नही हुई है।

**(सभागृहात गोंधळ)**

**मदन उदितनारायण सिंग :-**

सचिव साहब मेरा प्रश्न अगली महासभा मे आना चाहीए। तीन प्रश्न बाकी है।

**मा. महापौर :-**

ठिक है।

**प्रशांत केळुसकर :-**

मॅडम, स्पेसिफिक त्याच्यात सांगु इच्छितो कारण आताच अशी एक घटना घडली आहे की सन्मा. एक व्यक्ती आहे ज्यांनी आपल्या आरक्षणामध्ये मंदीर बांधण्याच्या जागेवर उद्‌घाटन करुन आले आहेत जेव्हा ते आरक्षण आपल्या ताब्यामध्ये आहे म्हणजे त्याला त्या माणसाने काही तरी सांगुन तिकडे उद्‌घाटन केले. अशा रितीने उद्‌घाटन होत असतील तर त्या सन्मा. नगरसेवकाचे किंवा सन्मा. व्यक्तीचा अपमान होत आहे. जे आरक्षण ताब्यात घेतली आहेत त्याच्यावर आपली देखरेख राहिली पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

कारण आपणच बांधलेल्या आरक्षणाच्या इकडे सुसाइडची केस झाली आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरीता लक्षवेधी आली नाही. प्रकरण क्र. ४०, दि. ०६/०७/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पान क्र.३ मा. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम दि.०६/०७/२०१३ के महासभा मे ।

**नगरसचिव :-**

पान क्रमांक

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पान क्रमांक ५ पिछले मा. आयुक्त साहब ने काफी चर्चा किया था। और काफी लंबा चौडा डिस्कशन करके आश्वासन दिया था। यह ओपन लॅन्ड, टॅक्स रिकव्हरी के संबंधीत है। इसके अंदर कुछ लोगों के उपर बकाया लेने का है। उनके प्रॉपर्टी सिल करने का प्रावधानका आश्वासन दिया गया था मै आयुक्त साहब का लँग्वेज मे बोलता हूँ। आता यामध्ये त्यानंतर त्याची अंमलबजावणी काही संथ गतीने झाली हे मान्य करावे लागेल. तथापि, त्याच्यानंतर जसजसे या कायद्याबद्दल आणि या टॅक्सबद्दल लोकांना विकासकांना कल्पना आली. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यानंतर त्याची रिकव्हरी वाढायला लागलेली आहे आणि आता वाढतच आहे. आता आपला जो मुद्दा होता की, जी रिकव्हरी आता शिल्लक राहिलेली आहे त्याचे आपण काय करणार आहात? किंवा त्याच्यावर अटॅचमेंट किंवा डिक्री किंवा आणखीन काही कार्यवाही पनीशमेंट आपण करणार आहोत का? यासाठी मी आपल्याला सांगु इच्छितो की, या प्रकरणाचा मी स्वतः आढावा घेतला. पान क्र.५ पे काफी आश्वासन दिए है और उन्होंने कहाँ था कारवाई करेंगे पर आज मेरे सवाल के बाद मे मुझे अब तक जानकारी नही मिली है जिसके अंदर बकाया डिफॉल्टर पे किसी पे कुछ कारवाई की गई हो। मैने जानकारी दिया तो मेरे पास यह जानकारी आया है यह चालू वर्ष मे सात करोड का वसुली हुआ जब की इससे पहले २०१२ मे मात्र १ करोड की वसुली हुआ इसमे कई सारे पॉईंट्स बाकी है डिफॉल्टर कौन है उनको पॅनल्टी लगी की नही लगी............

**बर्नड डिमेलो :-**

सचिव साहेब आपल्याला ह्याच्यात दुरुस्त्या सुचवायच्या आहेत.

**मा. महापौर :-**

मी त्यांना सांगते मला पण माहिती आहे आपको दुरुस्ती करना है या चर्चा करना है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

दुरुस्ती नही मा. आयुक्त साहब ने बोला था इसमे.

**मा. महापौर :-**

आप विदाऊट परमिशन बोलते जा रहे हो तो मै सोच रही हूँ की आपको दुरुस्ती करना है या चर्चा करना है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जो आश्वासन दिया था वह पूरा नही हुआ।

**मा. महापौर :-**

ठिक है।

**राजेश वेतोसकर :-**

मा. महापौर मॅडम पान नं.२३ वर नामकरणाबाबतचे जे ठराव आहेत त्याच्यात दुरुस्ती करण्यात आली होती आणि एक सुचना मांडली होती त्या सुचनेचा समावेश केला गेला नाही नवघर रोडला नटवर हाऊसच्या बाजुच्या गल्लीमध्ये गणेश गल्ली नाव देण्याची सुचना केली होती.

**मा. महापौर :-**

ठिक आहे ते समाविष्ट करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला आठवण करुन देतो आपल्या सभागृहामध्ये सन्मा. नगरसेवक मिरादेवी ने विनंती केली तिने सभागृह नेता ध्रुवकिशोर पाटील त्यांच्याकडे मिरादेवी १५ मिनिटे उभ्या राहिल्या त्यांनी आश्वासन दिलं त्यांनी चार नाव सुचविली होती. त्या साध्याभोळ्या त्यांचा काही आग्रह नव्हता. तुम्ही त्यांच्या एकाही नावाचा स्विकार केला नाही सन्मा. सभागृह नेत्यांनी त्याचा आदर ठेवायला पाहिजे माझी विनंती आहे दुरुस्ती बरीच आहे तुम्ही नोंद घ्या.

**नयना वसानी :-**

मॅडम पान क्र. २०,२१,२२,२३ त्याच्यात मी एक सुचना केली होती मिरारोड पूर्व युनिक ब्रिज ते साई सहयोग शाळे समोरुन तिथे नाव आहे नारायण गुरु मार्ग त्याचाही ह्याच्यात समावेश केला नाही. माझी तुम्हाला विनंती आहे की, नारायण गुरु मार्ग असे नाव ठरावात समावेश करुन घेण्यात यावा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम सेम ठराव पान क्र.२९ चौकास देवी अहिल्याबाई होळकर हे नाव देण्यात आले होते पत्र पण दिले आहे त्याचा समावेश करावा हि विनंती.

**मा. महापौर :-**

समावेश करण्यात येईल.

**प्रभात पाटील :-**

मॅडम पान ३७ वर ठराव आहे. मला पुन्हा पुन्हा सांगायला बर वाटत नाही. मागच्या वेळेला एक लक्षवेधी दिली होती त्याच्यावर काय झालं ते तुम्हाला पण माहिती आहे हा लिंक वर्करचा ठराव मला वाटते माझ्या माहितीनूसार तीन महिने होऊन गेले. सातव्या महिन्यातलं प्रकरण आहे मला नाही वाटत त्याच्या मानधनावर सही झाली आहे साहेबांना माहित असेल ठिक आहे सही झाली नसेल माझ्या माहितीनुसार त्याच्या ठरावावर सही झाली नाही ते कुठे पडुन असतात का पडुन असतात मला कळत नाही.

**मा. महापौर :-**

ठिक आहे मी सही करुन घेते.

**प्रभात पाटील :-**

मॅडम सही करा त्या बद्दल थॅंक्यु पण ज्या दिवसाला ठराव झाला तिथून पुढे त्यांना त्याचा उपभोग घेता येईल ह्या पध्दतीने त्यांना करुन द्या.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**मिरादेवी यादव :-**

मा. महापौर मॅडम हमारा यह जो विषय आया है। ३२ नंबर पंडीत दिनदयाळ शर्मा का आया था लेकीन इस बार डॉ. बाबासाहेब आंबेडकर का आया है। मनाली व्हिलेज के सामने पंडीत दिनदयाळ उपाध्यय का नाम लिया जाए।

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, ह्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव ऑलरेडी दिलेलं आहे. मी पत्र दिलेलं आहे. ह्या नावाचा समावेश झालेला आहे. त्याच्यावर जी मागणी करतात त्याच्यावर मी सुचना केली होती तो वॉर्ड माझा नव्हता बाजुचा होता पण ती सुचना मीच आणली होती ते नामकरण ह्याच्यामध्ये आले आहे. त्याची नोंद घ्यावी नाहीतर परत एका ठिकाणी डबल डबल वाद होईल.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम माझी एक विनंती आहे मोठ्या मोठ्या महापुरुषाची नाव २-२ वेळा कुठच्या रस्त्याला येऊ नये याची खबरदारी घ्यावी कारण नागरीकांना तो ॲड्रेस विचारताना दिशाभुल होते त्याच्यामुळे ही खबरदारी घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. ०६/०७/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ४० :-**

दि. ०६/०७/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४० :-**

दि. ०६/०७/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे

१) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
२) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
३) श्री. प्रमोद जयराम सामंत
४) श्री. राजेश शंकर वेतोसकर
५) डॉ. राजेंद्र जैन
६) डॉ. रमेश जैन

७) श्री. संदिप मोहन पाटील

८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील गटनेत्यांनी आपली पत्र मा. महापौरांकडे द्यायची आहेत.

**मा. महापौर :-**

शरद केशव पाटील ह्यांनी दिलेल्या पत्रामध्ये मा. डॉ. राजेंद्र जैन मा. अश्विन कासोदरीया, श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी दिलेल्या पत्रानुसार श्रीम. वंदना मंगेश पाटील आणि श्री. परशुराम म्हात्रे, सौ. निलम ढवण ह्यांनी दिलेल्या पत्रामध्ये श्रीम. मंदाकिनी गावंड व श्री. हरीशचंद्र आमगावकर, श्री. जुबेर इनामदार ह्यांनी दिलेल्या पत्रानुसार श्री. पांडे हंसुकुमार कमल कुमार व श्रीम. प्रभात प्रकाश पाटील ह्या सर्व सदस्यांना स्थायी समितीवर घोषित करत आहे. सर्वांचे अभिनंदन करत आहे.

**नगरसचिव :-**

पुढील दोन वर्षासाठी हे सदस्य घोषित करत आहेत.

**प्रकरण क्र. ४१ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे

१) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद

२) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो

३) श्री. प्रमोद जयराम सामंत

४) श्री. राजेश शंकर वेतोसकर

५) डॉ. राजेंद्र जैन

६) डॉ. रमेश जैन

७) श्री. संदिप मोहन पाटील

८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील

**ठराव क्र. ४१ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१३ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी २, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी २, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस २ व शिवसेना २ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूक दोन वर्षाकरीता करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २. | श्री. परशुराम म्हात्रे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३. | डॉ. राजेंद्र जैन | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्री. कासोदरीया अश्विन श्यामजी | भारतीय जनता पार्टी |
| ५. | सौ. मंदाकिनी गावंड | शिवसेना |
| ६. | श्री. हरिश्चंद्र आमगावकर | शिवसेना |
| ७. | श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ८. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४२, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे. गटनेत्यांनी आपली पत्रे मा. महापौरांकडे द्यायची आहेत.

**मा. महापौर :-**

वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्याची नावं श्री. बर्नड डिमेलो ह्याच्याकडुन आलेल्या पत्रानुसार श्री. सुरेश खंडेलवाल, श्रीम. बाब्रा रॉड्रीक्स, कमलेश भोईर, श्री. शरद केशव ह्यांच्याकडुन आलेल्या पत्रानुसार राकेश शाह, श्रीम. गीता जैन, श्री. यशवंत कांगणे, निलम ढवण ह्याच्याकडून आलेल्या पत्रानुसार सौ. शुभांगी कोटीयन, श्री. जुबेर इनामदार ह्यांच्याकडुन आलेल्या पत्रानुसार श्री. रकवी सुहास माधवराव, मोहम्मद फरीद सिध्दीक कुरेशी ह्या सदस्यांना वृक्ष प्राधिकरण समितीवर घोषित करत आहे सर्वांचे अभिनंदन करत आहे.

**प्रकरण क्र. ४२ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ४२ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ०३
२. राष्ट्रवादी काँग्रेस - ०३
३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - ०२
४. शिवसेना - ०१
५. बहुजन विकास आघाडी - ००

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील ०९ सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. सुरेश खंडेलवाल | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २. | श्रीम. बाब्रा रॉड्रीक्स | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३. | श्री. कमलेश भोईर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४. | श्री. राकेश शाह | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. गिता जैन | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्री. यशवंत कांगणे | भारतीय जनता पार्टी |
| ७. | सौ. शुभांगी कोटीयन | शिवसेना |
| ८. | श्री. रकवी सुहास माधवराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ९. | श्री. मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे. सर्व गटनेत्यांनी आपली नावे द्यायची आहेत.

**मा. महापौर :-**

सर्व गटनेत्यांची नावे मी वाचून दाखवते. श्रीम. निलम ढवण यांनी श्रीम. अनिता परमार यांचे नाव दिलेले आहे. श्री. बर्नड डिमेलो यांनी दिलेल्या पत्रानुसार श्रीम. वंदना विकास पाटील, श्रीम. शिल्पा भावसार, श्रीम. सँन्ड्रा रॉड्रीक्स, श्री. जुबेर इनामदार यांनी दिलेली नावे, श्रीम. सुनिता कैलास पाटील, श्रीम. काझी रशीदा जमील, श्री. शरद केशव पाटील यांनी दिलेली नावे श्रीम. सुमन कोठारी, श्रीम. सुनिला शर्मा व श्रीम. सुजाता शिंदे. ही नावे मी महिला व बालकल्याण समितीवर घोषित करत आहे व त्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहे.

**प्रकरण क्र. ४३ :-**

महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे. सर्व गटनेत्यांनी आपली नावे द्यायची आहेत.

**ठराव क्र. ४३ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(१)१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतूद आहे. महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची नेमणूक करणेकरिता खालीलप्रमाणे आजमितीस असलेल्या सदस्य संख्येवरुन तौलानिक संख्या निश्चित करण्यात आलेली आहे.

१. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - ०३
२. भारतीय जनता पक्ष - ०३
३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - ०२
४. शिवसेना - ०१

वरील तौलानिक संख्येप्रमाणे गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या नावांनुसार खालील प्रमाणे ०९ सदस्यांची महिला व बालकल्याण समितीवर एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सदस्याचे नांव | पक्षाचे नांव |
|---|---|---|
| १ | सौ. वंदना विकास पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २ | श्रीम. शिल्पा भावसार | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३ | श्रीम. सॅन्ड्रा रॉड्रीक्स | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४ | श्रीम. सुमन कोठारी | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. सुनिला शर्मा | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. सुजाता शिंदे | भारतीय जनता पार्टी |
| ७ | सौ. अनिता परमार | शिवसेना |
| ८ | सौ. सुनिता कैलास पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ९ | श्रीम. काझी रशीदा जमील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४४, निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य देण्याबाबत. (दि. २०/०९/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. १०)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निराधार / विधवा महिलांना कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य केल्यास सदर महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत होईल. त्या अनुषंगाने प्रत्येकी महिला मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकी २००० प्रमाणे अर्थसहाय्य केल्यास महिलांना त्यांच्यावरील आर्थिक बोजा कमी करण्यास व मानसिक मनोबल वाढविण्याकरीता मदत होईल असे २५/५/२०११ च्या शासन निर्णयामध्ये नमुद आहे. त्या अन्वये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात दि. २१/१/२०१३ रोजीच्या महिला व बालकल्याण समितीच्या ठराव क्र. ४ अन्वये विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता रु. ५०००/- प्रमाणे दोन महिलांना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. तरी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकात १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार / विधवा / घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाह करीता अनुदान देण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

१) अर्जदार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये रहिवासी असावी.
२) मुलीचे विवाहाचे वेळेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये यासाठी मुलीच्या जन्माचा दाखला किवा शाळा सोडल्याचा दाखला जोडावा.
३) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
४) या योजनेखालील अनुदान फक्त दोन मुलीच्या विवाहासाठी अनुज्ञेय राहील.
५) अर्जदाराच्या मुलीचा विवाह निश्चीत झाल्यानंतर अथवा विवाहानंतर ३० दिवसापर्यंत करण्यात आलेले अर्ज ग्राह्य समजण्यात येतील.
६) अर्जदार महिलेने पतीच्या निधनाबाबतचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा.
७) मुलीचा विवाह नोंदणी झाल्याबाबतचा विवाह नोंदणी दाखला किंवा लग्नपत्रिका अर्जासोबत जोडावी.
८) सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता देण्यात येणार नाही.

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता सन २०१३ पासून पुढे रु. १२,०००/- इतके अनुदान देण्यासाठी ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**गिता जैन :-**

मॅडम, यासाठी मला थोडेसे विचारायचे होते की, आपण त्यासाठी काय धोरण नक्की केले आहे? आणि आपण किती अमाऊंट देणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बारा हजार.

**गिता जैन :-**

किती माणसांना? म्हणजे एखाद्या वेळी तुम्ही बजेटमध्ये जी प्रोव्हीजन केली, त्यात किती माणसे बसणार?

**मा. महापौर :-**

मला वाटते की, आपली जी समिती आहे ती सर्व छानबीन करुनच देतील.

**गिता जैन :-**

ॲग्री. बट हाव डू यू नो नाव मेनी पर्सन आर गोईंग टू कम टू यू?

**मा. महापौर :-**

ते येतील.

**गिता जैन :-**

हाव कॅन यू अस्यूम दॅट यू विल गेट २०,४०,५०? आपण ते प्रोव्हीजन किती साठी केले आहे? आय ॲम जस्ट आस्कींग यू दॅट.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

गेल्या वर्षी या योजनेखाली फक्त दोन अर्ज आले होते. आता आपल्याकडे आपण टोटली पंधरा लाखाची प्रोव्हीजन केलेली आहे. पहिली आपण अर्थ सहाय्य देणेबाबतची आहे आणि पुढचा जो विषय आहे, विधवा महिलांच्या मुलामुलींना आर्थिक मदत, याच्यामध्ये सध्या पंधरा लाखाची प्रोव्हीजन आहे. आमचा अनुभव पाहता, पहिल्या हफ्त्याच्या योजनेमध्ये फार कमी अर्ज येतात. त्या सर्व अर्जांना मिळायला काही अडचण येणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, याचे स्पष्टीकरण जर सभागृहाला माहिती झाले, सभागृहामध्ये शंभर नगरसेवक आहेत. ते आपआपल्या परिने आपल्या प्रभागात जे गरजू आहेत, त्यांचे काऊंन्सीलींग ते करु शकतात. त्यांना सांगू शकतात. जर मोघम राहिला तर माहितीच पडणार नाही. आपण हे कोणाला देणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीमध्ये सगळ्या पक्षाचे सदस्य आहेत. आणि गोषवाऱ्यामध्ये क्लीअर कट दिलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

महिला व बालकल्याणचे ते काम नाही. हे काम संपूर्ण सभागृहाचे आहे. सगळ्यांना समजले तर आणखीन सोपे आहे. आणि समजवण्यासाठी काही वेगळे नाही. तुम्ही जी माहिती, जे फॉरमॅट आहे ते फॉरमॅट वाचून दाखवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, गोषवाऱ्यामध्ये क्लीअरकट दिलेले आहे. की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निराधार / विधवा महिलांना कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य केल्यास सदर महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत होईल. त्या अनुषंगाने प्रत्येकी महिला मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकी २००० प्रमाणे अर्थसहाय्य केल्यास महिलांना त्यांच्यावरील आर्थिक बोजा कमी करण्यास व मानसिक मनोबल वाढविण्याकरीता मदत होईल असे २५/५/२०११ च्या शासन निर्णयामध्ये नमुद आहे. त्या अन्वये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात दि. २१/१/२०१३ रोजीच्या महिला व बालकल्याण समितीच्या ठराव क्र. ४ अन्वये विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता रु. ५०००/- प्रमाणे दोन महिलांना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. तरी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकात १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार / विधवा / घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाह करीता अनुदान देण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

१) अर्जदार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये रहिवासी असावी.
२) मुलीचे विवाहाचे वेळेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये यासाठी मुलीच्या जन्माचा दाखला किवा शाळा सोडल्याचा दाखला जोडावा.
३) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

४) या योजनेखालील अनुदान फक्त दोन मुलीच्या विवाहासाठी अनुज्ञेय राहील.
५) अर्जदाराच्या मुलीचा विवाह निश्चीत झाल्यानंतर अथवा विवाहानंतर ३० दिवसापर्यंत करण्यात आलेले अर्ज ग्राह्य समजण्यात येतील.
६) अर्जदार महिलेने पतीच्या निधनाबाबतचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा.
७) मुलीचा विवाह नोंदणी झाल्याबाबतचा विवाह नोंदणी दाखला किंवा लग्नपत्रिका अर्जासोबत जोडावी.
८) सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता देण्यात येणार नाही. आणि अनुदान हे बारा हजार रुपये असेल.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, एवढ्यासाठीच वाचायला सांगितले की, त्याच्यामध्ये रहिवासी असावी ..........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील, ते सर्व गोषवाऱ्यामध्ये आहे.

**रोहिदास पाटील :-**

रहिवासी असावी म्हणजे कधीचे आहे? वर्षभर आहे, पाच वर्षे आहे की, पंधरा वर्षे आहे? कारण रहिवासी दाखला साहेबांनाही माहिती आहे. किती वर्षे ते लिहायला लागेल. ते प्रोसिडींगमध्ये आले पाहिजे की, या शहरात किती वर्षापासून राहणारा पाहिजे. आपण एक वर्षाला करणार की, पंधरा वर्षाला करणार, हे काहीतरी आले पाहिजे की, या शहरात किती वर्षापासून राहणारा पाहिजे. आपण एक वर्षाला करणार की, पंधरा वर्षाला करणार, हे काहीतरी आले पाहिजे. नाहीतर ते अधिकारी दाद लावणार नाहीत.

**मा. महापौर :-**

आपसात बोलू नये.

**गिता जैन :-**

सपोज, वी गेट ॲप्लीकेशन मोर दॅन, इट एक्सेप्ट १५ लॅक. देन इन दॅट केस वॉट वी विल डू?

**मा. महापौर :-**

मॅडम, त्याची छाटणी होणारच आहे आणि एवढे होतच नाही.

**गिता जैन :-**

दॅट इज बिकॉज, नोबडी नोज अबाऊट द रोल. वन्स यू पब्लीश इट नाईसली. एव्हरीबडी विल कम टू नो. आणि तसे नाही की, आपल्या शहरात तेवढ्याच विधवा आहेत किंवा तेवढ्याच निराधार आहेत.

**असेन्ला परेरा :-**

मॅडम, इज द क्वेशन अबाऊट इन्क्रीजींग द बजेट ऑर इट इज अबाऊट नॉट गिविंग इट?

**गिता जैन :-**

आय ॲम जस्ट आस्कींग, वॉट इज युअर पॉलिसी फॉर दॅट?

**दिपीका अरोरा :-**

मैं एक्स बालकल्याण सदस्य हूँ। मैं कुछ बोलना चाहूँगी। हम लोगो ने श्रीम. ग्रिटा मॅडम हे अध्यक्षता में मिलकर लास्ट इअर भी पास किया। सिर्फ दो लोग आए। इसमें तभी भी मैंने यह सुचना मांडी थी की, आप उसको पब्लीश किजिए, ॲडव्हटाईज किजिए, यह लोगों तक पहूँचाइए। ॲज नगरसेविका और मेंबर ऑफ महिला व बालकल्याण कमिटी, मैं सबको जाकर बोल रही हूँ या और लोग बोल रहे है। पर पालिका के तरफ से जो एफर्टस् होना चाहिए वो नही है। आप अगर वाडा, भिवंडी साईट, जैसे कम्पॅरिजन पहले भी हुआ, अन्य पालिका के छोटे-से-छोटे दफ्तर मे आप चले जाईए। वहाँ पर एक चार्ट लिखा रहता है। जहाँ पर लिखा है की, कुटुंब का आपको इतना मिलेगा। आपको आरोग्य के लिए इतना मिलेगा। इसके लिए इतना मिलेगा तो पीपल आर अवेर ऑफ दोज थिंग्स। बट यहाँ अगर आप देखो, पालिका में एन्टर हो, एक भी जगह मैंने नहीं देखा की, ऐसी कोई सुचना लगी हुई है। ना पेपर में आता है, नाही आप कही चार्ट या बॅनर्स लगाते है। ॲडव्हर्टाइजमेंट इज व्हेरी नेसेसरी, अगर आप कोई पॉलिसी लगाते है।

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, कही आपको यह लगता है की, अपने शहर में दो ही ॲप्लीकशेन आए, उतनी महिलाए है।

**मा. महापौर :-**

किसी को मालुम नही था। आज सुबह ही मैंने पवार मॅडम को बोला है की, आप ॲडव्हटाईजमेंट किजिए। तब तक किसी को मालुम ही नही पडेगा।

**सुनिता पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नवशक्ती पेपरमंध्ये या विषयाची बातमी आलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

वास्तव्याच्या दाखल्याचा खुलासा केलेला ..........................

**गिता जैन :-**

मॅडम, आणखीन एक सुचना आहे. आताच त्यांनी जसे सांगितले की, नवशक्ती सगळ्याच विधवा मराठी वाचत नाहीत किंवा वाचू शकत नाहीत.

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. श्री. पानपट्टे साहेब, जेवढी ॲडव्हटाईजमेंट होऊ शकते, त्या प्रकारे तुम्ही ॲडव्हटाईजमेंट करा आणि विधवा बायकांना जेवढा होईल तेवढा लाभ द्या.

**गिता जैन :-**

श्री. पानपट्टे साहेब, फक्त मराठी पेपर नाही. कारण आपल्याकडे बहुसंख्य गुजराती .....................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो हिंदी, गुजराती आणि मराठी पेपरमध्ये देऊ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

रेशनिंग कार्ड कम्प्लसरी आहे.

**रोहिदास पाटील :-**

किती वर्षाचे?

**शरद पाटील :-**

साहेब, मुद्दा बरोबर आहे. तुम्ही वर्ष नक्की केले नाही तर तिकडे गेल्यानंतर अधिकारी सुध्दा दाद लावणार नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

त्यांचे शहरामध्ये किती वर्षाचे वास्तव्य असावे ते लिहा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या.

**प्रशांत केळूसकर :-**

मॅडम, इथे आपसात भांडत नाहीत. एकमेकांचे सजेशन्स चाललेले आहेत.

**मा. महापौर :-**

आपसात बोलू नका. जे बोलायचे आहे ते एकेकाने बोला.

**रोहिदास पाटील :-**

ती व्यक्ती किती वर्षे राहणारी पाहिजे, एवढेच मी विचारतो.

**प्रशांत केळूसकर :-**

मॅडम, मागच्या वेळेस जशी आपली तरतूद लॅप्स झाली तशी होता काम नये.

**मा. महापौर :-**

महिला व बालकल्याण समितीने ठरवले असेल की, किती वर्षाचे किंवा काय?

**रोहिदास पाटील :-**

मग जाहिर करावे. मिनिमम इतके वर्ष या शहरात राहणारा पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, सध्या आपल्याकडे जास्त मागणी येत नाही. एका बाजूला हा विचार होतो की, प्रचार होत नाही. प्रचार व्हायला पाहिजे आणि त्याच्यामध्ये आपल्याला विरोधी पक्ष सांगतात की, कायदे कडक करा किंवा कसे करा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

त्यांनी कायदे कडक करा म्हणून नाही बोलले. काहीतरी एक पॉलिसी बनवा असे सांगितले. त्यांनी काहीच विरोध केलेला नाही.

**भगवती शर्मा :-**

त्यांचे फक्त रेशन कार्डवर नाव पाहिजे.

**मा. महापौर :-**

त्यांचे रेशन कार्ड आणि रहिवासी दाखला मिनिमम पाच वर्षाचे असले पाहिजे. या शहराचे पाच वर्ष ते रहिवाशी पाहिजेत. त्या महिलांना आपण देऊ.

**गिता जैन :-**

मॅडम, तुम्ही जर रेशनकार्ड कम्पलसरी ठेवले तर इथे अशी फॅमिली ही आहे. जे वीस-वीस वर्षे राहतात पण त्यांना रेशनकार्ड मिळत नाही.

**मा. महापौर :-**

त्यांच्याकडे काहीतरी पुरावा असेल ना?

(सभागृहात गोंधळ)

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडम, रेशन कार्ड नसेल तरी काहीतरी असणार. बँकेचे पासबुक वगैरे काहीतरी असणार.

**गिता जैन :-**

किप दॅट. डोन्ट किप रेशन कार्ड कम्पलसरी.

**मा. महापौर :-**

तो महिला व बालकल्याण समितीचा निर्णय आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

मॅडम, ज्यांच्याकडे काही पण रहिवासी पुरावा असेल, त्याला आपण देऊ शकतो.

**प्रशांत केळुसकर :-**

मॅडम, आम्ही त्या निर्णयाला आम्ही सन्मानाने स्विकारत आहोत. फक्त थोडी सौम्यता घ्यावी. पाच वर्षाचे पुरावे, रेशन कार्ड नसेल तर दुसरे असे देऊन व्यवस्थित करावे.आणि एक दुसरी महत्वाची गोष्ट की, त्याचा व्यवस्थितपणे प्रचार करण्यात यावा.

**मा. महापौर :-**

आता तेच सांगितले, तुम्ही डबल रिपीट का करता? मी ऑलरेडी रुलिंग दिली आहे. आम्ही ठरवलेले आहे की, पाच वर्षे रेशनकार्ड नसेल तर त्यांचे जुने जे काही प्रुफ असतील ते देऊन महिला व बालकल्याण समिती आहे ते लोक डिसीजन घेतील.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, जे बाहेरुन आले आहेत आणि इथे भाड्याने असतील. तर त्यांच्यासाठी काय आहे? कारण त्यांना वास्तव्याचा दाखला मिळत असताना बरेच डॉक्युमेंटपण द्यावे लागतात.

**मा. महापौर :-**

भाड्याने नाही आहे. जे भाईंदरमध्ये जुने असतील, त्यांच्याकडे काही ना काहीतरी प्रुफ आहेतच.

**निलम ढवण :-**

बऱ्याच वर्षापासून भाडेतत्वावर असतील, त्यांना या सुविधा मिळणार नाहीत का?

**ग्रिटा फॅरो :-**

ॲडव्हटाईज होत आहे.

**मा. महापौर :-**

त्यांचा तो प्रश्न नाही. त्यांचा प्रश्न भाडेवाल्यांचा आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

जेव्हा आपण पहिल्यांदा विषय आणला. त्यावेळेला आम्हाला किती लोकांचे फोन आले की, मॅडम तुम्ही महिलांसाठी चांगले केले. पण त्यानंतर ज्यांच्या घरी लग्न झाली नसतील. ज्यांची झालेली होती, ते लोक आपल्याकडे आले.

**निलम ढवण :-**

मॅडम, विषय चांगला आहे. कोणाचाही विरोध नाही. फक्त ज्या शंका आहेत, ते सगळे शंका निरसन करत आहेत.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. महापौर मॅडम, मेरा एक सुझाव ऐसा है की, विषय बहुत अच्छा है। पिछले साल पाच-पाच हजार के दो लोग सामने आए। अपना पंधरा लाख का तरतुद है। हम जो इतनी सारी कंडीशन्स लगा रहे है, पाँच वर्ष का वास्तव्य दाखला, पाच वर्ष का दाखला कौन देगा? क्या उसके लिए अलग टीम बनायेंगे? मैं कहना चाहता हूँ की, इस बार हमने जो पंधरा लाख की तरतुद की है, उसके अंदर हर लिस्ट में नगरसेवक का शिफारस पत्र। छोटी-छोटी चिजों में शिफारस पत्र लगता है। ९५ नगरसेवक पुरे मिरा भाईंदर का कव्हर करते है। तो मेरा यह कहना था की, नगरसेवक का शिफारस पत्र होता और जैसा आप कह रहे है की, पंधरा लाख मैं बोलता हूँ की, अगर हमारे पास सतरा लाख का आता है, तो फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह, हमे पंधरा लाख देना है। यदी दो लाख आएगा तो अगले साल सोचेंगे। दो लोग आए है, दस हजार रुपया खर्च हुआ है। पंधरा लाख का तरतुद है। हम अग से इतना कंडीशन डालेंगे, तो हमारे पास कौन आनेवाला है। मॅडम, मैं यह कहना चाहता हूँ की, हम जरुरतमंदो को अगर सच में मदद करना चाहते है, तो जितना कम से कम कंडीशन होगा। निडी पिपलों को आगे आने दो। नगरसेवक का शिफारस पत्र लगाकर हम उसे आगे बढायेंगे।

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडम, प्रत्येकी व्यक्ती ही भारताची नागरिक आहे. मग ती भाडेकरु असो किंवा कोणीही असो, प्रत्येकाला लाभ मिळालाच पाहिजे. आमचे पण तेच म्हणणे आहे. तुम्ही करुन घ्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

मेरा यह कहना है की, नगरसेवक का शिफारस पत्र लगाकर आप उसे आगे करो। और समिती डिसीजन लेगी की, वह सचमुच जरुरतमंद है या नहीं।

**वर्षा भानुशाली :-**

मा. महापौर मॅडम, अब जो सुरेशजी ने बोला, वही मैं भी बोलना चाहती थी की, अगर नगरसेवक का शिफारस लेटर इसमें दिया जाए, तो सही रहेगा। क्योंकी हर एक के पास रेशन कार्ड नही रहता है। और इसलिए जिसको सहाय्यता चाहिए वो वंचित रह जाता है। और दुसरी जो हम लोग ॲडव्हटाइज की बात कर रहे है की, प्रचार कैसे करेंगे। तो हमारे यहाँ से जो टॅक्स का बील निकलता है ...................

**मा. महापौर :-**

कैसे प्रचार करेंगे यह किसीने बोला नही है।

**वर्षा भानुशाली :-**

मॅडम, हर साल हम लोग दो या तीन केस को ही देते है। मा. अध्यक्ष मॅडम के बाद महिला व बालकल्याण का अच्छा हुआ। अब आरोग्य शिबीर भी चालू है। महिला दिवस पर भी अच्छा प्रोग्राम किया। प्रशिक्षण का भी चालू किया। मैं मॅडम को धन्यवाद देती हूँ की, उन्होंने अच्छा किया। लेकिन अब विधवा लोगों को हम लोग कैसे डोअर टू डोअर पहुँचा सकते है। तो हमारा जो टॅक्स निकलता है, उसके बिल के पिछे अगर हम लोगों ने छोटासा ॲड डाल दिया तो हर एक घर में पता चलेगा। तो मेरा एक सजेशन है की, आप जो टॅक्स का बील भेज रहे हो, उसके पिछे यह एक छोटासा ॲड डाल दिजिए।

**गिता जैन :-**

एक और सजेशन है, यहाँ लोकल केबल भी है। उसमें भी डालिए।

**मा. महापौर :-**

केबल पर नही होगा।

**मिरादेवी यादव :-**

मा. महापौर मॅडम, यह जो निराधार, विधवा का दिया है। इसमे अगर जिसके माता-पिता बिमार है, और कमानेवाला नहीं है और बाल-बच्चे पढ नही पा रहे है। उनके लिए भी अगर इसमें कोई सुविधा दि जाए, तो बहुत अच्छा होगा।

**मा. महापौर :-**

इसके बाद का विषय वही है। ठराव मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. ४४ :-**

निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य देण्याबाबत. (दि. २०/०९/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. १०)

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निराधार / विधवा महिलांना कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य केल्यास सदर महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत होईल. त्या अनुषंगाने प्रत्येकी महिला मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकी २००० प्रमाणे अर्थसहाय्य केल्यास महिलांना त्यांच्यावरील आर्थिक बोजा कमी करण्यास व मानसिक मनोबल वाढविण्याकरीता मदत होईल असे २५/५/२०११ च्या शासन निर्णयामध्ये नमुद आहे. त्या अन्वये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात दि. २१/१/२०१३ रोजीच्या महिला व बालकल्याण समितीच्या ठराव क्र. ४ अन्वये विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता रु. ५०००/- प्रमाणे दोन महिलांना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. तरी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकात १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाह करीता अनुदान देण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

१) अर्जदार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये रहिवासी असावी.
२) मुलीचे विवाहाचे वेळेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये यासाठी मुलीच्या जन्माचा दाखला किवा शाळा सोडल्याचा दाखला जोडावा.
३) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
४) या योजनेखालील अनुदान फक्त दोन मुलीच्या विवाहासाठी अनुज्ञेय राहील.
५) अर्जदाराच्या मुलीचा विवाह निश्चीत झाल्यानंतर अथवा विवाहानंतर ३० दिवसापर्यंत करण्यात आलेले अर्ज ग्राह्य समजण्यात येतील.
६) अर्जदार महिलेने पतीच्या निधनाबाबतचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा.
७) मुलीचा विवाह नोंदणी झाल्याबाबतचा विवाह नोंदणी दाखला किंवा लग्नपत्रिका अर्जासोबत जोडावी.
८) सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता देण्यात येणार नाही.।

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता सन २०१३ पासून पुढे रु. १२,०००/- इतके अनुदान देण्यासाठी ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४५, निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना आर्थिक मदत प्रदान करणेबाबत. (दि. २०/०९/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. ११)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना **आर्थिक मदत** दिल्यास सदर महिलेला आर्थिक दृष्टया मदत होईल तसेच मुलांमुलींना पुढील शिक्षण देण्यास **निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांना** सोयीचे होईल. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण योजने अंतर्गत १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना प्रस्तावित आर्थिक मदत खालीलप्रमाणे.

**आर्थिक मदत :-**

| शैक्षणिक वर्ग | वार्षिक मदत रुपये |
|---|---|
| १ ते ५ | ३००० रु. |
| ६ ते ८ | ४००० रु. |
| ९ ते १२ | ५००० रु. |
| १२ ते पदवी | ६००० रु. |

**आर्थिक मदत देणेसाठी योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामधील ५ वर्षाचा रहिवासी असावा.
२) बोनाफाईड सर्टिफिकेट
३) शिधापत्रकाची सत्यप्रत.
४) निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेचे वय १८ ते ५० पर्यंत असावे.
५) अर्जासोबत वडीलांचा मृत्युदाखला व घटस्फोटीत असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
७) कुटुंबातील दोन मुलानांच या योजनेचा लाभ घेता येईल.
८) या वर्षाची शैक्षणिक फी संबधी शैक्षणिक शुल्क मागणी पत्र/शुल्क भरणा केलेला असल्यास पावती जोडणे आवश्यक आहे.
९) सदर योजनेचा लाभ दोन वर्षातुन एकदाच देण्यात येईल.
१०) अर्जा सोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.
११) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक मदत मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेंच्या मुलामुलींना सन २०१३ पासुन पुढे **वरीलप्रमाणे आर्थिक मदत प्रदान करणेबाबत** हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**सुमन कोठारी :-**

मा. महापौर मॅडम, मैं एक ऐसा विषय लेना चाहती हुँ। पुरे मिरा भाईंदर का विषय है की, पानी की समस्या बहुत ज्यादा है।

**मा. महापौर :-**

पहले यह होने दिजिए। यह ठराव चालू है।

**प्रकरण क्र. ४५ :-**

निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना आर्थिक मदत प्रदान करणेबाबत. (दि. २०/०९/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. ११)

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना **आर्थिक मदत** दिल्यास सदर महिलेला आर्थिक दृष्टया मदत होईल तसेच मुलांमुलींना पुढील शिक्षण देण्यास **निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांना** सोयीचे होईल. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण योजने अंतर्गत १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना प्रस्तावित आर्थिक मदत खालीलप्रमाणे.

**आर्थिक मदत :-**

| शैक्षणिक वर्ग | वार्षिक मदत रुपये |
|---|---|
| १ ते ५ | ३००० रु. |
| ६ ते ८ | ४००० रु. |
| ९ ते १२ | ५००० रु. |
| १२ ते पदवी | ६००० रु. |

**आर्थिक मदत देणेसाठी योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामधील ५ वर्षाचा रहिवासी असावा.
२) बोनाफाईड सर्टिफिकेट
३) शिधापत्रकाची सत्यप्रत.
४) निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेचे वय १८ ते ५० पर्यंत असावे.
५) अर्जासोबत वडीलांचा मृत्युदाखला व घटस्फोटीत असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
७) कुटुंबातील दोन मुलानांच या योजनेचा लाभ घेता येईल.
८) या वर्षाची शैक्षणिक फी संबधी शैक्षणिक शुल्क मागणी पत्र/शुल्क भरणा केलेला असल्यास पावती जोडणे आवश्यक आहे.
९) सदर योजनेचा लाभ दोन वर्षातुन एकदाच देण्यात येईल.
१०) अर्जा सोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.
११) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक मदत मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेंच्या मुलामुलींना सन २०१३ पासुन पुढे **वरीलप्रमाणे आर्थिक मदत प्रदान करणेबाबत** हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दरवर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१२ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. २०, दि. १४/१२/२०१२ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४८ | ७८०० | ११२९४४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ७५०० | १४४७५०० |
| ३ | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५००० | ३८५००० |
| ४ | बालवाडी शिक्षिका | ०५ | ४००० | २०००० |
| ५ | आर.सी.एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५००० | १४५००० |
| ६ | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४००० | १०८००० |
| ७ | लिंक वर्कर | १०६ | ७०० | ७४२०० |

वरील ठरावाच्या अनुषंगे इतर अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान दिलेला तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ३६०० | ७२०० |
| | एकुण | १८८७ | | १३४८१३०० |

अशा प्रकारे १८८७ अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु. १,३४,८१,३००/- एवढे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते.

चालू वर्षासाठी विविध कर्मचारी व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१३ रोजी कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्यानुसार पुढील प्रमाणे यावर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशील | कार्यरत अधिकारी/कर्मचारी सन २०१२-१३ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदानाची रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४५२ | ११,००० | १,५९,७२,००० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ११,००० | २१,२३,००० |
| ३ | संगणक चालक, लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७७ | ८,५०० | ६,५४,५०० |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ५,००० | २५,००० |
| ५ | आर. सी. एच. विभाग (ठोक मानधनावरील कर्मचारी) | २९ | ८,५०० | २,४६,५०० |
| ६ | क्षयरोग व कुष्ठरोग नियंत्रण कर्मचारी | ३३ | ५,००० | १,६५,००० |
| ७ | लिंक वर्कर | १२७ | २,००० | २,५४,००० |
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,५०० | ९,००० |
| ९ | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ८,५०० | १,४४,५०० |
| १० | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ४,००० | २४,००० |
| | **एकुण** | **१९४१** | | **१,९६,१७,५००** |

अशा महानगरपालिकेतील आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सन २०१३-१४ च्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. २.०० तरतुद आहे. तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. १६.५० लक्ष एवढी तरतुद आहे. या तरतुदीतून वरील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करणेस एकुण रु. १,९६,१७,५०० रक्कम देय होत आहे.

वरील प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करत आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम, मला एक ठराव मांडायचा आहे.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम, माझी एक सुचना होती की, सर्व शिक्षा अभियानचे जे शिक्षक आहेत. त्यांना पण मानधन दिले असते तर, ते पण शिक्षक आहेत.

**मा. महापौर :-**

ते राज्य सरकार त्यांचे करते, कॉर्पोरेशन नाही.

**मर्लिन डिसा :-**

बट दे आर वर्कींग फॉर अस फॉर द कार्पोरेशन.

**मा. महापौर :-**

दे गेट सॅलरी फ्रॉम द स्टेट गव्हेमेंट.

**निलम ढवण :-**

महापालिका कर्मचारी हे वर्षभर महापालिकेचे काम तत्परतेने करीत असतात. परंतु प्रत्येक वर्षी महापालिका त्यांना अर्थसंकल्पात मंजूर असलेल्या तरतुदी प्रमाणेही सानुग्रह अनुदान देत नाही. महापालिकेचे कर्मचारी महापालिकेच्या कामाव्यतिरिक्त निवडणूक आयोग, जनगणना अशी महापालिकेचे अतिरिक्त काम करत असतात. यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांचा सानुग्रह अनुदानाच्या वेळेस सहानुभूतीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे.

सानुग्रह अनुदान म्हणून मिरा भाईंदर कामगार सेनेने १६५००/- रुपयांची मागणी केली आहे. परंतु महापालिकेने २ कोटीची तरतुद २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात केली असल्यामुळे या रक्कमेमध्ये १६५००/- रुपये अनुग्रह अनुदान देणे शक्य नाही. म्हणून महासभेने २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात सानुग्रह अनुदानासाठी केलेल्या २ कोटीच्या तरतुदीमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यास १५०००/- रुपये मिळतील याप्रमाणे पूर्ण नियोजन करावे असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मॅडम, ठराव मांडला हे ठिक आहे. पण तुम्ही हा विषय चर्चेत घेतला असता तर चांगले वाटले असते. तुम्ही जे बोलतात की, आपण जनगणनेला पाठवतो, तर त्यांना तो भत्ता वेगळा दिला जातो. आणि जो जास्त काम करतो, त्यांना पण तासाप्रमाणे, त्यांच्या वेळेप्रमाणे त्यांचे पैसे दिले जातात. आणि तुम्ही हे जे पंधरा हजार केलेले आहे, ते दुसऱ्या वर्षी नक्की करुया. परंतु, जेवढी तरतुद आहे, त्या तरतुदीमध्ये आम्हाला क्लास वनपासून सर्व आता कोण बोलतात लिंक वर्कर, कोण बोलतात हे, आम्ही सर्वांना घेऊन चालत असताना तुमचे जे एवढे आहे ते सध्या तरी होऊ शकत नाही. दुसऱ्या वर्षी आपण घेऊ.

**निलम ढवण :-**

ठिक आहे. मॅडम, पण यानुसार ठोक मानधनावर जे आहेत, त्यांचेदेखील पाच हजार वगैरे दिले जातात. त्यांचेही सानुग्रह अनुदान वाढवून द्यावे.

**मा. महापौर :-**

जेवढे बजेट आहे, बजेटप्रमाणे आपण सर्वांना जेवढी तरतुद करतो .............

**निलम ढवण :-**

मॅडम, मी ठराव मांडला आहे. जो निर्णय असेल तो आपण घ्यावा.

**प्रशांत केळुसकर :-**

मॅडम, लिंक वर्कर बाबत सांगतो. मागच्या वेळी जेव्हा श्रीम. प्रभात पाटील मॅडमनी सांगितलेले तेव्हा लिंक वर्करची संख्या एकेचाळीस सांगण्यात आलेली.

**मा. महापौर :-**

इकडे एकशे सत्तावीस आहेत.

**शरद पाटील :-**

मॅडम, गेल्या वेळेला आपण एकेचाळीस लोकांचाच ठराव केला होता.

**प्रशांत केळुसकर :-**

मॅडम, गेल्या वेळेला एकेचाळीस लोकांचा ठराव होता. १२७ आहेत ना. त्याच्यासाठीच चालू आहे. ४१ आणि १२७ मध्ये फरक येतो ना.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडम, ह्याच्यामध्ये गणपती गेले त्यानंतर नवरात्री गेली आता दिवाळी आली. मला वाटते कंत्राटदारांना देखील बोनस वाढवला पाहिजे. बॉम्बेमध्ये सव्वा आठ टक्के बोनस दिलेला आहे. कंत्राटदाराचा विचार करा कारण त्यांचे लगातार सण चालू आहेत. कंत्राटदार ठेकेदार ह्यांचा देखील विचार करा.

**मा. महापौर :-**

ठिक है।

**हेलन गोविंद :-**

मॅडम संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये ठेक्यावर काम करतात त्या सर्वांचा विचार करा. म्हणजे कम्प्युटर चालवतात त्यांचा देखील.

**मा. महापौर :-**

सफाई कामगारांना कॉन्ट्रॅक्टरनी वेळेवर बोनस द्यायचा आहे ते मी सांगत आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम, दिवाळीच्या पूर्वी तरतुद त्यांना मिळावी अशी मी आपणास विनंती करते.

**दिपीका अरोरा :-**

मॅडम, आपल्याकडून वेळेवर जाते तरी कम्पलेंट आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याकडून वेळेवर जाते.

**दिपीका अरोरा :-**

कम्पलेन्ट आहे म्हणून तुम्हाला एक सुचना दिली. आय ॲम नॉट हिअर टू क्रिटीसाईज्ड इट इज जस्ट इन सुचना की तुम्ही वेळेवर दिल्यावर त्यांचा सण चालेल.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**प्रभात पाटील :-**

मॅडम सर्वांच सानुग्रह अनुदान क्लास सन गेलेच आहेत पण बाकीच्यांसाठी आपण खूप भांडतो. आमचे प्रतिनिधीत्व तुम्ही करता नगरसेवकांच्या मानधन काय आहे. साडे सात हजारामध्ये ट्रॅव्हलींग तरी होते का? त्याच्यासाठी पण जरा भांडा.

**मा. महापौर :-**

सन्मा. प्रभात मॅडम आपण मानधन वाढवून घेऊ या.

**गिता जैन :-**

मा. महापौर एक सुचना देऊ का आपण पगार आणि बोनस एकदमच दिला तर त्यांनाही ते उपयोगी ठरणार.

**मा. महापौर :-**

दोन ठराव आलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, ठराव मतदानाला टाकायच्या, आधी ह्याच विषयावर सानुग्रह अनुदानाचा ठराव केलेला तो होणारच मात्र प्रशासनाला अशी सुचना करा की दिवाळीच्या आधी त्यांना अनुदान देण्यात यावे.

**मा. महापौर :-**

गेल्यावर्षी आपली महासभा उशीरा झाली त्यामुळे परंतु ह्यावर्षी लवकरच देण्यात येईल.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६ करीता दोन ठराव आलेले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मॅडम, गेल्यावर्षी १ कोटी ३० लाखाची तरतूद होती. ह्यावर्षी दोन कोटीची तरतूद केली तर दरवर्षी वाढतच जाणार ना. तुम्ही ठराव करा किंवा नका करु ते तर होणारच आहे. म्हणून मी तुम्हाला सांगते की, तुम्ही माझ्याकडे चर्चा जरी केली असती तर मी तुम्हाला समजावून सांगितले असते.

**प्रशांत दळवी :-**

नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना वेतन देतो ते वेळेवर दिले जाते का? मानधन आपण कधी देणार? सचिव साहेब सांगा. ते वेळेवर मिळते का?

**मा. महापौर :-**
पगार वेळेवर होतो.

**प्रशांत दळवी :-**
सचिव साहेबांनी सांगावे वेळेवर पगार होतो का? ठरावीक क्लास वन अधिकाऱ्यांना भेटत असेल.

**मा. महापौर :-**
मी महापौर होण्याच्या आधी थोडा प्रॉब्लेम झालेला. मी महापौर झाल्यानंतर वेळेवर होते आणि मी सर्वांना विचारलेल आहे. मी महापौर झाल्यावर आपले कर्मचारी माझ्याकडे आले आणि तेच झाल. त्यानंतर मी त्यांचा प्रॉब्लेम सॉल्व्ह केला. आता वेळेवर आहे.

**प्रशांत दळवी :-**
मा. महापौर मॅडम, सचिव साहेबांनी सांगावेत की, गेल्या वेळेला वेतन भत्ता कधी झाला आहे.

**मा. महापौर :-**
नाही. ते कसे सांगीतल. तुम्ही चुकीचे काहीही विचारु नका.

**प्रशांत दळवी :-**
मॅडम माझ्या माहितीप्रमाणे झाला नाही.

**मा. महापौर :-**
होईल. मी सांगते ह्यावेळेला होईल. गेल्यावर्षी महासभा उशीरा झाली. तरी त्यांना मी सांगून दिले. असे नाही की, त्यांना दिवाळीनंतर वेतन दिले. तुम्ही चुकीचे काही सांगू नका.

**प्रशांत दळवी :-**
मॅडम, मी चुकीचे बोलतच नाही.

**मा. महापौर :-**
दिवाळीच्या दोन दिवस अगोदर वेतन दिलेले आहे. असे नाही की दिवाळीनंतर दिलेले आहे. ह्यावर्षी लवकर करु या.

**प्रशांत दळवी :-**
कर्मचाऱ्यांना मासिक वेतन दिले जाते ते वेळेवर दिले जाते का?

**मा. महपौर :-**
तुम्हाला मतदान घ्यायचे आहे का?

**अनिल भोसले :-**
मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील जे आरोग्य ठेकेदार आहेत त्यांना जरी वेळेवर पेमेन्ट मिळत असेल तरीही अनेक वॉर्डमध्ये साफसफाईचे कर्मचारी आहेत. अनेक वेळ २-२ दिवस ३-३ दिवस सुट्टीवर जातात.

**मा. महापौर :-**
मी ऑलरेडी रुलींग दिलेली आहे की, ठेकेदारानी सफाई कामगार आणि सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी अगोदर वेतन द्यायचे आहे. तुम्ही ऐकले नाही.

**अनिल भोसले :-**
ठेकेदारावर कारवाई करावी अशी आमची विनंती आहे. सदस्यांच्या वतीने मी विनंती करतो की, जे ठेकेदार जे साफसफाई कर्मचाऱ्यांना वेतन देत नाही त्याच्यावर कारवाई करावी अशी आमची मागणी आहे.

**मा. महापौर :-**
ठीक आहे.

**नगरसचिव :-**
प्रथम मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. पहिला ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार दुसरा ठराव सुचक सौ. निलम ढवण, अनुमोदन श्री. प्रशांत दळवी. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो.

**निलम ढवण :-**
मॅडम, ह्या संदर्भात एक सुचना मांडते की, आता जे सानुग्रह अनुदान जाहिर केल पहिला ठराव आला त्यामध्ये दोन हजार तरी वाढवून द्यावे अशी मी सुचना करत आहे.

**मा. महापौर :-**
होणार नाही. कारण ऑलरेडी तरतुंदी प्रमाणे सर्वांना दिलेले आहे. दोन कोटीच्या तरतुदीप्रमाणेच दिलेले आहे. त्यांच्याच निवेदनानुसार आपण दिलेले आहे.

**नगरसचिव :-**

प्रथम मी दुसऱ्या ठरावाचे वाचन करतो. महापालिका कर्मचारी हे वर्षभर महापालिकेचे काम तत्परतेने करीत असतात. परंतु प्रत्येक वर्षी महापालिका त्यांना अर्थसंकल्पात मंजूर असलेल्या तरतुदी प्रमाणेही सानुग्रह अनुदान देत नाही. महापालिकेचे कर्मचारी महापालिकेच्या कामाव्यतिरिक्त निवडणूक आयोग, जनगणना अशी महापालिकेचे अतिरिक्त काम करत असतात. यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांचा सानुग्रह अनुदानाच्या वेळेस सहानुभूतीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे.

सानुग्रह अनुदान म्हणून मिरा भाईंदर कामगार सेनेने १६५००/- रुपयांची मागणी केली आहे. परंतु महापालिकेने २ कोटीची तरतुद २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात केली असल्यामुळे या रक्कमेमध्ये १६५००/- रुपये अनुग्रह अनुदान देणे शक्य नाही. म्हणून महासभेने २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात सानुग्रह अनुदानासाठी केलेल्या २ कोटीच्या तरतुदीमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यास १५०००/- रुपये मिळतील याप्रमाणे पूर्ण नियोजन करावे असा ठराव मांडत आहे. सुचक सौ. निलम ढवण ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हातवर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. आता मी पहिल्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दरवर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१२ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. २०, दि. १४/१२/२०१२ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४८ | ७८०० | ११२९४४०० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ७५०० | १४४७५०० |
| ३ | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५००० | ३८५००० |
| ४ | बालवाडी शिक्षिका | ०५ | ४००० | २०००० |
| ५ | आर.सी.एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५००० | १४५००० |
| ६ | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४००० | १०८००० |
| ७ | लिंक वर्कर | १०६ | ७०० | ७४२०० |

वरील ठरावाच्या अनुषंगे इतर अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान दिलेला तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ३६०० | ७२०० |
| | एकुण | १८८७ | | १३४८१३०० |

अशा प्रकारे १८८७ अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु. १,३४,८१,३००/- एवढे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते.

चालू वर्षासाठी विविध कर्मचारी व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१३ रोजी कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्यानुसार पुढील प्रमाणे यावर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशील | कार्यरत अधिकारी/कर्मचारी सन २०१२-१३ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदानाची रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४५२ | ११,००० | १,५९,७२,००० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ११,००० | २१,२३,००० |
| ३ | संगणक चालक, लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७७ | ८,५०० | ६,५४,५०० |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ५,००० | २५,००० |
| ५ | आर. सी. एच. विभाग (ठोक मानधनावरील कर्मचारी) | २९ | ८,५०० | २,४६,५०० |
| ६ | क्षयरोग व कुष्ठरोग नियंत्रण कर्मचारी | ३३ | ५,००० | १,६५,००० |
| ७ | लिंक वर्कर | १२७ | २,००० | २,५४,००० |
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,५०० | ९,००० |
| ९ | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ८,५०० | १,४४,५०० |
| १० | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ४,००० | २४,००० |
| | एकुण | १९४१ | | १,९६,१७,५०० |

अशा महानगरपालिकेतील आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सन २०१३-१४ च्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. २.०० तरतुद आहे. तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. १६.५० लक्ष एवढी तरतुद आहे. या तरतुदीतून वरील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करणेस एकुण रु. १,९६,१७,५०० रक्कम देय होत आहे.

वरील प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. सुचक सन्मा. श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४४ विरोधात ३७ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**दिनेश जैन :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आता सुमन कोठारीने प्रश्न विचारला होता. मिरा भाईंदरमध्ये आपण सन्मा. नगरसेवक असलेलो आहोत. तो प्रश्न आता महासभेत नाही. तो पाण्याचा प्रश्न आहे मिरारोडला.

**मा. महापौर :-**

दोन मिनिटे थांबा तरी, हे डिक्लरेशन होऊन जाऊ द्या. मी त्यांना टाईम देते ना

**प्रभात पाटील :-**

मॅडम, सानुग्रह अनुदानाच्या अनुषंगाने दोन गोष्टी मला आपल्याला आणि मा. आयुक्तांना सांगायच्या आहेत. मॅडम हा सानुग्रह अनुदानाचा विषय नाही तरी सुध्दा आपल्या महानगरपालिकेतून बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. पण सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांचे जे सेवानिवृत्त वेतन आहे ते कधीही वेळेवर मिळत नाही. मला वाटते आपले बरेच अधिकारी आहेत त्यांच्याकडून खात्री करुन घ्यावी. बरेचसे लोक भेटतात ते सांगतात. सहा महिन्याची त्यांच्याकडे पावती असते की, ते जिवंत आहेत. त्याच्यापलीकडे त्यांची हजेरी नसते किंवा काही नसते ते किती दिवस हजर आहेत मग त्यांचा पगार निघायला काही प्रॉब्लेम आहे अस मला

वाटत नाही. परंतु त्यांचे वेतन वेळेवर जात नाही. कृपया ह्या बाबतीत आपण लक्ष घालावे. मा. आयुक्त साहेब, मी आपल्याला विनंती करेन तसेच संगणक चालकांचा पगार देखील वेळेवर निघत नाहीत.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**प्रभात पाटील :-**

ह्या दोन गोष्टींकडे आपण लक्ष द्या.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, प्रभात मॅडमनी जो पगाराचा विषय घेतला असाच कचरा उचलणाऱ्या आणि साफसफाईचे जे कामगार आहेत त्यांचा देखील पगार वेळेवर होत नसल्यामुळे अचानक ........................

**मा. महापौर :-**

आता सगळ संपल आणि परत तुम्ही तेच बोलता.

**निलम ढवण :-**

मॅडम, तो विषय नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही बोलतात त्याच्यावर ऑलरेडी चर्चा झालेली आहे. सन्मा. सदस्य भोसलेंनी तेच सांगितले.

**निलम ढवण :-**

मॅडम, मला हे सांगायच आहे की, आयत्या वेळी शनिवार, रविवार पकडून ते संप करतात. वॉर्डमध्ये कचऱ्याचे ढीगच्या ढीग असतात.

**मा. महापौर :-**

मी पानपट्टे साहेबांना सांगते .................

**निलम ढवण :-**

ठेकेदारांना सुचना द्याव्यात त्यांचे पगार वेळेवर व्हावेत.

**मा. महापौर :-**

पानपट्टे साहेब, हे तुमच्यावर आहे. मी पहिलीच रुलिंग दिली होती.

**प्रकरण क्र. ४६ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दरवर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१२ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. २०, दि. १४/१२/२०१२ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४८ | ७८०० | ११२९४४०० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ७५०० | १४४७५०० |
| ३ | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५००० | ३८५००० |
| ४ | बालवाडी शिक्षिका | ०५ | ४००० | २०००० |
| ५ | आर.सी.एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५००० | १४५००० |
| ६ | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४००० | १०८००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | लिंक वर्कर | १०६ | ७०० | ७४२०० |

वरील ठरावाच्या अनुषंगे इतर अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान दिलेला तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ३६०० | ७२०० |
| | एकुण | १८८७ | | १३४८१३०० |

अशा प्रकारे १८८७ अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु. १,३४,८१,३००/- एवढे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते.

चालू वर्षासाठी विविध कर्मचारी व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१३ रोजी कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्यानुसार पुढील प्रमाणे यावर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशील | कार्यरत अधिकारी/कर्मचारी सन २०१२-१३ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदानाची रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४५२ | ११,००० | १,५९,७२,००० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ११,००० | २१,२३,००० |
| ३ | संगणक चालक, लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७७ | ८,५०० | ६,५४,५०० |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ५,००० | २५,००० |
| ५ | आर. सी. एच. विभाग (ठोक मानधनावरील कर्मचारी) | २९ | ८,५०० | २,४६,५०० |
| ६ | क्षयरोग व कुष्ठरोग नियंत्रण कर्मचारी | ३३ | ५,००० | १,६५,००० |
| ७ | लिंक वर्कर | १२७ | २,००० | २,५४,००० |
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,५०० | ९,००० |
| ९ | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ८,५०० | १,४४,५०० |
| १० | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ४,००० | २४,००० |
| | **एकुण** | **१९४१** | | **१,९६,१७,५००** |

अशा महानगरपालिकेतील आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सन २०१३-१४ च्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. २.०० तरतुद आहे. तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. १६.५० लक्ष एवढी तरतुद आहे. या तरतुदीतून वरील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करणेस एकुण रु. १,९६,१७,५०० रक्कम देय होत आहे.

वरील प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील    अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | सिंग मदन उदितनारायण | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | पाटील रोहिदास शंकर | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | मेहता डिंपल विनोद | |
| ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ८ | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ९ | गोविंद हेलन जॉर्जी | ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | निरंक |
| १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | १० | रावल भगवती जयशंकर | |
| ११ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | ११ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १२ | खण्डेलवाल सुरेश | १२ | शरद केशव पाटील | |
| १३ | नरेश तुकाराम पाटील | १३ | मेघना दिपक रावल | |
| १४ | अनिता जयवंत पाटील | १४ | जैन गिता भरत | |
| १५ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १५ | जैन रमेश धरमचंद | |
| १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | १६ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १७ | भावसार शिल्पा कमलेश | १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १८ | वंदना रामदास चक्रे | १८ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १९ | भोईर कमलेश यशवंत | १९ | सिमा कमलेश शहा | |
| २० | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | २० | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २१ | रविंद्र भिमदेव माळी | २१ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २२ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २२ | जैन दिनेश तेजराज | |
| २३ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २३ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २४ | पाटील सुनिता कैलास | २४ | अनिल बाबुराव भोसले | |
| २५ | वेतोसकर राजेश शंकर | २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| २६ | प्रभात प्रकाश पाटील | २६ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| २७ | बगाजी शर्मिला विल्सन | २७ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २८ | रकवी सुहास माधवराव | २८ | तारा विनायक घरत | |
| २९ | झिनत रऊफ कुरेशी | २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३० | मोहम्मद फरिद सिंद्धीक कुरेशी | ३० | शुभांगी महिन कोटियन | |
| ३१ | पुजारी कांचना शेखर | ३१ | जयमाला किशोर पाटील | |
| ३२ | काझी रशीदा जमील | ३२ | परमार अनिता भरत | |
| ३३ | इनामदार जुबेर | ३३ | पाटील प्रणाली संदिप | |
| ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ३५ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | ३५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ३६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३६ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ३७ | डिसा मर्लिन मर्विन | ३७ | ठाकूर अरविंद दत्ताराम | |
| ३८ | भट दिप्ती शेखर | | | |
| ३९ | विराणी रेखा अनिल | | | |
| ४० | सामंत प्रमोद जयराम | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४२ | भोईर भावना राजू | | | |
| ४३ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४४ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- अपुऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासंदर्भात.

**निलम ढवण :-**

मॅडम, आपल्या पालिकेत बऱ्याच विभागामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या बरीच कमी आहे. त्यामुळे नागरिकांच्या महत्वाच्या विषयावर किंवा सोयीसुविधा देताना बरेच प्रश्न उपस्थित होतात ते वेळेवर होत नाही त्यामुळे आम्हाला देखील तिथे काम करत असताना बऱ्याच समस्या निर्माण होतात. ऑक्टोबर २०१२ ला प्रभाग कार्यालयातून जन्म मृत्युची नोंद सर्टिफिकेट देण्यात यावी अशी मागणी केली होती. परंतु ते अद्यापी झालेली नाही. तिथे उत्तर असे मिळते की, तिथे स्टाफ कमी असल्यामुळे प्रभाग कार्यालयात कर्मचारी बसवता येत नाही. कारण भाईंदर पूर्वेचा एखादी व्यक्ती मेल्यानंतर दहन दाखला आणि जन्माचे सर्टीफिकेट घेण्यासाठी भाईंदर वेस्टला यावे लागते. त्यामुळे त्या त्या गोष्टीची नोंद तिथे व्हावी अशी मी मागणी केली होती. तरी देखील ते कर्मचारी अद्यापी तिथे बसवले गेले नाही. त्यानंतर फेरीवाले हटवणे तेव्हा देखील प्रभाग समितीची मिटींग झाली त्यातही सांगितले की, आमच्याकडे स्टाफ कमी आहे. बॅनर काढण्याच्या बाबतीत जेव्हा विषय निघतो तेव्हाही सांगतात चार लोक असतात. ईस्ट, वेस्ट, मिरारोड सगळीकडे फिरत असतात. कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. एम.पी.डब्लू. आरोग्य विभाग ह्या संदर्भात पाणपट्टे साहेब म्हणाले की, आम्ही आता वाढवून देतो. त्यावेळी स्टाफ कमी होता. बांधकाम विभाग त्यांच्याकडे देखील तांत्रिक कर्मचारी कमी आहेत. त्यामुळे विविध विभागामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे ज्या सोयीसुविधा आम्हाला वेळेवर द्यायला पाहिजेत त्या देता येत नाहीत. वारंवार आम्हाला देखील पाठपुरावा करायला लागतो. त्यामुळे मी आपणांस विनंती करते की, प्रत्येक विभागाचा स्टाफ वाढवून तेथे नागरीकांना चांगल्या सोयी मिळतील, वेळेवर त्यांची कामे होतील ही काळजी आपण घ्यावी अशी मी आपणांस विनंती करत आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम होईल का?

**मा. महापौर :-**

१०० टक्के एक महिन्याच्या आत आम्ही प्रस्ताव पाठवणार आहोत.

**निलम ढवण :-**

ठिक आहे.

**अनिता परमार :-**

मा. महापौर मॅडम, मला एक सुचना करायची आहे. जन्म-मृत्युच्या ज्या नोंदणी असतात, त्या जुन्या नोंदणीची कम्प्युटरमध्ये एन्ट्री नाही त्या तुम्ही कराव्यात. कारण त्या कागदाच्या पूर्ण पत्रावळी झाल्या आहेत. मला खुप तक्रारी येतात. त्याची नोंद घ्यावी.

**(प्रस्तावावर चर्चा करण्यात आली.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - नवघर शाळेच्या मैदानाबाबत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नवघरच्या मैदानाचा आपण उल्लेख करतो. नवघर मैदानाचे सर्वात सिनियर सन्मा. रोहिदास पाटील इथे बसलेले आहेत. नवघरचे मैदान आपल्या मिरा भाईंदरचे आरक्षण नाही. नवघर शाळेचे मैदान आहे. त्याचे अस्तित्व जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत पासून आहे. ते मैदान शाळेचे मैदान आहे. त्यामुळे त्यावर पहिला हक्क शाळेच्या विद्यार्थ्यांचा आहे. ते विद्यार्थ्यांच्या क्रिडा गुणांना वाव देण्यासाठी आहे आणि त्यांच्या कवायतीसाठी आहे. पण ते असे असताना देखील आपण ते मैदान प्रत्येक कार्यक्रमासाठी भाड्याने देतो. २०१२ च्या निवडणूकी अगोदर आपण तिथे गवत लावलेले, लॅन्ड स्केपिंग केलेले. तरी एका राजकीय पक्षाला ते मैदान भाड्याने दिले आणि तिकडे त्यांनी एक फुटाचा लाकडी स्लॅब टाकला. गवत खाली गेले आणि त्याच्यावर पूर्ण मंडप घालून मैदान कव्हर केले. त्याच्यानंतर त्यांची सभा झाली की नाही ते मला माहित नाही. परंतु, दुसऱ्या राजकीय पक्षाला सभा घेण्यासाठी तो मंडप तसाच ठेवला. त्यामुळे गवत सडले, कुजले त्याला ऊन मिळाले नाही. त्यामुळे ते लॅन्ड स्केपिंग वाहून गेले, फुकट गेले. मा. गिल्बर्ट मेन्डोंसा त्यावेळेला नगराध्यक्ष होते. त्यावेळेला ५० दशलक्ष मिटरची योजना या शहरात प्रस्तावित झाली. त्यामुळे संम्प आणि पंप कुठे बसवायचे ते तयार होण्याच्या आधीच मला वाटते शेट पदावरुन पायउतार झाले आणि आपल्या प्रशासनाने तिथे टाकीचे प्रोव्हीजन करुन टाकले. कोणी उठतो आणि त्या मैदानावर हक्क करतो. आजच्या घडीला तिकडे संम्प आणि पंप झाले असते तर शाळेला मैदान राहिले असते का? नवघर गावात प्रत्येक माणसाने त्याच्यासाठी पुढाकार घेतला. सन्मा. याकुब कुरेशी तेव्हा पाणी पुरवठा सभापती होते आणि श्री. भालचंद्र गोसावी त्यावेळेला मुख्याधिकारी होते. त्यांच्या पुढाकाराने ते आपण वाचवले. त्यासाठी सन्मा. गिल्बर्ट शेठनी पदावर नसताना देखील खुप मदत केली. अशारितीने एक संकट टळल. आज तुम्हाला सांगते ह्या संपूर्ण तीन महिन्याचा आपण दौरा घेतला तर तिकडे कोणाचा बर्थडे आहे तर कोणा शाळेचे फंग्शन आहे. तर ते मैदान संपर्ण वर्षभर कव्हर केलेले असते. आता तिकडे कुत्रिम तलाव केला. कुत्रिम तलावासाठी

मैदान तोडले. मध्येच कोणीतरी दहीहंडीची परमिशन मागीतली. आपण पुन्हा ते बुजवले. दहीहंडी झाल्यावर पुन्हा ते खोदले, कुत्रिम तलाव केला. गणपती विसर्जन झाले. पाच दिवसांनी पुन्हा पूर्ण मैदान कव्हर झाले. नवरात्रीच्या १० दिवसा आधी मंडप डेकोरेशन करण्यासाठी गेले. १० दिवस नवरात्रीचे गेले. संडेला झाले ना, आजही जाऊन बघा ते मैदान क्लियर झाले नाही. म्हणजे ते उतरवायला १० दिवस. एक महिना तर हाच गेला आहे. ह्या काळात शाळा बंद होती. मग मुलांच्या ॲक्टीव्हीटी कुठे गेल्या? आता अजून एक कळलं आहे की, आपण एक विभाग फायर फायटर ठेवण्यासाठी जागा मागतात. मग त्या मैदानाने करायचे काय? त्यांनी श्वास घ्यायचा की नाही? तिथल्या मुलांनी शिकायचे की नाही? सभागृहाला कल्पना नसेल तिथेच आपले प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तिथे जेष्ठ नागरीकांना चालण्यासाठी जॉगींग ट्रॅक बांधला आहे. इतक्या लोकांच्या सोयीसुविधा असताना आपण वारंवार कोणता तरी कार्यक्रमासाठी मैदान देतो आणि इतक्या लोकांवर अन्याय करतो. आपल्याला किती लाख मिळतात. पण ज्यांच्या डोळ्यांमध्ये भावी आयुष्याची स्वप्न आहेत त्या विद्यार्थ्यांच्या हक्कावर आपण गदा आणतो. माझी आपल्याला एक विनंती आहे की, ते मैदान पालिकेचे आरक्षण.............

**मा. महापौर :-**

मॅडम, तुम्ही जे बोलताना तेच सन्मा. वंदना विकास पाटील यांनी सेम ऑब्जेक्शन घेतले होते. त्यावेळी त्यांनी तेच सांगितलं होतं की, फायरसाठी पण देऊ नका परंतु............

**प्रभात पाटील :-**

मी पण फायरसाठी पत्र दिलं आहे.

**मा. महापौर :-**

पानपट्टे साहेब काय बोलले आम्ही पूर्ण वापरणार नाही. आम्ही साईडला घेणार त्यांचपण सेम ऑब्जेक्शन होतं की, ग्राऊंड कोणाला द्यायचं नाही.

**प्रविण पाटील :-**

सदरच्या मैदानाबद्दल महापालिकेने ठराव केला आहे त्याची माहिती द्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, नवघर शाळेचा विषय सन्मा. प्रभात पाटील ह्यांनी आणला आहे. मला अधिकाऱ्यांचे लक्ष वेधायचे आहे की, कोट्यावधी रुपये आपण खर्च करतो. महापालिकेच्या वतीने आपण शाळा चालवतो साधारण सगळ्यांची धारणा आहे की, महापालिकेच्या शाळेमध्ये येणारी मुलं ही गरीबांची असतात तेव्हा ती आशेने बघतात की, आम्हाला कुठेच आधार नाही म्हणुन ह्या महापालिकेच्या शाळेत जातो. मग मिडीयम कोणतही असु दे. हिंदी, उर्दु, गुजराती, मराठी असु दे पण आपल्या महापालिकेच्या अधिकाऱ्याचे धोरण का कुठे विसंगत होते काही पर्वाच नाही. नवघर शाळेची अनेक पत्र आहेत कोणी वाचतच नाही, हा एक भाग झाला. बंदरवाडी शाळेमध्ये आजची पोझीशन काय आहे? बंदरवाडी शाळा चालू आहे. आरोग्य केंद्र चालते. अवती-भवती काय बनले आहे? मंडप बनतो, दोन-दोन महिने सुटत नाही. खारीगावातील तलाव रोडची शाळा होती. मा. आयुक्त श्री. विक्रम कुमार यांना घेऊन गेलो. त्यावेळी त्या शाळेचा दर्जा बदलला. आज तिथेही परत रात्र निवारा केंद्र चालते. उघडे नागडे लोकं बसतात मुलं शिकतात शिक्षिका येतात. महापालिकेच्या शाळेबद्दल इमारतीबद्दल स्पष्ट धोरण गरजेचे आहे.

**मा. महापौर :-**

श्री. रोहिदास पाटील माझ्याकडे ते पण लोक आलेले जेसल पार्कला जे प्रोग्राम होतात मुले ते पण बोलतात की, आम्हाला ईस्टला ग्राऊंड नाही. नवघर ग्राऊंडपण कार्यक्रमाला देतात. जेसल पार्क चौपाटी जी आम्हाला खेळायला आहे, तेही तुम्ही आणि कॉर्पोरेशन कार्यक्रमाला देता मग आम्ही मुलांनी जायचं कुठे? माझ्याकडे कम्प्लेंट येत आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आपण मैदाने विकसीत करायला पाहिजे हा एक पार्ट आहे. दुसरा पार्ट आहे की, जी महापालिकेची मैदाने आहेत, शाळेची मैदाने आहेत ती सुरक्षित ठेवायला पाहिजेत. पालकांना, विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आपण खात्री द्यायला पाहिजे. कोणतेही शिक्षक तुमच्याकडे तक्रार करणार नाहीत. मुख्याध्यापक तुमच्याकडे येत नाहीत त्यांची हिम्मत नाही त्यामुळे ते जसे आले तसे चालते वर्ग चालु आहे इथे कार्यक्रम चालु आहे. आपण ते किती वेळ बोलायचे. आजच्या सभेमध्ये एकदा ठराव करा की, याच्याबद्दल निश्चित धोरण ठरविण्यांत येईल आणि अशा कार्यक्रमांना मग कोणतेही असु द्या मी तर असे म्हणेन की, ज्या राजकीय पक्षांचे नेहमी कार्यक्रम होतात त्यांना मैदाने विकसीत करायला संधी द्या. पक्षवाईज द्या. ज्यांची इच्छा आहे त्यांना द्या. त्या निमित्ताने मैदान विकसीत होईल मोठ मोठे खर्च करतात.

**निलम ढवण :-**

मॅडम, नवघर मैदान हे पूर्वी भाईंदर पूर्वेच्या याच्यामध्ये आहे आत्ता ते इंद्रलोकचे झाले. परंतु, नवघर बी.पी.रोड वगैरे एरीयात ते एकमेव मैदान आहे आणि त्या मैदानातून लोकांशी कुठचेही शाळेच्या बाबतीत मुलांचा विचार करणे योग्य आहे. परंतु, दिवसभर मुलांसाठी ते मैदान खुले असतेच. जेव्हा प्रोग्राम असतात ते

संध्याकाळचे असतात मग संध्याकाळी एक दिवस अगोदर किंवा एक दिवस नंतर त्यांनी जो मंडपाचा विषय काढला तो बरोबर आहे. परंतु, त्यासाठी प्रशासनाने त्याच्यावर त्यांना बंदी घालुन की, एक दिवस अगोदर किंवा दुसऱ्या दिवशी ताबडतोब ते काढावे कारण, आठ दिवस राहणे चुकीचे आहे, तर ते काढावे. परंतु, तिथे कार्यक्रम करायला काही हरकत नाही. कारण तिथे एकमेव मैदान आहे. यामुळे तिथे कार्यक्रमांचा प्रश्न येत नाही. दुसरी गोष्ट तलावाचे जे आत्ता खोदले गेले आणि मैदानाची वाट लागली, हे तितकेच खरे आहे. मागच्या साईडला तलाव आहेत. बाजुला गावात तलाव आहेत त्यापुढेच खाडी असताना देखील ते एकमेव मैदान आहे, त्या मैदानामध्ये तलाव बनविण्याची गरज नव्हती आणि त्यामुळे त्या मैदानाची पुर्ण वाट लागली तर यापुढे आपण हा विचार करावा की, तिथे तलाव बनविण्याची गरज नसून यापुढे तिकडे तलाव बनवू नये.

**रोहिदास पाटील :-**

ज्यावेळी आपण सांगितले की, या मैदानाची समस्या ही सगळ्यांची आहे. लक्षात आलेली आहे पर्यायी मैदान तयार करा. गेले सहा महिने झाले सांगतो मा. आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते की, शाळेच्या मागे दुसरी मोकळी जागा आहे. आपण तिथे कचरा टाकून ते मोठे डंम्पींग मैदान झाले त्याचे सपाटीकरण करा असे तीन महिन्यांपासून चाललेले आहे. पण तिकडे काम सुरु होत नाही. आजही त्याच्यावर काही नाही. जर ते मैदान तयार झाले, तर तिथे कार्यक्रमही होऊ शकतात. मुलेही खेळू शकतात. पार्किंगच्या गाड्यांचा जो आग्रह मी धरला होता पण ते मैदान एवढे मोठे आहे की, गाड्याही उभ्या राहू शकतात. तो निर्णय ताबडतोब घ्या.

**प्रविण पाटील :-**

हा ठराव करण्यापूर्वी या मैदानाबद्दल पूर्वी ठराव झालेला आहे का? याची माहिती द्या आणि त्याची आजपर्यंत अंमलबजावणी झालेली आहे का? याची माहिती द्या.

**प्रभात पाटील :-**

श्रीम. निलम ढवण यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, संध्याकाळी कार्यक्रम होतात, तेव्हा विद्यार्थी नसतात परंतु साहेब, कोणताही कार्यक्रम स्पीकर आणि डीजे शिवाय होत नाही आणि मा. उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत की, तो भाग शांतता क्षेत्र म्हणून घोषित केलेला आहे आपण कोणत्याही कार्यक्रमाला परमिशन दिली की, पोलिसवाले आपल्याकडे बोट दाखवतात हे लक्षात घ्या तुमची महानगरपालिका परमिशन देते त्यामुळे आम्हाला तिकडे अलाऊड करावे लागते. नवघरचे मैदान हे मध्यवर्ती ठिकाण आहे. आजुबाजुला रेसिडेन्स परिसर आहे, चारही बाजुने लोक राहतात आणि कार्यक्रम किती वाजता संपतो याचे काहीही बंधन नसते त्यामुळे याच्या विरोधात कोणीतरी कोर्टात जाणार आहे मी आज काही बोलत नाही परंतु या सगळ्या बाबींचा उल्लेख आणि विचार या कार्यक्रमाच्या दरम्यान व्हायला पाहिजे.

**निलम ढवण :-**

मॅडम, मैदानामध्ये स्पीकर चालु असतो असे नाही आत्ता प्रत्येक कॉलनीमध्ये प्रत्येक कार्यक्रम देखील सेलिब्रेट होत असतात, करत असतात. त्यामुळे तिथे डी.जे. आणि स्पीकर जोरजोरात चालूच असतात. म्हणजे तिथे राहणाऱ्या लोकांना पण त्या गोष्टीची सवय आहे. त्यामुळे मैदानात एखादा कार्यक्रम झाला तर त्याच्या ध्वनीक्षेपकाचा काही त्रास लोकांपर्यंत एवढा व्हावा, मी म्हणेन की, बंधन असावे. वेळेचे पण बंधन असावे हे मान्य आहे. परंतु, तिथे स्पीकरचा त्रास होतो म्हणून तिथे बंदी आणावी असे मला वाटत नाही. आणि ती आणू नये अशी मी आपणास विनंती करते.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. श्रीम. प्रभात पाटील यांनी चांगला विषय आणला आहे. शाळेचे मैदान वगैरे भाड्याने देऊ नये. तिकडे कार्यक्रमांना परवानगी देऊ नये. असेच आमच्या शांतीनगर आणि शितल नगरमध्ये लेआऊटमधील आर.जी. आहेत. काही दिवसांपूर्वी तिकडे एका विकासकाने माझी जागा म्हणून क्लेम केले. जवळ-जवळ पंचवीस वर्षे जुनी आर.जी. आहे. आणि आता एखादा विकासक येतो आणि त्यावर क्लेम करतो की, माझी जागा आहे, आणि आपली महापालिका गेली तीन वर्षे त्याचे भाडे घेते. यावर्षी विकासकाने ऑब्जेक्शन घेतले. म्हणून परवानगी नाकारली. नेमके काय आहे? या आर.जी. लोकांच्या मालकीच्या आहेत की, नाहीत? या आर.जी. महापालिकेने हॅन्डओव्हर करुन घ्यायच्या आहेत की नाहीत? त्यांनी घेतल्या पाहिजेत की नाहीत? त्या जागांवर लोकांचा हक्क आहे की नाही तेपण बघितले पाहिजे. अशाच प्रकारे शांतीनगरमध्ये जवळ-जवळ अकरा सेक्टरमध्ये पंधरा आर.जी. आहेत. पंधरा आर.जी. मध्ये प्रत्येक ठिकाणी जर विकासक आपला क्लेम करत असेल, अजूनही एखादी आर.जी. विकास करण्यासाठी आम्ही पत्र दिले की, आम्हाला एका दिवसात उत्तर मिळते की, आर.जी. हॅन्डओव्हर झालेली नाही. २००७ ला कॉम्पलेक्स हॅन्डओव्हर झाले. आपण रस्ते बनवतो. आपण लाईट बघत, सिव्हरेज बघतो. पण आर.जी, विकासकाच्या याबद्दल नेमके काय धोरण आहे ते कळले पाहिजे. आणि याविषयी जर निवेदन करता आले, तर बरे होईल.

**मर्लिन डिसा :-**

मा. महापौर मॅडम, मला बोलायचे आहे. सेम विषय, कंटीन्यु. शितल नगर आणि शांती नगरमध्ये, फॉर एक्झाम्पल, सेक्टर ३ मध्ये जिथे मी राहते, तिकडच्या लोकांनी रिक्वेस्ट केली होती की, तिकडे गणपती

विसर्जन केले होते. त्यानंतर परत टेम्परररी लेक करुन रेसिडेन्सीअल एरिया मध्ये मधोमध. ते झाल्यानंतर तिकडे मुर्ती विसर्जन झाल्या. ते बंद करुन, त्यावर सगळे प्रकरण चालू असते. ते कितीपर्यंत मान्य आहे?

**नयना वसाणी :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय मी आपल्या कानी आणला होता. कारण ..................

**मर्लिन डिसा :-**

लेट मी कंटीन्यु. तिथेच मग वेगवेगळे कार्यक्रम, पॉलिटीकल प्रोग्राम, रिलीजिअस प्रोग्राम, गेम्स. ते मुलांना खेळण्यासाठी मैदान आहे. ते एक छोटेसे मैदान आहे. बाजूला पार्क आहे. तिथे तुम्ही एक चांगले धोरण ठरवून मुलांसाठी व पब्लीकसाठी जे आर.जी. आहेत. ते पब्लीकसाठीच युज होऊ द्या. आणि शितलनगरमध्ये पण ज्या आर.जी. आहेत त्या मी गेल्या सहा वर्षापासून तिकडे प्रयत्न करत होते. थोडे डेव्हलप झाले होते. बाकीचे अजून आहे. तर तिकडच्या रेसिडेन्शीअल लोकांची आर.जी. आहे. ती त्यांना मिळाली पाहिजे. आणि ती त्यांच्यासाठी युज व्हायला पाहिजे.

**नयना वसाणी :-**

मा. महापौर मॅडम, मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा यांनी जे सांगितले, जे कृत्रीम तलाव आहे ते माझ्या प्रभागात, सेक्टर ३ मध्ये करण्यांत आले होते आणि त्याच्यासाठी मी आपल्याला निवेदन पण दिले होते. महापालिकेने तिकडच्या स्थानिक नगरसेवकांना विश्वासात न घेता, त्या कृत्रिम तलावाचे निर्माण केलेले होते आणि सेक्टर ३ हा असा एरिया आहे, ज्याच्यामध्ये यायला-जायला फक्त एकच रस्ता आहे. सो इमर्जन्सीच्या वेळेला तिकडे त्या कृत्रिम तलावामुळे खूप त्रास होऊ शकतो हे मी सांगितल्यावर सुध्दा तेव्हा पोलिस प्रोटेक्शनमध्ये ते कृत्रिम तलाव निर्माण करण्यांत आलेले होते आणि त्याला स्थानिक नगरसेवकांनी विरोध केला होता. तर माझी अशी सुचना आहे की, पुढच्या वेळेला असे काही आर.जी. प्लॉट किंवा त्या रहिवासी एरियांना त्रास होणार असेल असे काही आपण करणार असाल तर ॲटलिस्ट स्थानिक नगरसेवकांबरोबर मिटींग घेऊन, त्यांना सुचित करुन, त्यांना विश्वासात घेऊन करावे. त्यामुळे तुम्हाला तिकडच्या काय समस्या आहेत, त्या सांगता येतील. आणि मा. सदस्य श्री. प्रमोद सामंत यांनी पण जे सांगितले की, जे आर.जी. प्लॉट आहेत, त्यांच्यावर नेमकी मालकी कोणाची? विकासकाची? प्रशासनाची? की, लोकांची? तर यापूर्वी मी मा. आयुक्तांना पत्र दिलेले आहे की, हे जे आर.जी. प्लॉट आहेत, ते आपल्याकडे ऑलरेडी महाराष्ट्र कायद्यानुसार ज्या सुचना आपल्याकडे आलेल्या आहेत. तर आपण विकासकांना सांगावे की, तुम्ही डेव्हलप करुन द्यावे किंवा प्रशासनाने ताब्यात घेऊन त्या डेव्हलप कराव्या. अशा सुचना आपल्याला ऑलरेडी आलेल्या आहेत. तर आपण त्या ताब्यात घ्याव्या आणि जे कृत्रिम तलाव वगैरे करायचे असतील. ते एखाद्या आर.जी. प्लॉट वर कराव्या. जिकडे रहिवाशांना त्रास होणार नाही. आणि आपल्याला सुप्रिम कोर्टच्या नियमांचे पण पालन करता येईल.

**दिप्ती भट्ट :-**

मा. महापौर मॅडम, मी सेक्टर नं. ११ चे लेटर ऑलरेडी दिलेले आहे. आणि तिकडे आर.जी. मध्ये पंचवीस वर्षे झालेली आहे. त्यांनी जेव्हा बिल्डींग बांधायला दिली, तेव्हा आपण त्यांना परमिशन देण्यासाठी नोटस् देतो की, काय नियम लागतात. त्या नियमांमध्ये त्यांनी असे सांगितले आहे की, गार्डन्समध्ये जे रस्ते, पाणी आणि स्ट्रीट लाईट, सर्व हॅन्डओव्हर केले आहेत. तर ज्या सोसायटींना जागा दिलेल्या आहेत. त्या सोसायटीची ऑथोरीटी आहे. तर आमच्या इकडे सर्व सोसायटींनी अर्ज केलेले आहेत. आणि मा. आयुक्त साहेबांकडे ते लेटर दिलेले आहेत. साहेबांनी हो बोलले आहेत. २०१३ च्या पण २०१३-१४ च्या या बजेटमध्ये, गार्डन विकसित, सेक्टर नं. ११, पाण्याच्या टाकीचे बनवून देण्यांत यावे अशी विनंती आहे. कारण तिकडे ऑलरेडी सगळ्या सेक्टरचे अतिक्रमण करुन ठेवलेले आहे आणि आता नविन बिल्डर येतात आणि सातबारावर नावे दाखवतात आणि बोलतात की, ही सगळी जागा आमची आहे. दोन-तीन बिल्डर आले आहेत. दादागिरी करतात आणि जेवढ्या आर.जी. आहेत. त्याच्यामध्ये बिल्डर आणि विकासकांनी स्वतःची माणसे बसवून तिकडे अनधिकृतपणे बिझनेस चालू केलेले आहेत. आणि त्याचे भाडे घेतात. तिकडे ड्रग्ज व चरसचे धंदेपण चालतात. तर आपल्या अतिक्रमण विभागाला आणि प्रभाग अधिकाऱ्यांना सांगून त्या सगळ्या जागा मोकळ्या करुन देण्यांत याव्या.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, श्री. प्रमोद सामंत यांनी शांतीनगरच्या विषयावर जे सांगितलेले आहे. तो विषय मी पाच-सहा महिन्यांपूर्वी इकडे मा. महासभेमध्ये आणलेला होता की, शांतीनगरमध्ये जेवढे आर.जी. प्लॉट आहेत, तिथे गटार, रोड वगैरे सगळे शांती नगरला महानगरपालिकेने बनवून दिलेले आहेत. आणि जे आर.जी. प्लॉट आहेत, ते बिल्डर सांगतात की, ते माझ्या ताब्यात आहेत. ते महानगरपालिकेला काही करण्यांत येत नाही. तसेच सेक्टर ३ मध्ये ग्राऊंडमध्ये जे कृत्रिम तलाव झाले, तिकडे स्टेज बनवले होते. त्याच्यावर आम्ही शेड लावायचे काम केले होते. तर तिकडे बिल्डरच्या माणसांनी ती शेड तोडून टाकली. नंतर मी मा. आयुक्त साहेबांना घेऊन गेलो आणि तिकडे आता परत शेड लावण्यांत आली. म्हणजे आम्हाला तिकडे काही माहिती

नाही की, जे आर.जी. प्लॉट आहेत. ते आपल्या नगरपालिकेकडे हॅन्डओव्हर आहेत? लोकांचे आहेत की, अजूनपर्यंत बिल्डरचे आहेत? जर बिल्डरने त्याची एफ.एस.आय. वापरली, तर ते बिल्डरचे कसे? आणि दुसरा प्रश्न असा आहे की, जे शांतीस्टारचे बिल्डर आहेत. त्यांनी जे आर.जी. प्लॉट आहेत, त्याची आम्हाला माहिती पडले पाहिजे की, हे लोकांसाठी आहे आणि हे माझे आहे. आणि जर त्यांनी कुठलाही आर.जी.प्लॉट डेव्हलप करुन दिला नाही, त्यांनी आपल्याला आर.जी.प्लॉट डेव्हलप करुन द्यायला पाहिजे, त्यांनी डेव्हलप करुन दिला नाही ...............

**प्रभात पाटील :-**

विषय वेगळा आहे. ते आर.जी. चा विषयी बोलतात.

**मा. महापौर :-**

मॅडम, तुम्ही ठराव मांडता का?

**दिनेश जैन :-**

आता त्याला आपण सेक्टर ७ मध्ये टॉवर बनविण्याची परवानगी दिली. तर आपण त्याला थांबवले पाहिजे की, पहिले तू कोणते आर.जी. आहेत, ते महानगरपालिकेला हॅन्डओव्हर कर. नाहीतर तुम्हाला कोणत्याही परवानगी देणार नाही. आपण त्यांना परमिशन देतो म्हणून तिकडे त्यांची दादागिरी होणारच. म्हणून तुम्ही तिकडे लक्ष द्या.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, हा विषय आहे म्हणून मी माझी बाजू मांडायला, माझ्या जे मनात आहे ते सांगायला मी उठलो. सभागृह सुरु झाले तेव्हाच श्री. धनेगावे साहेब आणि श्री. मदन सिंग यांचे अर्धा तास आरक्षणाबाबत प्रश्न-उत्तर सुरु होते, हा विषय परत तिथेच येऊन थांबतो. आपल्याकडे या शहरामध्ये बरीच आरक्षणे आहेत. आपल्याला योगायोगाने चांगले अधिकारी प्राप्त झालेले आहेत, ज्यांनी आयुष्य महसुल, लॅन्डरिव्हेन्युमध्ये काढलेले आहे. आमच्याकडे कुठलीही आरक्षणाची जागा ताब्यात घेण्यासाठी भुसंपादन अधिकारी नेमावा लागतो. त्या नियमामध्ये, तरतुदीमध्ये तसे आहे. ते धोरण आम्ही आजपर्यंत कधी ठरवलेच नाही. तुम्हाला इथे जेवढी संधी प्राप्त आहे. मा. आयुक्त म्हणून सध्या तुमच्याकडे तात्पुरता चार्ज आहे. मा. आयुक्त परत येतील, तरीही तुम्ही आमच्याकडे अतिरिक्त आयुक्त म्हणून काम पाहणार आहात. साहेब, तुमच्या माध्यमातून तरी हे काम होऊन जाऊ द्या. आरक्षणे ताब्यात आली नाहीत तर आमच्या या शहराचे मोठे नाट्यगृहाचे आरक्षण आमच्या हातातून गेले. कारण आम्ही ते ताब्यात घेऊच शकलो नाही. आणि आज परिस्थिती अशी आहे की, त्या विकासकाने ती जागा विकली. कोर्ट मॅटर झाले आहे. त्याच्यावर एफ.आय.आर. लॉज झाली आहे. त्या विषयावर बरेच काही झाले. आता कुठेतरी आमच्या प्रशासनाचा हलगर्जीपणा आहे म्हणून आमची जागा आमच्या हातातून जाते. आज याच सभागृहामध्ये सानुग्रह अनुदान, आम्ही क्लास १ च्या अधिकाऱ्यांना देऊ शकत नाही. कारण त्यांचा पगार तेवढा आहे. क्लास २, क्लास ३, क्लास ४, प्रत्येक अधिकाऱ्यांना आम्ही काही-ना-काही दिलेले आहे. आम्ही याकरीता देतो की, जे आमच्याकडे काम करतात, त्यांच्या आर्थिक व्यवस्थेवर आम्हाला लक्ष दिले पाहिजे. मात्र त्यांनी कमीत कमी त्यांची जी कामे आहेत ती कामे केली पाहिजेत. त्यांनी आपला पाठपुरावा करावा. या शहराला त्यांच्या माध्यमातून काहीतरी फायदा झाला पाहिजे.

**मा. महापौर :-**

श्री. जुबेर इनामदारजी, मा. आयुक्त साहेबांना सांगते की, साहेब आपली जी आरक्षणे आहेत, ते काम तुम्ही सर्वप्रथम चालू करा. तुम्हाला प्रॉपर्टीचे जास्त नॉलेज आहे. तुम्ही सर्वात पहिले ते काम स्टार्ट करा. जी आपली आरक्षणे आहेत, ती आपल्या ताब्यात घ्या. आमच्या शहराला कोणी काही चांगले केले असे, वी विल बी वेरी हॅपी. इफ यू स्टार्ट विथ धिस वर्क. आता तुम्ही ठराव मांडा.

**प्रभात पाटील :-**

नवघर शाळेचे मैदान हे मनपाचे आरक्षण नाही. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद पासून ते शाळेचे मैदान आहे. आणि शाळेच्या मैदानावर पहिला हक्क हा त्या शाळेच्या विद्यार्थ्यांचा आहे. शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना खेळ आणि इतर उपक्रमांपासुन वंचित ठेवून इतर कार्यक्रमांना मैदान देऊन खोदुन / बुजवुन / उखडून त्याच्या बकालपणात भर पडत आहे.

शिवाय कार्यक्रमांदरम्यान लागणाऱ्या स्पिकर्स आणि डी.जे. सारख्या इतर वाद्यांमुळे शांततेचा भंग होत असतो. कारण नवघरचे मैदान हे मध्यवर्ती ठिकाण आहे. आजुबाजुला नागरी वस्ती आहे. तसेच तेथे मनपाची शाळा आहे. पालिकेचे आरोग्य केंद्र आहे. जेष्ठ नागरीकांचे विरंगुळा केंद्र आहे. मॉर्निंग वॉकसाठीचा जॉगिंग ट्रॅक आहे. ह्या सर्व बाबी ध्यान्यात घेऊन हे मैदान यापुढे कोणत्याही खाजगी / वैयक्तीक / सार्वजनिक कार्यक्रमांसाठी भाड्याने देऊ नये तसेच मनपाच्याही इतर कोणत्याही स्थायी कामासाठी वा योजनेसाठी त्याचा वापर केला जाऊ नये. त्याचे आजचे स्वरुप व स्वातंत्र्य आहे तसे जोपासले जावे. तसेच मिभामनपाच्या दि. ३०/१२/२०११, ठराव क्र. ८७ व दि. २०/०३/२०१३ रोजीच्या ठरावातून नवघर मनपा शाळेचे मैदान भाड्याने देण्याची बाब काढून टाकण्यात यावी. तसेच ह्यापुढे कोणत्याही शाळेचे मैदान सार्वजनिक कामासाठी देण्यात येऊ नये. शाळेच्या मैदानात फायर फायटर ठेवण्याची सोय करण्यात येऊ नये. मनपा शाळेच्या पाठीमागे असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ फायर फायटर ठेवण्याची सोय करण्यात यावी.

**वंदना चक्रे :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, याच्यामध्ये एक सुचना आहे की, सदरहू मैदान एज्युकेशन आणि स्पोर्टस् करिता जर कोणी मागितले. तर त्यांना देण्यांत यावे.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे जे मैदानाबद्दल बोलतात. तर मागच्या वेळेला २००८ साली हा ठराव झालेला आहे. तर या विषयावर परत ठराव होऊ शकतो का? आणि जो ठराव झालेला आहे , त्याची अंमलबजावणी का झाली नाही? यापूर्वी या विषयावर ठराव झालेला आहे का याबद्दल प्रशासनाने माहिती द्यावी.

**राजेंद्र जैन :-**

श्री. पाटील साहब ने बोला की, जो बेसिक मुद्दा यह था की, स्कुल के बच्चों के लिए सुविधा रखनी चाहिए। और श्री. पाटील साहब बोल रहे है की, स्पोर्टस् और एज्युकेशन के लिए रखो। तो बात वही हो गई की, कोई और जगह से एज्युकेशन या स्पोर्टस् के लिए आए तो बच्चों को सुविधा नही मिलेगी।

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, मिरा भाईंदरमध्ये भरपूर शाळा आहेत. त्या शाळांमध्ये ग्राऊंड नाहीत. जर त्यांना स्पोर्टस् ॲक्टीव्हीटी करायच्या असतील. तर आपल्याकडे मैदानपण नाहीत. जर कोणती शाळा तिकडे स्पोर्टस् ॲक्टीव्हीटी करत असेल, तर त्यांना ते ग्राऊंड अवेलेबल करुन द्यावे लागेल. असे कुठलेही स्पोर्टस् किंवा एज्युकेशन परपजसाठी असेल तर तुम्ही अलाऊ करा.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आग्रह करतो की, त्याच्या मागच्या बाजूचे ग्राऊंड तुम्ही महिन्याभरामध्ये तयार करा. हे सभागृह तुम्हाला विनंती करते. त्यात काय अडचण आहे? या मैदानाच्या ऐवजी त्याच्या मागच्या बाजूला जे मैदान आहे, ते डम्पींग लेव्हलींग केले, तर एक महिनापण लागणार नाही. हा वादविवाद कशाला पाहिजे. तिथे शांतता होईल. ते मैदान चालू होईल.

**प्रभात पाटील :-**

श्री. रोहिदास पाटील बोलतात त्या भुमिकेशी मी सहमत आहे. कारण तिथे मार्केटसाठी प्रोव्हिजन होते. परंतु, माझ्या माहितीनुसार ती जागा ताब्यात आलेली नाही. त्यामुळे तो भाग तसाच पडून आहे. तिथे लेव्हलिंग केले तर चांगले मैदान होऊ शकते. त्या जागेचा उपयोग जेवढया ट्रॅव्हल्स कंपनीच्या गाड्या आहेत त्या विना तुमची परवानगी पार करता, आपल्याला एका पैशाचे उत्पन्न नाही. मात्र जागेचा पुरेपुर वापर होतो. मग ती जागा आपण आपल्यासाठी घ्या. म्हणजे सपाटीकरण केले तर चांगले मैदान होऊ शकते.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्या. आम्ही विचारतो तिकडे तुम्ही लक्षच देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

ताईंच्या मुळ ठरावामध्ये मिरारोडचे आरक्षण क्र. १७०, आला हजरत ग्राऊंड त्याचाही समावेश करण्यांत यावा.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सदरच्या मैदानाबद्दल यापूर्वी ठराव झालेला आहे का? आम्हाला फक्त याची माहिती द्या.

**मा. महापौर :-**

झालेला आहे.

**प्रविण पाटील :-**

काय ठराव झालेला आहे?

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. नवघर शाळेच्या बाबतीत पहिला ठराव मा. स्थायी समिती सभा दि. ८/११/२००४ मध्ये झाला. ठराव क्र. ११७. त्यावेळेला फक्त बिरहा कार्यक्रमाकरिता देऊ नये असा ठराव झालेला. त्यानंतर पुन्हा दि. १७/०१/२०१० ला झाला की, कुठल्याही कार्यक्रमाकरिता भाड्याने देण्यांत येऊ नये. त्यानंतर पुन्हा दि. ३०/१२/२०११ मध्ये ठराव झाला. ठराव क्र. ८७ त्याच्यामध्ये नवघर शाळेचे मैदान भाड्याने देण्याबाबत भाडे ठरवले. त्यानुसार आतापर्यंत कार्यवाही करण्यांत येते.

**प्रविण पाटील :-**

जो शेवटचा ठराव झाला होता. त्याच्यामध्ये किती दिवसासाठी द्यायचे ठरलेले होते? आपण जास्तीत जास्त किती दिवस देऊ शकतो?

**दिपक खांबित :-**

वर्षातून तीस दिवस.

**प्रविण पाटील :-**

कोणते? कंटीन्यु?

**दिपक खांबित :-**

एम.आर.टी.पी. ॲक्टनुसार................

**प्रविण पाटील :-**

एका वेळेला?

**दिपक खांबित :-**

त्याबाबत असे काही ठरले नव्हते.

**प्रविण पाटील :-**

तो ठराव असताना आपण हा ठराव करु शकतो का?

**मा. महापौर :-**

करु शकतो तीन महिन्यानंतर ठराव करु शकतो.

**प्रविण पाटील :-**

मग मॅडम, आज जो ठराव होतो त्यामध्ये असे द्या की, ते विवाहासाठीपण देऊ शकत नाही त्या विभागामध्ये ते एकमेव मैदान आहे.

**मा. महापौर :-**

ते कशासाठीच द्यायचे नाही फक्त शाळेसाठी आहे. बाकी कोणासाठीच नाही.

**प्रविण पाटील :-**

पण मॅडम, त्या विभागामध्ये दुसरे मैदानच नाही.

**निलम ढवण :-**

मॅडम, एक सुचना आहे की, जर हे मैदान बंद करायचे असेल तर जसे काकांनी सांगितले की, मागचे जे मैदान आहे, ते विकसित करा तर ते विकसित केल्यानंतर तुम्ही हे मैदान बंद करा अशी मी सुचना करते.

**दिपक खांबित :-**

एस.एन. कॉलेजच्या समोर जी जागा आहे त्यामध्ये जी काही माती आहे ती माती काढणे, लेव्हल करणे आणि मैदान करणे याकामी काम पास झाले आहे. वर्क ऑर्डर पण दिली पण चार पाच दिवस पाऊस पडतो त्यामुळे ते काम सुरु करता आले नाही ते काम सुरु करुन महिन्याभरामध्ये ते मैदान करायचे आहेच आणि आपण तिकडे पार्किंग पण करणार आहोत.

**निलम ढवण :-**

मग तेच जे मागचे मैदान सांगता ते विकसीत झाल्यानंतर या मैदानावर बंदी जर महिनाभरात होत असेल तर महिनाभर थांबायला काही हरकत नाही त्यानंतर तुम्ही या मैदानावर तुम्ही कार्यक्रमांना बंदी करु शकता अशी मी सुचना मांडते.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही जो श्रीम. वंदना पाटील यांच्या पत्राचा उल्लेख केला आणि मीसुध्दा एक पत्र दिले आहे की, त्यांना फायर फायटर हीसुध्दा अत्यावश्यक बाब आहे.त्याला सुध्दा कुठेतरी ठिकाण दिले पाहिजे त्याची सोय करण्यात आली पाहिजे ती आपली बाजु आहे त्याकरीता मी पत्र दिले आहे.

**मा. महापौर :-**

फायरवाल्यांचे मी तुम्हाला सांगते माझी श्री. पानपट्टे साहेबांशी चर्चा झाली ते बोलले की, तो एक ग्राऊंड असा मध्ये आहे आणि तिकडे रोडपण ब्रॉड आहे तिथून फायरची गाडी जाऊ शकते बाकी सर्व ठिकाणी रोड छोटे आहेत आणि वेस्टमधुन किंवा कुठून गाडी जाता जाता आग फुल फ्लेजमध्ये होते त्यावेळी मी त्यांना समजावले त्यांना मी सांगितले की, जर एका कोपऱ्यात होत असेल तर काही प्रॉब्लेम नाही कारण हा शहराचा प्रश्न आहे.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, त्याच्या मागेच मैदान आहे आपण जे सपाटीकरण बोलतो, तिथेच पाण्याची टाकी आहे आणि तिथे जागासुध्दा आहे तिकडे फायर फायटर भरायला पाणी सुध्दा उपलब्ध होऊ शकते दोन्ही गोष्टी तिथे एकत्रितरीत्या होऊ शकतात कारण आपला सम्प आणि पम्प दोन्ही गोष्टी तिथे आहे आणि जागा आहे.

**दिपक खांबित :-**

मॅडम, ज्या रस्त्यावर संध्याकाळी बाजार भरतो.

**प्रभात पाटील :-**

फक्त संध्याकाळी.

**दिपक खांबित :-**

गाडी येऊ शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

संध्याकाळी तिकडे ट्राफिक असते, मार्केट असते सगळ्या गोष्टी मला मान्य आहेत तुम्हाला गाडी निघायला प्रॉब्लेम होईल पण साहेब आग रोज लागत नाही हा एक भाग आहे.

**दिपक खांबित :-**

मॅडम, ही तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था आहे फक्त गाडी उभी करण्याकरीता एक शेड बांधतो.

**प्रभात पाटील :-**

जर तिकडे काहीच द्यायचे नाही तर फायर फायटरपण नको तुम्हाला एक गोष्ट तुम्हाला सांगते, तुम्ही जर असा विचार केला मला वाटते चार वर्षापूर्वी कोणीतरी आपल्या डोक्यामध्ये टाकले की, नवघरच्या शाळेची लांबी रुंदी कमी करा आणि नवघर नाका रुंद करा नवघर नाका रुंद करुन आज फेरीवाल्यांची सोय झाली आहे मैदानाची लांबी रुंदी कमी झाली, मैदान लहान झाले त्याचे काय? आणि आज तुम्ही आत्ता आणखीन कमी झालेल्या जागेमध्ये फायर फायटर ठेवणार हे चालणार नाही.

**दिपक खांबित :-**

मॅडम, तो मैदाना समोरचा डी.पी. रस्ता आहे. तो डी.पी. रस्ता करण्याकरीता आपण त्या मैदानाची रुंदी कमी केली

**प्रभात पाटील :-**

पण त्याचा फायदा झाला का?

**दिपक खांबित :-**

होईल.

**प्रभात पाटील :-**

कधी होणार आहे?

**दिपक खांबित :-**

मैदानासमोर एम.टी.एन.एल चे चार बॉक्स आहेत ते आम्ही शिफ्ट करतो ते शिफ्ट केल्यानंतर दुसऱ्या बाजुचा रस्ता सुरु होईल.

**प्रभात पाटील :-**

तिथे सगळे फेरीवाले बसतात सगळ्या फेरीवाल्यांनी तो भाग व्यापलेला आहे. त्याचा काही फायदा झाला नाही फायर फायटरची गाडी तिथे रोज येत नाही आणि तुमची फायर फायटरची गाडी येत असेल तर नक्कीच ते फेरीवाले किंवा मार्केटमधील लोक बाजुला होणार तेव्हा तुम्ही ती सोय मागेच करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्या मैदानाची लांबी रुंदी किती आहे? म्हणजे मैदान सफीशिएन्ट आहे का?

**प्रभात पाटील :-**

आपण त्या फेरीवाल्यांचा विचार करता आपण फेरीवाले हटवा

**दिपक खांबित :-**

ते मैदान लहानच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

समजा फायरसाठी जागा केली.............

**दिपक खांबित :-**

फायरची गाडी वीस बाय वीस फुटाची सोडायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आम्हाला कॉर्नरला हजार स्क्वेअर फीट जागा पाहिजे मॅक्झीमम धोकादायक बिल्डींग त्या साईटचा आहे उद्या काय झाले तर................

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग तुम्ही तो विषय व्यवस्थित आणा.

**दिपक खांबित :-**

आणि आपण तो जॉगिंग ट्रॅक त्याप्रमाणे पूर्ण नवीन रिन्युएट करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही मा. महासभेत व्यवस्थित एक विषय आणा.

**प्रभात पाटील :-**

विषय आणूच नका. आत्ता एका विषयाची तुम्ही तिथे परवानगी देत नाही आणि तिथे दुसरा विषय कशाला आणता? फायर फायटरची गाडी तिथेच ठेवा जिथे जागा आहे.

**मा. महापौर :-**

तिकडे सगळ्यांचेच ऑब्जेक्शन आहे. श्रीम. वंदना विकास पाटील यांनी मला दोन महिन्यांपूर्वी जेव्हा ते टेंडर पास झाले त्याचवेळी मला सांगितलेले. परंतु, मी. श्री. पानपट्टे साहेबांना बोलावले तेव्हा त्यांनी सांगितले की, मॅडम कुठे जागा नाही म्हणून मी त्यांना शांत केले परंतु, जर गावाचेच ऑब्जेक्शन आहे आणि सर्व लोकांचेच ऑब्जेक्शन आहे तर मग आपण ते कुठेतरी शिफ्ट करु.

**प्रकरण क्र. ४८ :-**

सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- नवघर शाळेच्या मैदानाबाबत.

**ठराव क्र. ४७ :-**

नवघर शाळेचे मैदान हे मनपाचे आरक्षण नाही. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद पासून ते शाळेचे मैदान आहे. आणि शाळेच्या मैदानावर पहिला हक्क हा त्या शाळेच्या विद्यार्थ्यांचा आहे. शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना खेळ आणि इतर उपक्रमांपासुन वंचित ठेवून इतर कार्यक्रमांना मैदान देऊन खोदुन / बुजवुन / उखडून त्याच्या बकालपणात भर पडत आहे.

शिवाय कार्यक्रमांदरम्यान लागणाऱ्या स्पिकर्स आणि डी.जे. सारख्या इतर वाद्यांमुळे शांततेचा भंग होत असतो. कारण नवघरचे मैदान हे मध्यवर्ती ठिकाण आहे. आजुबाजुला नागरी वस्ती आहे. तसेच तेथे मनपाची शाळा आहे. पालिकेचे आरोग्य केंद्र आहे. जेष्ठ नागरीकांचे विरंगुळा केंद्र आहे. मॉर्निंग वॉकसाठीचा जॉगिंग ट्रॅक आहे. ह्या सर्व बाबी ध्यान्यात घेऊन हे मैदान यापुढे कोणत्याही खाजगी / वैयक्तीक / सार्वजनिक कार्यक्रमांसाठी भाड्याने देऊ नये तसेच मनपाच्याही इतर कोणत्याही स्थायी कामासाठी वा योजनेसाठी त्याचा वापर केला जाऊ नये. त्याचे आजचे स्वरुप व स्वातंत्र्य आहे तसे जोपासले जावे. तसेच मिभामनपाच्या दि. ३०/१२/२०११, ठराव क्र. ८७ व दि. २०/०३/२०१३ रोजीच्या ठरावातून नवघर मनपा शाळेचे मैदान भाड्याने देण्याची बाब काढून टाकण्यात यावी. तसेच ह्यापुढे कोणत्याही शाळेचे मैदान सार्वजनिक कामासाठी देण्यात येऊ नये. शाळेच्या मैदानात फायर फायटर ठेवण्याची सोय करण्यात येऊ नये. मनपा शाळेच्या पाठीमागे असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ फायर फायटर ठेवण्याची सोय करण्यात यावी.

***सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील       अनुमोदक :- सौ. वंदना विकास पाटील***

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४९, सन्मा. सदस्य श्री. अशरफ मेहमुद शेख यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर ‘‘ना फेरीवाला क्षेत्र’’ घोषीत करणेबाबत.

**अशरफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, मी ठराव वाचतो.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठराव मांडता त्या विषयावर आम्हाला चर्चा करायची आहे.

**अशरफ शेख :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि.१९/०७/२००८ प्रकरणक्र.२७ ठराव क्र. २९ मिरा भाईंदर महानगरपालिका शहराकरीता ना-फेरीवाला व फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले. त्यात मिरा रोड पुर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या समोरील दोन्ही बाजुचा परिसर फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषीत करण्यांत आले होते. सदर ठिकाणी फेरीवाले, फळ विक्रेते, भाजी विक्रेते आपल्या हातगाड्या दुकानांच्या समोर लावतात आणि त्यामुळे शाळांच्या बसेस व महापालिका परिवहन सेवेच्या बसेसच्या रहदारीस अडथळा निर्माण होतो व मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होते. याचा परिणाम सदर रस्त्यावरुन ये-जा करणा-या नागरीकांना, शालेय विद्यार्थ्यांना, वृध्द नागरीकांना ये-जा करण्यास फार अडचण होते व प्रसंगी विलंब सहन करावा लागतो. क्षेत्रातील रहिवाशांच्या वारंवार येणा-या तक्रारीच्या अधिन राहून **नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर ‘‘ना फेरीवाला क्षेत्र’’** घोषीत करण्यांत येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मुळ ठरावामध्ये एक सुचना आहे. केंद्र शासनाने सन २००९ मध्ये जाहीर केलेल्या राष्ट्रीय फेरीवाल्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश मा. सर्वोच्य न्यायालयाने दिलेले आहेत. शहरामध्ये फेरीवाल्यांसाठी स्ट्रीट व्हेण्डर्स (प्रोटेक्शन ऑफ लायव्हीलीहूड अँण्ड रेग्युलेशन ऑफ स्ट्रीट व्हेंडींग) बिल-२०१२ हे प्रस्तावित कायद्याचे विधेयक लोकसभेने मंजूर केले आहे.

त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर शहरामध्ये फेरीवाल्यांचे नियोजन करण्यासाठी धोरणाच्या माध्यमातुन आवश्यक उपाययोजना करावी, अशी मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषय चांगला आहे. हा विषय मा. महासभा, स्टँडींग, प्रत्येक ठिकाणी निघतो. आज बाळाराम पाटील रस्ता एवढा गजबजलेला रस्ता आहे आणि तो ना फेरीवाला क्षेत्र म्हणून जाहिर आहे सगळे असतानाही तिथून फेरीवाल्यांना उचलले जात नाही आणि त्या रस्त्यावरील जी दुकाने आहेत त्या दुकानांचा माल उचलून घेऊन जातात आणि त्याची कोणतीही एन्ट्री आपल्या महापालिकेत नसते त्यामधील माल गहाळ झालेला असतो आणि शेवटी आपण फाईल भरुन तो माल परत देतो. पण त्याची कोणतीही एन्ट्री आणि कोणताही लेखा जोखा आपल्या महापालिकेतर्फे नसतो आज दिवाळीचा सिजन आहे आम्ही सांगत नाही की, दुकानवाल्यांनासुध्दा फुटपाथवर लावुन द्या पण जेव्हा आपण फेरीवाल्यांनाच उचलत नाही तर जेव्हा फेरीवाले बसतात तेव्हा पुण दुकान झाकले जाते आज लाखो करोडो रुपयांची दुकाने घेऊन ते लोक बसलेले आहेत आणि आपण त्यांचा माल उचलतो फेरीवाल्यांचा माल उचलायचा तो उचलला जात नाही कारण जेव्हा आपली गाडी गोडदेव नाक्यावर येते त्यावेळेला त्यांना फोन जातो की, आत्ता गाडी येते आहे. तुम्ही उचलून घेऊन जा म्हणून ते उचलून घेऊन जातात आत्ता दुकानवाले तर तिकडुन पळून जाऊ शकत नाही दुकानवालयांचा जो माल बाहेर असतो तो आपले कर्मचारी उचलून घेऊन जातात आणि त्यामधील काही वस्तु गायबपण होतात तर आत्ता दिवाळीच्या सीझनमध्ये जे काही पाच सहा दिवस आहेत तेव्हा दुकानवाल्यांना त्रास देऊ नये आणि दिला तर तुम्ही फेरीवाल्यांनापण हटवा त्यांचे म्हणणे आहे की, आमच्या समोर फेरीवाले नाही पाहिजेत मग तुम्ही एकदा फेरीवाल्यांना काढा आणि दुकानवाल्यांना सांगा की, तुमचा माल फुटपाथवर नाही पाहिजे जर फेरीवाले निघत नसतील आणि त्यांचा माल फुटपाथवर असेल तर ते काय करतील?

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळी ही कारवाई होते तेव्हा त्या फेरीवाल्यांना सुचना मिळते. फेरीवाले गाड्या घेऊन निघुन जातात दुकानदारांच्या साड्या लटकलेल्या असतात. आपले कर्मचारी गेले, फेरीवाले निघुन गेले की, साड्या खेचुन जातात आणि त्याची कुठेही नोंद राहत नाही आणि त्यामधुन असंतोष होतो आहे.

**शरद पाटील :-**

नाफेरीवाला आणि फेरीवाला क्षेत्रावर कुठेच कारवाई होत नाही.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझी अशी सुचना आहे,

की, मागच्या वेळेला फेरिवाला क्षेत्रामध्ये एका एरियाचे नाव नमुद केले होते. त्यानंतर २००७ ला घेऊन आले. तर ते अजून अमलात आले नाही. त्याचे नावच आलेले नाही. तो विजय पार्क पासून जांगिड कॉम्पलेक्स पर्यंतचा एरिया आहे. आणि दुसरा प्लेझेंट पार्कमध्ये दोन्ही साईडला. आम्ही त्याची सुचना मांडली होती. पण ते अजूनपर्यंत आले नाही. तर आमची ती सुचना समाविष्ट करुन घ्यावे. ते फेरिवाला क्षेत्र व्हावे अशी मी सुचना मांडते. ती जागा रुंद आहे. कोणाला अडचण होण्यासारखी नाही. आम्ही पत्रव्यवहार पण केलेले आहेत.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, श्री. शेख साहेबांनी जो ना फेरिवाला क्षेत्राबाबतचा ठराव मांडला आहे किंवा श्रीम. वंदना चक्रे मॅडमनी सुचना मांडल्या आहेत. ना फेरिवाला क्षेत्राबाबत या सुचना खरोखर चांगल्या आहेत. परंतु, ना फेरिवाला क्षेत्र फक्त ठरावात मांडून, तो पास करुन त्यांचा जो उद्देश आहे, तो उद्देश यापुढे साध्य होईल का? कारण मिरा भाईंदरमध्ये असे बरेच ना फेरिवाला क्षेत्र आहेत, जसे नवघर रोड, बी.पी. रोड वगैरे. मग वेळोवेळी तक्रारी करुन देखील तिथे भरपूर ॲक्सीडंट देखील झालेले आहेत. त्या संदर्भात तक्रारी करुन देखील आजपर्यंत ते ना फेरिवाला क्षेत्र कुठेही खाली केलेले दिसत नाहीत. तात्पुरती एखाद्या दिवशी कार्यवाही होते. तर आतल्या गल्लीमध्ये फेरिवाले फिरतात, पळतात आणि परत पाच मिनिटे गाडी पुढे गेली की, ते पुन्हा बाहेर येतात. मग याच्यावर कायम स्वरुपी कारवाई होणार आहे की नाही? कारण फक्त ना फेरिवाला क्षेत्र जाहिर करायचे आणि रोजचे आहे ते चालू राहणार आहे. मग हे जाहिर करण्यात काय अर्थ आहे. प्रत्येकाचा उद्देश आहे. सगळे नगरसेवक या मताशी सहमत असतील.

**नयना वसानी :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते. शांती नगरमध्ये जे सगळे रस्ते आहेत. जास्त करुन जे रस्ते आहेत ते तीस फुटाहून कमी रुंदीचे आहेत. आणि तिथे ना फेरिवाला क्षेत्र जाहिर असून सुध्दा तिथे फेरिवाले बसतात. त्यांच्यावर काही कारवाई होत नाही आणि जेव्हा प्रभाग अधिकारी किंवा अतिक्रमण अधिकारी यांना विचारले जाते, तेव्हा आम्हाला असे सांगितले जाते की, आमच्याकडे पुरेसा स्टाफ नाही. आम्ही प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये एक ठराव केलेला होता आणि अशी चर्चा केलेली होती की, जिथे ना फेरिवाला

क्षेत्रामध्ये फेरिवाले बसतात, त्यांचे अतिक्रमण दूर करण्याकरिता आपण होमगार्डस् किंवा एक्स्ट्रा स्टाफची मदत घ्यावी आणि याला कायम सोल्युशन आणावे आणि ही कारवाई कंटीन्यु करावी. एक दोन दिवसांची नाही तर कंटीन्यु केली तर त्यांच्यावर जरब बसेल.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, माझी एक सुचना आहे की, जे फेरिवाला आणि ना फेरिवाला क्षेत्र आहेत. तिकडे कुठेही आपण पाट्या लावलेल्या नाहीत. मिरारोडमध्ये किती जागा आहेत .............

**मा. महापौर :-**

लावलेल्या आहेत.

**दिनेश जैन :-**

मिरारोड शांतीनगरमध्ये फेरिवाला आणि ना फेरिवाला क्षेत्राच्या पाट्या नाहीत. आम्ही ठराव पण केला होता.

**मा. महापौर :-**

मी मिरारोडलाच बघितलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश जैन :-**

प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये आम्ही ठराव पण केला होता की, शांतीनगर, प्रभाग पाच मध्ये जिकडे फेरिवाला क्षेत्र आहे आणि जिकडे फेरिवाला क्षेत्र नाही, तिकडे पाट्या लावल्या तर आपल्याला माहिती पडेल की, इकडे फेरिवाला आहे आणि इकडे नाही. आणि जर कारवाई करायची असेल तर कोणता पण गाडीवाला येतो. एका साईडला कारवाई करतात. दुसऱ्या साईडला करत नाही.

**मा. महापौर :-**

सर्व वॉर्ड ऑफिसरांना मी आज रुलिंग देत आहे की, त्यांनी आज संध्याकाळी जाऊन पाहाणी करुन जे फेरिवाले ना फेरिवाला क्षेत्रामध्ये बसलेले आहेत किंवा कोणी गाड्या लावलेल्या आहेत, त्या सर्वांना उचलायचे आहे. आणि जे फेरिवाले क्षेत्र आहेत, तिकडे पाटी लावून त्यांना सांगायचे आहे की, हे फेरिवाला क्षेत्र आहेत आणि तुम्हाला तिथे शिफ्ट करायचे आहे.

**शरद पाटील :-**

मॅडम, तुम्ही फेरिवाल्यांना उचलले तर दुकानवाल्यांना उचलू शकता. पण फेरिवाल्यांनाच उचलले नाही तर दुकानवाल्यांना त्रास देऊ नका.

**मा. महापौर :-**

मी तेच सांगितले की, सर्वांनाच उचलायचे आहे. आणि नगरसेवकांना पण विनंती आहे की, कोणीही फोन करुन सांगायचे नाही तो माणूस आपला आहे किंवा काय. मग नगरसेवकच फोन करतात. मी सर्वांना सांगते, कारण मी स्वतः माझ्या वॉर्डमध्ये करत आहे. लोक माझ्याकडे येतात की, मॅडम इथे लावू द्या. मी सर्वांना स्ट्रीक्टली सांगितले आहे की, जिथे माझ्या वॉर्डमध्ये फेरिवाला झोन आहे, मी त्यांना तिथे पाठवत आहे. जिथे नाही तिथे तुम्ही लावायचे नाही. आणि मी आणि श्री. खंडेलवालजी, आम्ही आमच्या वॉर्डमध्ये लावू दिलेले नाही. तशी तुम्हाला सर्वांना रिक्वेस्ट आहे की, तुम्ही तर तसे केले तर तुमच्या वॉर्डबद्दल तुम्ही जे इथे बोलता. मग कोणीच फोन करायचा नाही. तुम्ही स्टार्ट केले तरच होणार आहे. कारण मी जेव्हा मिरारोडला गेले. दोन-तीन फेरिवाल्यांना उचलायला लावले तेव्हा त्यांनी नगरसेवकांचेच नाव घेतलेले आहे की, आम्हाला त्यांनीच बसवलेले आहे. आणि ही वस्तूस्थिती आहे. मला तिथल्या लोकांनी सांगितले आहे की, हमको यह नगरसेवक ने बिठाया. मी तुम्हाला विनंती करत आहे की, तुमचा जो भाग आहे, क्षेत्र आहे, जिथे ना फेरिवाला क्षेत्र आहे तिथे तुम्ही लक्ष देऊन उचलायचे आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, आप कवि सम्मेलन में आए थे। तो आपको भी आने के लिए कितना समय लग गया था। सिर्फ यह फेरिवालों के लिए हमारे नवघर रोड पर और जेसल पार्क में फेरिवाले एक बहुत बडी समस्या बन गए है। और हमारे प्रभाग अधिकारी कभी कोई बात सुनते ही नहीं है। प्रभाग अधिकारी श्री. जगदाळे साहब को पच्चीस कम्प्लेंट दिया है।

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, सुप्रिम कोर्ट की नई गाईडलाइन्स के अनुसार, उन्होंने उनके पुनर्वसन के लिए जो सुचना दि है। आपको उनकी एक पॉलिसी ठहरानी है। जैसे अब श्री. जुबेर इनामदार ने सुचना की है। सुप्रिम कोर्ट के निर्देशानुसार सेंट्रल गव्हर्नमेंटने इनके पुर्नवसन के लिए जो एक योजना निकाली है, उनके हिसाब से उनके उपर भी जरा सोचिए की, मिरा भाईंदर महानगरपालिका के तरफ से उनको वहाँ पर्यायी जगह दि जा सकती है। ताकी, उनके साथ ...........

**हंसुकुमार पांडे :-**

हमने आरक्षण क्रमांक १०८ दिया है। उसपर मार्केट बना दो।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मी प्रभाग अधिकाऱ्यांना चार दिवसांची वेळ देत आहे. विषय संपलेला आहे. श्रीम. सुमन कोठारी मॅडम, मैं आपको पाच मिनिट का टाईम दे रही हूँ। आपने जो पानी का माँग किया है, उसपर आप पाच मिनिट में शॉर्ट में बात किजिए।

**प्रशांत दळवी :-**

वारंवार एक वर्षापासून आम्ही सांगतो. ते म्हणतात की, रिवाइज केले आहे. फेरिवाला क्षेत्र कुठे रिवाइज केले ते अधिकाऱ्यांनी सांगावे. आम्हाला ते स्टँडींगमध्ये लिस्ट आणून देतात की, इकडे रिवाइज केले. इकडे दोनशे फेरिवाले बसवले. इकडे शंभर बसवले. मग आमच्या शांतीनगर वसाहतीमध्ये ज्या भाजी मंडई नाहीत. जे तिकडे वीस-वीस वर्षापासून भाजी आणि फ्रुट विकतात. त्यांनी जायचे कुठे? लोकांनी भाजी मंडईसाठी जायचे कुठे? तुम्ही आज प्रभाग अधिकाऱ्यांना कारवाई करण्यासाठी निवेदन करता. त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु, जो प्रश्न राखून ठेवलेला आहे, तो मा. महासभेत आणावा. ते रिवाइज केलेले पत्र आम्हाला फक्त स्टँडींगमध्येच दिले गेले. सन्मा. अधिकारी श्री. दिपक सावंत यांनी सांगावे.

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. राष्ट्रीय फेरिवाला धोरण उपविधी तयार करत असताना त्याच्यात ज्या सुचना होत्या, त्याप्रमाणे सुचना अंमलात आणण्यासाठी व आपण जे फेरिवाला आणि ना फेरिवाला क्षेत्र २००८ मध्ये घोषित केले होते. त्यानंतर शहराची जी लोकसंख्या वाढलेली आहे, रहिवास क्षेत्र वाढलेले आहे. त्या सर्वांचा विचार करुन सर्व प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे आणि प्राथमिक स्वरुपाचे सर्वेक्षण करुन पुढच्या किंवा त्याच्या पुढच्या मा. महासभेमध्ये चर्चेला विषय आणण्यात येईल.

**प्रशांत दळवी :-**

आपण जे धोरण नक्की केले त्याची एक प्रत सर्व सन्मा. सदस्यांना देण्यांत यावी.

**दिपक सावंत :-**

तो विषय रितसर मा. महासभेसमोर आणण्यात येईल.

**प्रशांत दळवी :-**

तो पर्यंत जे जिकडे बसत असतील आणि अडथळा निर्माण करत असतील, रस्त्याला बाधित होत असेल, त्या फेरिवाल्यांना मुक्त करावे.

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम, आता आपण सर्वांनी जसा फेरिवाल्यांचा विषय मांडला. तसा एक विषय मी हा पण बोलू इच्छिते की, दुकानवाल्यांनी जी नगरपालिकेची रोडवरची जागा आहे ती कब्जा करुन घेतलेली आहे आणि त्याच्यावर बांधकाम सुध्दा केलेले आहे. आणि मार्बलचे बांधकाम करुन त्यांनी पक्के पत्रेसुध्दा बांधुन ठेवलेले आहेत. त्यांच्यावर काही कार्यवाही होत नाही. ते का? आणि गॅरेजवाले स्वतःचा रस्ता समजून रोडवर गाड्या लावून ठेवतात आणि जनतेच विचार करत नाहीत. तर त्यांच्यावर सुध्दा आपण कार्यवाही करावी.

**दिनेश जैन :-**

माझी अशी सुचना आहे की, मुख्य रस्त्यावर कुणालाही फटाक्यांची बाकडे लावायची परमीशन देऊ नका. कारण एका ठिकाणी ते १०-१० बाकडे लावतात. त्यामुळे दिवाळीच्या वेळेस रस्ता एकदम जाम होऊन जातात.

**वर्षा भानुशाली :-**

मॅडम सावंत साहेबांना एक प्रश्न विचारायचा आहे की, आपण फेरीवाला क्षेत्रातून जी पावती नक्की केली आहे ती आपण कशी वसुली करतो. आपण रेट काय लावला आहे? आपण वसुलीची किंमत किती ठरलेली आहे.

**दिपक सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आपण जे रेट फिक्स केले आहेत ते एक स्क्वेअर मिटरला १५ रुपये दोन स्क्वेअर मिटरला २५ रुपये.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

फेरीवाल्यांकडून किती घेता?

**वर्षा भानुशाली :-**

साहेब, आज परिस्थिती काय आहे? ठेकेदार ५०-५० रुपये घेत आहेत. पावती ३० ते २५ रुपयाची देतात. म्हणजे ही खुलेआम दादागिरी सुरु आहे. जिथे ना फेरीवाला क्षेत्र आहे, तिथे पण पावती घेतात. एखाद्या गल्लीमध्ये कुठे एखादी बाई १० मासे घेऊन विकण्यासाठी बसली असेल तर तिकडे पण ठेकेदार वसुली करतात. मग आपण ठेकेदारावर का कारवाई करत नाही? त्यांचा एक मुलगा आणि एक टीम तिकडे थांबवून ठेवले आहे. आपण त्याच्यावर का कारवाई करणार?

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब १५ तारखेला ठेकेदारांचा बाजार वसुलीचा ठेका संपला असेल. परत आता रि-टेंडरींग करणार किंवा आता टेंडर प्रसिध्दी होणार आहे. दिपक सावंत साहेब मला एक उत्तर द्या. तुम्ही जे नविन टेंडर काढणार ते सर्वोच्च न्यायालयाच्या दिलेल्या निकषाप्रमाणे काढणार किंवा नाही? कारण त्यांनी जे नॉर्म्स नक्की केले आहेत त्याप्रमाणे तुम्हाला करायला लागेल. सर्वोच्च न्यायालयाचे तुमचे जे आदेश आहेत त्याला तुम्ही जुमानत नाही का?

**वर्षा भानुशाली :-**

मॅडम, त्याच्यामध्ये आपण काय करणार. एक लारीवाला घेऊन फिरतो त्याची पण पावती फाडायची, एक बाई बसलेली आहे त्याची पण पावती फाडायची.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तसेच करायला लागेल ना. त्याच्यामध्ये एक मिटरपेक्षा जास्त जागा एका फेरीवाल्याला देता येत नाही. सात ते दहा वाजेपर्यंत टाईम आहे. स्टेशन परिसर पूर्ण १५० मिटरपर्यंत रिकामा ठेवायचा आहे. रस्त्याच्या एका बाजूला फक्त फेरीवाले बसवता येतात. आठ मिटरपेक्षा छोट्या रस्त्यावर तुम्हाला देता येत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाचे जे निर्देश आहेत............

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुम्ही परत टेंडर काढणार? टेंडर संपलेले आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सगळ्या गोष्टींचा आढावा घेऊन.........

**जुबेर इनामदार :-**

साहेब, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, सुप्रिम कोर्टाचे आदेशाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली पाहिजे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

करावीच लागेल ना.

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४९ :-**

सन्मा. सदस्य श्री. अशरफ मेहमुद शेख यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर "ना फेरीवाला क्षेत्र" घोषीत करणेबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि.१९/०७/२००८ प्रकरणक्र.२७ ठराव क्र. २९ मिरा भाईंदर महानगरपालिका शहराकरीता ना-फेरीवाला व फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले. त्यात मिरा रोड पुर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या समोरील दोन्ही बाजुचा परिसर फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषीत करण्यांत आले होते. सदर ठिकाणी फेरीवाले, फळ विक्रेते, भाजी विक्रेते आपल्या हातगाड्या दुकानांच्या समोर लावतात आणि त्यामुळे शाळांच्या बसेस व महापालिका परिवहन सेवेच्या बसेसच्या रहदारीस अडथळा निर्माण होतो व मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होते. याचा परिणाम सदर रस्त्यावरुन ये-जा करणा-या नागरीकांना, शालेय विद्यार्थ्यांना, वृध्द नागरीकांना ये-जा करण्यास फार अडचण होते व प्रसंगी विलंब सहन करावा लागतो. क्षेत्रातील रहिवाशांच्या वारंवार येणा-या तक्रारीच्या अधिन राहून **नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर "ना फेरीवाला क्षेत्र"** घोषीत करण्यांत येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अशरफ मेहमुद शेख** **अनुमोदक :- श्रीम. वंदना चक्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. जुबेर इनामदार व अनुमोदक श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

केंद्र शासनाने सन २००९ मध्ये जाहीर केलेल्या राष्ट्रीय फेरीवाल्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. शहरामध्ये फेरीवाल्यांसाठी स्ट्रीट व्हेण्डर्स (प्रोटेक्शन ऑफ लायव्हीलीहूड अँण्ड रेग्युलेशन ऑफ स्ट्रीट व्हेंडींग) बिल-२०१२ हे प्रस्तावित कायद्याचे विधेयक लोकसभेने मंजूर केले आहे.

त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर शहरामध्ये फेरीवाल्यांचे नियोजन करण्यासाठी धोरणाच्या माध्यमातुन आवश्यक उपाययोजना करावी, अशी मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रविण पाटील :-**

एक शोक प्रस्ताव आहे. आपले सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांचे पिताश्री कै. गजानन पाटील ह्यांचे काल निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव आहे.

**शरद पाटील :-**

खारीगावचे रहिवासी कै. चंद्रकात पाटील ह्यांचा शोकप्रस्ताव आहे. तसेच कै. दामोदर काशिनाथ पाटील राहणार नवघर ह्यांचा शोकप्रस्ताव आहे.

**जुबेर इनामदार :-**

*महापालिकेमधील पाणी पुरवठा विभागात काम करणारे कनिष्ठ अभियंता कै. अझर यांचे निधन झाले* आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कै. केतन जांगीड ह्यांचा मालाडमध्ये खुन झालेला आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**नगरसचिव :-**

सगळ्यांनी मृतात्म्यास श्रध्दांजली वहायची आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ४८ :-**

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांचे पिताश्री कै. गजानन पाटील ह्यांचे काल निधन झालेले आहे. तसेच खारीगावचे रहिवासी कै. चंद्रकात पाटील ह्यांचा शोकप्रस्ताव आहे. तसेच कै. दामोदर काशिनाथ पाटील राहणार नवघर ह्यांचा शोकप्रस्ताव आहे. महापालिकेमधील पाणी पुरवठा विभागात काम करणारे कनिष्ठ अभियंता कै. अझर यांचे निधन झाले आहे. तसेच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कै. केतन जांगीड ह्यांचा मालाडमध्ये खुन झालेला आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रविण पाटील      अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सही/-
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**


**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी २.०० वाजता**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## ॥ गोषवारा ॥

**प्रकरण क्र :- ५८ :मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील रहदारीच्या आणि मोक्याच्या ठिकाणी सुरक्षितता उपाययोजने कामी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना २८ फेब्रुवारी २००२ साली झालेली असून त्यावेळी शहराची लोकसंख्या ५ लाख २० हजार इतकी होती. शहराचा विकास झपाट्याने होत असुन लोकसंख्या सुमारे ९ लाख [illegible] पर्यंत पोहोचलेली आहे. शहरातील नविन रस्ते, गटारे बहुतांश प्रमाणात विकसित करण्यात आलेले असुन परिणामी वाहनांची वर्दळ सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच गुन्हेगारी, अपघात इत्यादी दुर्दैवी घटनांमध्ये देखील वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

सबब वरील बाबींचे नियंत्रण करणेकामी तसेच सुरक्षिततेची उपाययोजना करणेकामी मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील मुख्य रहदारीच्या तसेच मोक्याच्या ठिकाणी सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणे बाबत सन्मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंडोन्सा, सन्मा. महापौर, स्थानिक लोकप्रतिनिधी, वाहतुक शाखा यांनी मागणी केलेली आहे. सदर कामी महानगरपालिकेच्या सन २०१३–१४ च्या अर्थसंकल्पात रु.५० लाख इतकी तरतुद करण्यात आलेली असून निधी अपुरा पडल्यास सन्मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंडोन्सा यांनी त्यांच्या स्थानिक मतदार संघ विकास निधी मधून निधी उपलब्ध करुन देणार असलेबाबत पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त कामी मा. पोलिस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला त्यानुसार सी.सी.टीव्ही मॉनिटरींग व डीव्हीआर कक्षाची व्यवस्था लोकेशनप्रमाणे नजीकचे पोलिस चौकी, मनपा कार्यालय तसेच इतर आस्थापना येथे करण्यात आलेली आहे. प्राधान्यक्रमाने तुर्तास एकूण ४६ ठिकाणी सी.सी.टीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणे निकडीचे असुन त्याची यादी पोलिस कार्यालयामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मिरारोड नियंत्रण कक्ष येथे ४ पोलिस कर्मचारी नेमण्याची तजवीज करण्यात आली असून रेकॉर्डींग यंत्रणा कॅमेरा बसविण्याच्या ठिकाणीच करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. सदर यंत्रणेची देखभाल दुरुस्ती महानगरपालिकेने करणेची मागणी पोलिस कार्यालयातून करण्यात आलेली आहे. या व्यतिरीक्त आवश्यक सी.सी.टीव्ही कॅमेरे व त्या संलग्न इतर डीव्हाईसेस याबाबतचा तपशिल देखील पोलिस कार्यालयातून उपलब्ध झालेला आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त कामी सन २०१३–१४ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे बाबत विचार विनियम होऊन निर्णय होणेस्तव तसेच होणाऱ्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

आवक प्राप्त दि. 4/12/2013
वेळ - 3.30

का. महालेखापाल बोर्ड
रजिस्टर नं. 32

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ११.१२.२०१३**

## // गोषवारा //

**विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या मनपा शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर शैक्षणिक वर्ष सन – २०१४-१४ पासून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरु करणेस मंजूरी मिळणेबाबत...**

प्रा. ५९

मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यक्षेत्रात मनपा प्राथमिक ३५ शाळा असुन एकूण ९६९८ इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षण मंडळ आस्थापनेवर २०२ शिक्षक पदे मंजूर आहेत. त्यापैकी १९२ शिक्षक कर्मचारी कार्यरत आहेत. परंतू दरवर्षी पटसंख्येच्या प्रमाणात घट होत असल्याचे दिसून येते. याकरिता शहरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य असल्याने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शाळेत कसे शिक्षण दिले जाईल या दृष्टीने सेमी इंग्रजी अभ्यासक्रम प्रयोगिक तत्वावर मनपा शाळेत सुरु केल्यास विद्यार्थी गळतीचे प्रमाण थांबेल व खाजगी इंग्रजी माध्यामाकडे जाणारे विद्यार्थी मनपा शाळेत शिक्षण घेवू शकतील. ज्या विद्यार्थ्यांना खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळत नाही अशा गरजू व गरीब विद्यार्थ्यासाठी शिक्षणाची उत्तम सोय निर्माण होईल. याकरिता मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सन्माननिय नगरसेवक याबाबत वारंवार विचारणा करून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरु करण्याची मागणी करीत आहेत. या सर्व बाबींचा विचार करीता व गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार करता महानगरपालिकेच्या जास्तीत जास्त शाळामध्ये सेमी इंग्रजी अभ्यासक्रम प्रायोगिक तत्वावर सुरु करणे गरजेचे आहे.

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या जास्तीत जास्त शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरु करण्यास मा. महासभेची मंजूरी मिळणेकरिता सभेपुढे सविनय सादर.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

## // गोषवारा //

प्रकरण क्र. :- ६०

विषय :- विविध स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ग्रंथालय/वाचनालय या विभागामार्फत रामनगर ॲमेनिटी हॉल, सृष्टी कॉम्प्लेक्स, रामनगर, मिरारोड (पूर्व) येथील पहिल्या मजल्यावर प्रथमच स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणे प्रस्तावित आहे. सदरच्या प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरीता संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. या केंद्रात महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रिय लोकसेवा आयोग व इतर विविध स्पर्धात्मक परिक्षेकरीता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन घेता येईल. सदर केंद्रासाठी खुर्च्या, टेबल, ऑफिस टेबल, ऑफिस चेअर, लोखंडी कपाट, बुक रॅक/शेल्फ, पेपर स्टॅण्ड, भिंतीवरील मोठे घड्याळ, मार्कर पेन, डस्टर, बोर्ड, प्रोजेक्टर, स्क्रिन, नवीन संगणक (प्रिंटरसह), दूरध्वनी सुविधा (इंटरनेट जोडणीसह), वॉटर कुलर, इ-इ. साहित्यांची व त्याचबरोबर विविध प्रकाशकांच्या विविध विषयाची पुस्तके, दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक (नियतकालिक) इ.इ. बाबींची आवश्यकता असणार आहे.

उक्त सादर प्रमाणे स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रात विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरीता संस्थेची नेमणूक करणे व केंद्रासाठी आवश्यक सर्व साहित्य खरेदी करण्याकरीता येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिकाकरिता.

गोषवारा हाक दि. 4/12/2013
संध्या - 4:50

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद क्र. 30

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६१ ) :-** मिरारोड व भाईंदर रेल्वे स्टेशन परिसर सुशोभिकरण करणे कामाबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून पश्चिम रेल्वे जात असून शहरात भाईंदर व मिरारोड ही दोन स्थानके आहेत. भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम) व मिरारोड (पूर्व) येथून प्रवाशांची येजा असते. सदर स्टेशन बाहेरील परिसर वाहतूकीच्या व रहदारीच्या दृष्टीने योग्य नियोजन करुन सुशोभित केल्यास प्रवाशांना सोयीचे होईल. सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात भाईंदर (पू./प.), मिरारोड स्टेशन बाहेर सुशोभिकरण कामे करीता रु.१.५० कोटी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर काम करण्याकरीता मे. एच.एम.राजे कंन्सलटंट प्रा.लि. या सल्लागारमार्फत नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन बाहेरील परिसर सुशोभिकरण करणे. | रु. ७,१०,९९,६००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) रेल्वे स्टेशन बाहेरील परिसर सुशोभिकरण करणे. | रु. ३,१०,३८,०४०/- |

वरीलप्रमाणे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानूसार खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS12

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (६२) :-** मिरारोड येथील पार्कींग आरक्षण क्र. १८४ विकसित करणेबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १८४ वाहन तळासाठी राखीव आहे. सदर जागेचे क्षेत्र ३२००.०० चौ.मीटर असून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर आरक्षण बी.ओ.टी तत्वावर विकसित करणेबाबत मा. महासभा दि.२०/११/२००९ ठराव क्र. ३९ अन्वये निर्णय घेतलेला आहे. त्याअनुशंगाने कार्यवाही करुन कंत्राटदार नियुक्त करण्यात आला होता. तथापी सदर बी.ओ.टी तत्वावरील कंत्राट रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदर जागेवर वाहनतळ चालविण्याचे कंत्राट देण्यात आलेले आहे. सदर वाहनतळाची जागा विकसित करण्याकरीता या क्षेत्रातील अनुभवी सल्लागार नेमल्यास त्यांच्यामार्फत आरक्षणाच्या जागेवर विकसित करावयाच्या वाहनतळाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्याची अंमलबजावणी केल्यास मिरारोड स्टेशन बाहेरील रहदारी व वाहतूकीचे नियत्रण करता येऊ शकेल. तसेच महानगरपालिकेस कायमस्वरुपी उत्तपन्न मिळेल. तरी सदर कामासाठी तांत्रिक सल्लागार नेमण्यासाठी मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS13

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६३ )** :- राजीव आवास योजनेतंर्गत संक्रमण शिबिर बांधणे कामाच्या (पथदर्शी प्रकल्प) सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथील आरक्षण क्र. ३२६ ब संक्रमण शिबिरासाठी आरक्षित असून सदर जागेचे क्षेत्र १२१४५.०० चौमीटर एवढे आहे. सदर संक्रमण शिबिराच्या जागेवर राजीव आवास योजनेतून संक्रमण शिबिराचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याच्या प्रस्तावास राज्य शासनाने तत्वतः मंजूरी दिलेली असून राजीव आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानूसार सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत महानगपालिकेस कळविलेले आहे. त्याअनुशंगाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मे. सुभाष पाटील ॲण्ड असोसिएट्स, ठाणे यांची सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर सल्लागारानी सदर संक्रमण शिबिराच्या पथदर्शी प्रकल्प म्हणून रु.१०८,९६,८०,२९४/- रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. सदर प्रकल्पा करीता २.५० चटईक्षेत्र अनुज्ञेय आहे. त्यामध्ये तळ अधिक आठ मजल्याच्या तीन इमारती, स्टिल्ट अधिक ८ मजलच्या दोन इमारती आहेत. सदर प्रकल्पात २६९ चौ फूटच्या ९१९ सदनिका व ५० दुकाने उपलब्ध होणार आहेत. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल पुढील मान्यतेसाठी म्हाडा, हुडकोमार्फत केंद्र शासनाकडे सादर करावयाचा आहे. तरी सदर सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS15

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६४ ) :-** राज्य शासनाचे आदिवासी विभागासाठी वसतीगृह बांधून देण्याबाबतचे आदिवासी विभागाच्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आदिवासी मुलांसाठी वसतीगृहाचे (Tribal Hostel) आरक्षण आहे. सदर आरक्षण सर्व्हे क्र. ७० हिस्सा क्र. ०१ भागशः असे असून आरक्षण क्र. ३८१ ब आहे. सदर आरक्षित खाजगी जागा शासन घेण्यास तयार आहे. सदर आरक्षण तसेच इतर खाजगी जागेमध्ये १००० आदिवासी विद्यार्थ्यासाठी वसतीगृह, तसेच गृहप्रमुखाचे (वर्ग - २) कार्यालय, ४ गृहपालांची कार्यालये, भोजनगृह, संगणक कक्ष, वाचनालय, व्यायाम शाळा, करमणूक सभागृह, गृहप्रमूख निवासस्थान – १, गृहपाल निवासस्थान – ४, रक्षक निवासस्थाने इ. चा समावेश करुन सदर काम महानगरपालिकेमार्फत करुन देण्याबाबत कळविलेले आहे. सदर विषयाबाबत अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी या कार्यालयात येऊन प्रत्यक्ष चर्चा केली व त्या अनुशंगाने दि. २२/०८/२०१३ रोजीच्या पत्राने देखिल या कार्यालयास कळविलेले आहे.

सदर वसतीगृहाकरीता लागणारी जागा संपादनासाठी येणारा खर्च व वसतीगृह व इतर बांधकामासाठी येणारा सर्व खर्च राज्य शासन मिरा भाईंदर महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर एक चांगली वास्तू उभी राहील. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सदर कामाचे नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करुन काम दयावयाचे आहे. त्याकरीता महानगरपालिकेस तांत्रिक सल्लागार व इतर होणारा खर्च देखिल सदर विभागामार्फत मिळणार आहे.

तरी राज्य शासनाच्या आदिवासी विभागासाठी वसतीगृह व इतर बांधकामे बांधून देण्याची प्रक्रीया करण्यासाठी मान्यता देणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS10

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६५ ) :-** मिरारोड व दहिसर स्टेशन दरम्यान नविन कल्वर्ट बांधणे कामाबाबत निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील काशि, महाजनवाडी डोंगर, तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी मिरारोड पूर्वेकडे सृष्टी, शांतीनगर इ. भागात येत असते. सदरील भागातील पाणी मिरारोड पूर्वेकडून जाफरी खाडीच्या रेल्वे पूलाखालून पश्चिमेस खाडीकडे जाते. तसेच मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथील नयानगर, शांतीपार्क, पूनमसागर, सृष्टी, जांगीड, आर.एन.ए. इ. भागातील पाण्यास जाण्याचा मार्ग हा जाफरी खाडी आहे. त्यामुळे सदरील भागात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी जमा झाल्यास व जाफरी खाडीतून सदरील पाण्याचा निचरा न झाल्यास मिरारोड (पूर्व) भागात पाण्याची पातळी वाढून पूरजन्य परीस्थिती निर्माण होत असते. सदरील जाफरी खाडीकडे जाणारा पाण्याचा निचरा नियंत्रीत करणेस, दहिसर चेकनाका पासुन पेणकरपाडयाकडून येणारी खाडी रेल्वे लगत असल्याने Km 38/9 या ठिकाणी नविन कल्वर्ट बांधल्यास पाण्याचा निचरा जलद गतिने होण्यास मदत होईल, सदर बाब तदनंतर रेल्वे प्रशासनास कल्वर्ट कळविण्यात आली होती. त्यावर रेल्वे प्रशासनाने त्या ठिकाणी Feasibility तपासुन व आवश्यक आकारमानाचे अतिरीक्त कल्वर्ट बांधण्यास हरकत नसल्याचे व सदरील काम Deposit Work करण्याबाबत कळविले तसेच सदरील कामी येणारा खर्च महानगरपालिकेस करावा लागेल.

सदरील कल्वर्ट बांधणे कामामध्ये १८०० मी मी आकारमानाचे, ७० मीटर लांबीचे ९ Row पाईप Micro Tunneling पध्दतीने Pushing करणे, **Approach रस्ता तयार करणे** व जाफरी खाडीवर तात्पुरता पुल (Temporary Bridge) बांधणे कामाचा समावेश आहे. सदरील ठिकाणी mangroves असल्याने सी.आर.झेड प्राधिकरणाची परवानगी प्राप्त करावी लागणार आहे. तसेच मुख्यतः प्रस्तावित जागेवर जाण्यास रस्ता नसल्याने जाफरी खाडीवर (Temporary Bridge) बांधावा लागणार असुन रेल्वे लाईन लगत Approach रोड तयार करावा लागणार आहे.

सदरचे काम करावयाचे असल्यास कामाचा एकुण खर्च, सदर कामाची feasibility study व Detail Survey करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी Detail feasibility study व Detail Survey करीता रेल्वे अंगीकृत कामाचा अनुभव असलेल्या तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करावी लागणार आहे.

तरी मिरारोड व दहिसर स्टेशन दरम्यान प्रस्तावित ठिकाणी (Km 38/9) कल्वर्ट बांधणे करीता सर्व प्रथम तांत्रिक सल्लागाराची नेमणूकीकरीता मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS9

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६६ ) :-** भाईंदर (प.) आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम विकसित करणेबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. ९१, स्टेडीयम करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र १८.०० हेक्टर असून सदर जागा मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून क्र. महसूल /क-१/टे-१/एल बी पी/अति-संरक्षण व एस आर ०४/२०१० दि. ०७/१०/२०१० रोजीच्या आदेशान्वये संरक्षणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर केलेली आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत कचरा माती भरावावर मुरुम व लाल माती टाकून सुमारे ६.०० एकर जागेत परिसरातल्या मुलांना खेळण्यासाठी मैदान विकसित करण्यात आलेले आहे. सदर स्टेडीयमची जागा महानगरपालिकेकडे कायमस्वरूपी हस्तांतर करण्याची व सीआरझेड च्या दृष्टीकोनातून आवश्यक मान्यता घेण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर स्टेडीयम ची एकूण जागा १८.०० हेक्टर असून संपूर्ण जागेचा विकास करणे आवश्यक आहे. सदर जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचा क्रीडा संकुल होण्यासाठी खालील सुविधाचा समावेश असणे आवश्यक आहे.

१) क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, मैदान

२) बॅडमिंटन, स्कॅश कोर्ट

३) टेबल टेनिस

४) ऑलिम्पीक साईज, स्विमिंगपुल

५) व्यायामशाळा, योगा, एरोबिक्स

६) इनडोअर क्रिकेट

७) ट्रॅक ॲण्ड फिल्ड

८) मिनि थिएटर, मिटींग हॉल, वाचनालय, संग्रहालय

९) कार्ड रुम/गेम रुम

१०) इनडोअर स्केटींग

११) हॉल, ड्राम थिएटर

१२) ओपन लॉन, पार्कींग एरिया

तसेच इतर अनुनेय असलेल्या सुविधा देखिल उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता अशाप्रकारे कामाचा अनुभव असलेल्या वास्तुविशारद, सल्लागारामार्फत नकाशे व आवश्यक सुविधाबाबतचा अहवाल तयार करुन घेतल्यास मा. महासभेस सदर स्टेडीयम विकसित करण्याबाबत पुढील निर्णय घेणे सुलभ होईल. तरी सदर स्टेडीयम चा विकास करणे करीता प्रकल्प अहवाल तयार करणेकरीता अनुभवी सल्लागार नेमण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC3/DK/2013-14/MS8

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६७ ) :-** काशिमिरा नाका येथिल छत्रपती शिवाजी महाराज पूतळा परिसर सुशोभिकरण करणेबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत काशिमिरा नाका येथे रस्त्याच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरुढ पूतळा उभारुन उद्यान सुशोभिकरण करण्यात आले आहे. सदर पूतळा व उद्यान उभारतेवेळी सदर रस्ता हा सरासरी १५.०० मीटर रुंदीचा होता. तद्‌नंतर सदर रस्ता ४५.०० मीटर रुंदीचा तयार करण्यात आला तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या उंचीपर्यत रस्ता भराव करुन उंच करण्यात आला त्यामुळे रस्त्यास दोन्ही बाजूस सारखी जागा उपलब्ध नाही. तसेच उद्यान ची रेलिंग रस्त्याच्या समांतर आलेली आहे. सदर ठिकाण हे शहराचे प्रवेशद्वार असल्याने सदर श्री. छत्रपती शिवाजी महाराज पूतळा व उद्यानाची पुर्नबांधणी करुन परिसर सुशोभिकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता प्रथम टप्प्यात अशाप्रकारे कामाचे नकाशे, डीझाईन व अंदाजपत्रक तयार करणाऱ्या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक केल्यास व त्याच्यामार्फत चांगला प्रस्ताव तयार करुन अंमलबजावणी केल्यास सदर परिसर चांगल्याप्रकारे विकसित होऊ शकेल. तरी प्रथमतः तांत्रिक सल्लागार नेमण्याकरीता मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS7

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ६८ )** :- उत्तन घनकचरा प्रकल्पाच्या जागेस कुंपणभिंत, संरक्षक भिंत बांधणे इ. कामाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन येथील घनकचरा प्रकल्पाची ३१ हेक्टर असलेली जागा ही डोंगराळ भागावर आहे. सदर मिळकतीची किंमत ही १३६.४० कोटी एवढी असून सदर मिळकतीची अतिक्रमणापासून संरक्षण होण्यासाठी सदर जागेस कुंपणभिंत असणे आवश्यक आहे. तसेच कचऱ्यातून लिचड शेतीकडील भागात जाऊन शेतीची नासाडी होत आहे. सदर ठिकाणी उंच संरक्षक भिंत बांधून त्याखाली गटार व लहान विहीर बांधल्यास शेतीमध्ये लिचड जाणार नाही. तसेच संरक्षक भिंती पर्यंत कचरा अडून इनर्ट मटेरीयल उडून परिसरात देखिल त्रास होणार नाही. तसेच घनकचरा प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याचे देखिल मजबुतीकरण करावे लागणार आहे. सदर कामाकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च | मोजमाप |
|---|---|---|---|
| १ | रस्ता मजबुतीकरण करणे. | रु. ९२,१०,२००/- | लांबी १२०० मीटर रुंदी ६.०० मीटर |
| २ | कुंपणभिंत बांधणे | रु. १,३४,५९,७००/- | लांबी २००० मीटर २.४० मीटर उंच |
| ३ | गटार व विहीर बांधणे. | रु. ६७,७७,२००/- | लांबी ५५० मीटर |
| ४ | संरक्षक भिंत (पायथ्याशी ) | रु. ८,६४,५२,०००/- | ५९५२ मीटर लांबी ५.०० मीटर उंच |

सदर खर्चासाठी चालू अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध नसून पुढील अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करावी लागेल. तरी सदर कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेकरीता प्रस्ताव सविनय सादर,

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC3/DK/2013-14/MS17

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (६१)** :- मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमध्ये आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व मा. पदाधिकाऱ्याकडे येणाऱ्या अभ्यांगताना बसण्याची व्यवस्था करणे, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व मा. पदाधिकारी दालनाचे नुतनीकरण करणे, आपतकालिन कक्ष, कॅंटिन तयार करणे, मुख्यालय इमारतीची आवश्यक दुरुस्ती कामांबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत बांधून २००० मध्ये कामकाज सुरु करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेची लोकसंख्या, महानगरपालिका सदस्य संख्या देखिल वाढलेली असून मुख्य कार्यालयात कामकाजासाठी येणाऱ्या लोकप्रतिनिधी, नागरीकांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. महानगरपालिका मुख्यालय इमारतीत विशेषतः दुसऱ्या मजल्यावर पदाधिकारी, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे येणाऱ्या अभ्यागताना बसण्याची सोय नसल्याने त्यांची गैरसोय होते. मुख्यालयातील आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व पदाधिकारी यांची दालने ही १३ वर्षापूर्वी तयार केलेली असून सदर दालनांचे देखिल नूतनीकरण करण्याची आवश्यकता आहे.

शासनाच्या धोरणानूसार महापालिका मुख्यलयात तळमजल्यावर आपतकालिन कक्ष तयार करावयाचा असून इमारतीची देखिल गळती होत असल्याने आवश्यक दुरुस्ती कामे करावयाची आहेत. महानगरपालिका मुख्य कार्यालयात कॅंटीन ची देखिल व्यवस्था असणे आवश्यक आहे.

वरील सर्व सुविधांचे नियोजन करण्यासाठी अनुभवी वास्तूविशारद / सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत सविस्तर नकाशे व प्रकल्प अहवाल तयार करुन घेऊन तद्नंतर कामाबाबत निर्णय घेणे योग्य होईल. तरी आवश्यक कामे करण्यासाठी सल्लागार नेमण्याकरीता मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS14

दि. ०७।१२।९३ प्राप्त

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद अ. क्र. २८

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७० ) :-** राजीव आवास योजनेतंर्गत सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणे.

केंद्र शासनाच्या राजीव आवास योजनेतंर्गत झोपडपट्टयाचा विकास करण्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमण्यासाठी मा.महासभा दि.२९/९/२०१० ठराव क्र. ५४ अन्वये मान्यता प्राप्त आहे. त्या अनुशंगाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मे. वॉप्कोस लि. यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागारामार्फत सद्यस्थितीत भाईंदर (प.) आंबेडकर नगर झोपडपट्टी येथील झोपडपट्टीचा रु. १९०.०० कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. सदर प्रकल्पांतर्गत २६९ चौ. फुट ची १७६० सदनिका व १८० दुकाने बांधणे प्रस्तावित आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवाल म्हाडा, हुडको मार्फत केंद्र शासनाकडे सादर करण्यास व खर्चास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS18

13 Maha 13

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. ११/१२/१३

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ( ७१) - <u>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एनर्जी पार्क तथा सायटीफीक प्ले-पार्क विकसीत करणेस धोरणात्मक मंजूरी देणेबाबत.</u>

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदरच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे राई या जागामध्ये आ.क्र. ५० हे (खेळाचे मैदान) साठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेप्रमाणे या आरक्षणाने एकुण क्षेत्र २१७००.०० चौ.मी. आहे. या आरक्षणाच्या एकूण क्षेत्रापैकी ३९०१.२८ चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात असून उर्वरीत क्षेत्र नजिकच्या काळात महानगरपालिकेच्या ताब्यात येणार आहे.

रिलायन्स इंफ्रास्ट्रक्चर लि. यांनी सदरच्या आरक्षणामध्ये सायटीफीक ॲन्ड एनर्जी प्ले-पार्क विकसीत करणेसाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केलेला आहे.

सदरचे आरक्षण विकसीत होणेसाठी मे. रिलायन्स इंफ्रास्ट्रक्चर लि. यांचेकडून सुमारे रु. ६.०० कोटी खर्च होणार असून या कामी महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच सदरच्या आरक्षणामध्ये वाणिज्य वापरासाठीचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करणे अपेक्षित नाही. तसेच आरक्षणाखालील जागा हस्तांतरीत करणेत येणार नसून आरक्षण विकसीत करुन महानगरपालिकेस पुढील कार्यान्वयासाठी उपरोक्त होणार आहे.

रिलायन्स इंफ्रास्ट्रक्चर लि. कंपनीने सायटीफीक ॲन्ड एनर्जी प्ले-पार्क विकसीत केल्यास मिरा भाईंदर शहरातील मुलांसाठी व पर्यटकांसाठी ही सुविधा उपलब्ध होवू शकेल.

याकरिता याबाबतची पुढील सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देणेबाबत निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा. महासभेस सादर करणेत येत आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७२ )** :- छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करण्याबाबत निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ते गोल्डन नेस्ट जंक्शन पर्यतचा छत्रपती शिवाजी महाराज पथ ४५.०० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरणे, दोन्ही बाजूस नाले व दुभाजक बांधण्याचे काम २००५ मध्ये पूर्ण झालेले असून सदर रस्त्याचा तीन वर्षाचा सुरक्षा कालावधी (Defect Liability Period) संपलेला आहे. सदर रस्ता हा नाल्यासहीत ३९.०० मीटर रुंदीचा तयार केलेला असून नाल्यालगत दोन्ही बाजूस विविध यंत्रणेच्या केबल्स, जलवाहिनी टाकण्यासाठी सर्व्हीस रस्ता ठेवलेला आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाहतूकीचा ताण पडत असून रस्त्याची रुंदी कमी पडत आहे. त्याकरीता सर्व्हीस रस्ते तयार करणे, नाल्याच्या स्लॅब ची लेव्हल खाली घेऊन त्याच्या रस्त्याचे रुंदीकरण करणे तसेच संपूर्ण रस्त्याचे सुशोभिकरण करणे आवश्यक वाटते. सदर रस्ता हा शहरातील मुख्य रस्ता असल्याने रस्ता व दुभाजक चांगल्या पध्दतीने तयार केल्यास शहराच्या शोभेत भर पडेल. याकरीता अनुभवी सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत प्रकल्प अहवाल आराखडे तयार केल्यास पुढील निर्णय घेता येईल. तरी प्रथम टप्प्यात अनुभवी सल्लागार नेमण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS16

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** (७३) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आरक्षण क्र. २३१ (मार्केट) व आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी सेंटर) विकसित करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २३१ (मार्केट) व आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी सेंटर) विकसित करणेकरीता प्रस्ताव मा. महासभा दि. २१/३/२०१३ पुढे सादर करण्यात आला होता. त्याअनुशंगाने मा. महासभेने ठराव क्र. ३६ व ठराव क्र. ३४ अन्वये सदर आरक्षणाबाबत अधिक माहीती गोषवाऱ्यात नमूद करुन सदर प्रस्ताव पुनश्‍च मा. महासभेपुढे सादर करण्याबाबत निर्णय घेतला होता.

त्याअनुशंगाने खालीलप्रमाणे माहीती सादर करण्यात येत आहे.

- **आरक्षण क्र. २३१ (मार्केट)**

| | |
|---|---|
| आरक्षणाचे एकूण क्षेत्र | २५००.०० चौ.मीटर |
| ताब्यात घेतलेले क्षेत्र | रु.१९७५.६८ चौ.मीटर |
| सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पातील तरतूद | रु. ७०.०० लक्ष |
| अंदाजित खर्च | रु. ३,७१,२२,०००/- |

- **आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी सेंटर)**

| | |
|---|---|
| आरक्षणाचे एकूण क्षेत्र | २६००.०० चौ.मीटर |
| ताब्यात घेतलेले क्षेत्र | १०० % जागा ताब्यात आहे. |
| सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पातील तरतूद | रु. १०.०० लक्ष (शिल्लक) |
| अंदाजित खर्च | रु. ४,८२,५८,६००/- |

वरील आरक्षणाच्या जागा ताब्यात आल्याने त्यांचा विकास कामे आवश्यक असून सदर आरक्षणाचा वरील खर्च त्याकरीता सन २०१४-१५ या वर्षात होणार असल्याने २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करावी लागेल. मार्केट व कम्यूनिटी सेंटर या आरक्षणातील इतर जागेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- सदर मंजूर विकास योजनेनुसार "मार्केट" या प्रयोजनाकरिता आरक्षित असलेल्या एकूण जागा व त्यातील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या आरक्षणाच्या जागेचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

## मार्केट

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.क्र. / हि.क्र. | मौजे | अंदाजित एकूण क्षेत्र (हेक्टर) | ताब्यात आलेले क्षेत्र (चौ.मी.) | सि.आर.झेड . |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९७ | मार्केट | २७७पै., २७८पै., | भाईंदर | ०.३ | विकसीत | |
| २ | ११३ | मार्केट | २०पै., २००पै., | नवघर | ०.१५ | | |
| ३ | २३१ | मार्केट | १८३पै., ४५पै., | नवघर | ०.२५ | ११९७५.६८ | |
| ४ | २४४ | मार्केट | ६९पै., ७४पै., | गोडदेव | ०.२ | | |
| ५ | २९३ | मार्केट | १२७पै., १२८पै., १३०पै., | नवघर | ०.५ | | |
| ६ | ३१८ | मार्केट | १०७पै., १०८पै., | घोडबंदर | ०.२७ | विकसीत | |
| ७ | ३३३ | मार्केट | ५१पै., | मिरा | ०.२ | | |
| ८ | १०८ | मार्केट | ४२पै., ६७पै., ३९पै. | खारी | ०.४ | १७४९.३६ | |
| ९ | ५८अे | मार्केट (मासे) | ३३८पै. | भाईंदर | ४.६ | | CRZ-I(ii) |
| १० | ५८बी | मार्केट (आठवडा) | ७५४पै., | | १५ | | CRZ-I(i) CRZ-I(ii) |
| ११ | २६ | मार्केट (मासे) | ७पै., ४पै., ५पै., ६पै., | उत्तन | ०.३३७ | समुचित प्राधिकरण M.M.R.D.A. असून सुधारीत विकास योजना तयार झालेली आहे. | |
| १२ | १६५ | मार्केट | ३७पै., ३९पै., | भाईंदर | ०.२४ | | |
| १३ | ६८ | मार्केट | ३४२पै., ३४३पै., ३३८पै., | भाईंदर | ०.२ | | CRZ-III |
| १४ | १९७ | मार्केट | १०पै., | पेणकरपाडा | ०.७१ | | CRZ-I(i) |
| १५ | ६८अे | मार्केट (भाजी) | ७२२-अे | | ०.६५ | | CRZ-I(i) |
| १६ | २४ | मार्केट | ९पै., ७पै., ६पै., ३१७पै.., ८पै. | उत्तन | ०.६ | समुचित प्राधिकरण M.M.R.D.A. असून सुधारीत विकास योजना तयार झालेली आहे. | भागशः CRZ-II |
| १७ | ४२ | मार्केट | ४पै., ५पै., ६पै., | मोरवा | ०.३८ | | CRZ-II |
| १८ | १४३ | मार्केट (घाऊक) | १४५बीपै.,३७६पै., १४१अेपै.,१४१अे, १४५बीपै., १४५सीपै., | भाईंदर | १.१५ | | CRZ-I(i) |
| १९ | १३४ | मार्केट | २१६पै., २१८पै., २१७पै., | भाईंदर | ०.२८ | विकसीत | |
| २० | २८१ | मार्केट | ९२पै., १००पै., १०९पै., | नवघर | ०.२५ | | CRZ-III |
| २१ | ३४६ | मार्केट | ७४पै., ७१पै.,७५पै. | पेणकरपाडा | ०.१८ | | CRZ-III |

- सदर मंजूर विकास योजनेनुसार “कम्युनिटी सेंटर” या प्रयोजनाकरिता आरक्षित असलेल्या एकूण जागा व त्यातील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या आरक्षणाच्या जागेचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| कम्युनिटी सेंटर / हॉल |
|---|

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.क्र. / हि.क्र. | मौजे | अंदाजित एकूण क्षेत्र (हेक्टर) | ताब्यात आलेले क्षेत्र (चौ.मी.) | सि.आर.झेड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २५३ | कम्युनिटी सेंटर / हॉल | ४७पै.,,१८०पै.,,५६पै.,, | नवघर | ०.४८ | १५०.०० | |
| २ | ४४ | कम्युनिटी हॉल | ४पै.,, १०पै.,, ११पै.,, | मोरवा | ०.३६ | ---- | |
| ३ | १०३ | कम्युनिटी हॉल | ३३पै., ३४पै., ३५पै.,, | खारी | ०.२४ | ---- | |
| ४ | १७१ | कम्युनिटी हॉल | ६१पै., ६२पै., | भाईंदर | ०.२७ | ---- | |
| ५ | २१८ | कम्युनिटी हॉल | ३४पै., ३६पै. | गोडदेव | ०.२६ | २६८६.८८ | |
| ६ | २८२ | कम्युनिटी हॉल | १०९पै., १०७पै., ९२पै., १००पै. | नवघर | ०.३५ | प्रगतीपथावर | भागशः CRZ-III |
| ७ | ३४५ | कम्युनिटी हॉल | ७५पै., ७४पै., ७१पै., | पेणकरपाडा | ०.२२ | ---- | CRZ-III |
| ८ | २११ | कम्युनिटी हॉल व वाचनालय | भाईंदर - ११९पै. | भाईंदर | ०.१२ | ---- | |
| ९ | २४१ | कम्युनिटी हॉल व वाचनालय | २५पै., ७८पै., ८५पै., २६पै., | गोडदेव | ०.३२ | २२६६.५० | |

विकास योजनेतील आरक्षणाखालील जागा ताब्यात घेण्यासाठी वाटाघाटीने जमिनीचा मोबदला देवून, भूसंपादनाद्वारे व विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे जागा ताब्यात घेण्यात येवू शकतात. यापैकी जमिनीचा मोबदला देवून किंवा भूसंपादनाद्वार हस्तांतरीत करणेसाठी महानगरपालिकेची मोठी रक्कम खर्च होवू शकते. त्यामुळे विकास हक्क प्रमाणपत्रान्वये जागा ताब्यात घेणेची कार्यवाही करणेत येते. तथापी सदर विकास योजनेमधील महानगरपालिकेच्या ताब्यात मिळालेल्या जागेवर अतिक्रमण होवू नये म्हणून सदरच्या जागा विकसीत होणे अत्यंत आवश्यक आहे.

वरील कामांच्या अंदाजपत्रकाना आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS11

दि. ०७/१२/९३ प्राप्त.

मा. महाराजा गोधवारा
रजिस्टर नोंद अ.क्र. २९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७४ )** :- पेणकरपाडा सर्व्हे क्र. १७३,२५९ येथील शासकीय जागेवर नविन बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे.

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस १०० बसेस मंजूर झाल्या आहेत. सदर बसेस करीता ३५.३० कोटी तसेच डेपो व टर्मिनल विकासाकरीता रु.६.०० कोटी एवढी रक्कम मंजूर आहे. त्यापैकी ५० % रक्कम मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस बस डेपो, टर्मिनल इ. आवश्यक सुविधा प्राधान्याने करणे बंधनकारक आहे.

पेणकरपाडा येथे सर्व्हे क्र. १७३, २५९ ही शासकीय जागा असून सदर जागेची मागणी सदर जागेवर बसस्थानक तयार केल्यास दहीसर चेकनाका व राष्ट्रीय महामार्ग परिसराकरीता बस स्थानक उपलब्ध होऊन वाहतूकी साठी सुरळीत होईल. सदर ठिकाणी कुंपणभिंत आवश्यक इतर कामे करणेकरीता रु. १,२०,६०,०५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर होणारा खर्च केंद्रशासन / राज्यशासनाकडील अनुदानातूनच करावयाचा आहे. तरी सदर कामाच्या खर्चास व आवश्यक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS20

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७५ ) :-** घोडबंदर सर्व्हे क्र. २३३ येथील शासकीय जागेवर नविन बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे.

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस १०० बसेस मंजूर झाल्या आहेत. सदर बसेस करीता ३५.३० कोटी तसेच डेपो व टर्मिनल विकासाकरीता रु.६.०० कोटी एवढी रक्कम मंजूर आहे. त्यापैकी ५० % रक्कम मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस बस डेपो, टर्मिनल इ. आवश्यक सुविधा प्राधान्याने करणे बंधनकारक आहे.

घोडबंदर येथे सर्व्हे क्र. २३३ येथे शासकीय जागा उपलब्ध असून सदर जागा महानगरपालिकेस उपलब्ध होऊ शकेल. सदर जागेवर बस स्थानक तयार केल्यास बसेस उभ्या राहू शकतील तसेच वाहतूक ही सुलभ होईल. सदर ठिकाणी जागेस कुंपणभिंत बांधणे व आवश्यक इतर कामे करणेकरीता रु.९२,६५,०५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर होणारा खर्च केंद्र शासन / राज्यशासनाकडील अनुदानातूनच करावयाचा आहे. तरी सदर कामाच्या खर्चास व आवश्यक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC3/DK/2013-14/MS21

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७६ )** :- काशिमिरा सर्व्हे क्र. १२३ (२४) (जकात नाका आरक्षण) या जागेवर बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे.

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस १०० बसेस मंजूर झाल्या आहेत. सदर बसेस करीता ३५.३० कोटी तसेच डेपो व टर्मिनल विकासाकरीता रु.६.०० कोटी एवढी रक्कम मंजूर आहे. त्यापैकी ५० % रक्कम मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस बस डेपो, टर्मिनल इ. आवश्यक सुविधा प्राधान्याने करणे बंधनकारक आहे.

काशिमिरा येथे सर्व्हे क्र. १२३ (२४) १२२ (२६) ही जागा जकात नाका केंद्रासाठी व पार्कींग साठी आरक्षित असून त्यापैकी २६०० चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर जागेवर बस स्थानक तयार केल्यास बसेस उभ्या राहू शकतील व जाण्या-येण्यासाठी देखिल सुलभ होईल. सदर ठिकाणी जागेस कुंपणभिंत बांधणे व आवश्यक इतर कामे करणेकरीता रु. १,३५,४७,०५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर होणारा खर्च केंद्र शासन / राज्यशासनाकडील अनुदानातूनच करावयाचा आहे. तरी सदर कामाच्या खर्चास व आवश्यक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC3/DK/2013-14/MS22

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ७७ )** :- उत्तन सर्व्हे क्र. ६५ व २५ मध्ये असलेल्या शेडचा वापर बस कार्यशाळे साठी करण्यासाठी आवश्यक कामे करण्यास मान्यता देणे.

उत्तन येथे सर्व्हे क्र. ६५ व २५ या महानगरपालिकेच्या जागेत महानगरपालिकेची अर्धवट बांधकाम केलेली शेड असून सदर शेडचे क्षेत्रफळ १८१०.०० चौ.मीटर आहे. सदर शेडच्या प्लींथचे बांधकाम, कॉलम उभे असून फक्त लोखंडी ट्रस टाकून पत्रे बसविल्यास व आवश्यक बांधकाम केल्यास सदर शेडचा वापर सुरु करता येऊ शकेल. सदर शेडचा वापर परीवहन उपक्रमातंर्गत बसेसच्या दुरुस्तीसाठी कार्यशाळा म्हणून करता येऊ शकेल. परीवहन उपक्रमातंर्गत नव्याने मंजूर झालेल्या १०० बसेस करीता कार्यशाळा उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर कार्यशाळा वापरात येईल. सदर कामासाठी रु. १,३९,८९,०००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर खर्च केंद्र शासनाकडील अनुदानातूनच करावयाचा आहे. तरी सदर कार्यशाळा सुरु करण्यासाठी आवश्यक कामे करण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC3/DK/2013-14/MS19

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि.११ /१२/२०१३

## //गोषवारा//

**प्रकरण क्र. ७८ :- उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरिता आधुनिक पद्धतीने उद्याने विकसित करणे कामी लॅन्डस्केप आर्किटेक्ट प्लॅनरची नेमणूक करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील उद्यान व वृक्षप्राकधिकरण विभागात चेणा ते उत्तन असा एकूण ७९ चौ.की.मी. विस्तीर्ण परिसरात ०६ प्रभाग असुन त्यामध्ये एकूण ५१ उद्याने, ९ मैदाने, २ चौपाट्या, १३ स्मशाने, १५ कि.मी. लांबीचे दुभाजक विकसित करण्यात आलेले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बगीच्यासाठी आरक्षित असलेली आरक्षणे मोठ्या प्रमाणात असून त्यामधील काही आरक्षणे विकसित केलेली असून त्यातील काही आरक्षणे विकसित करणेकरिता प्रस्तावित करावयाची आहे. यास्तव पूर्व नियोजित नकाशे, आराखडे, तयार करून बगीच्या विकसित करणे आवश्यक आहे जेणेकरून भविष्यात शहरात सुंदर उद्याने विकसित होतील.

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे बगीच्यासाठी आरक्षित आरक्षणे क्रमांक ९३,१२०,१३९,१६२,२१४,२१६,२२६,२३०,२३५,२४२,२४८,२५४,२५५,२५८,२६९,३६८,३७० अशी आहेत.**

सन २०१३-१४ या वर्षाची मंजुर अंदाजपत्रकात मधील "उद्याने / दुभाजक सुशोभिकरण करणे" या शिर्षाखाली रू.१०००.०० लाख (रू. दहा कोटी फक्त) रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त आरक्षणे अधुनिक पद्धतीने विकसित करणेकामी सहा **लॅन्डस्केप आर्किटेक्ट प्लॅनर / सल्लागार** यांच्या पॅनलची तीन वर्षाकरिता नेमणूक करणेकामी मा. महासभेची मान्यता देणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

शुक्रवार प्राप्त दि. ५/१२/2013
संध्या. 5:०५

मा. महा[illegible]
नोंद रजिस्टर ७ - 39

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११ /१२ /२०१३

## ''गोषवारा''

**प्रकरण क्र. ७८ :- महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता पदनिर्मितीबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात चेणा ते उत्तन असा एकूण ७९ चौ.कि.मीटर विस्तीर्ण परिसरात ०६ प्रभाग असुन त्यामध्ये एकुण ५१ उद्याने, ९ मैदाने, २ चौपाटया, १३ स्मशाने, १५ कि.मी. लांबीचे दुभाजक असल्याने परिसरातील सर्व उद्याने, मैदाने, दुभाजक यांची देखरेख, निगा ठेवणे तसेच दैनंदिन कामे जशी उद्यानात माती टाकणे, खड्डे बुजवणे, गवत कापणे, उद्यानांतील व रस्त्याचे दुतर्फा वाढलेल्या झाडांच्या फांद्याची छाटणी करणे, मा. नगरसेवक, नागरीक व स्वंयभावी संस्था यांचे तक्रारी व सुचनेचे पालन करुन कार्यवाही करणे, मोठया प्रमाणात रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे, देखरेख/निगा राखणे आवश्यक असते. मिरा भाईंदर महानगरपालिकेत काही ठिकाणी बऱ्याचशा प्रमाणात मॅग्रोव्हज (तिवराची) झाडे आहेत व ती तोडण्याबाबत केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाने कडक नियम केलेले आहेत. विना परवानगी झाडे तोड केल्याबाबत पंचनामा करुन एफ.आय.आर.सुध्दा दाखल करणे, मा. वृक्षप्राधिकरण समिती मा.स्थायी समिती व मा.महासभेस पाठविण्याचे गोषवारे तयार करणे, केंद्रशासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्जदाराने मागितलेली माहिती मुदतीत देणे, लोकशाही दिन, जनता दरबार, केंद्रशासन व राज्यशासन यांच्याकडे पत्रव्यवहार, विधानमंडळ अधिवेशन संबंधित संपूर्ण पत्रव्यवहार उदा.तारांकित, अतारांकित प्रश्न, कपात सुचना इ.इ. वटवृक्ष दिन त्याचबरोबर ५ जुन जागतिक पर्यावरण दिन साजरा करणे, लोकांमध्ये जनजागृती करणेकरिता दरवर्षी झाडे, फळे, फुले, भाजीपाला यांचे प्रदर्शन भरविणे इ.इ. कामे उद्यान विभागामार्फत करण्यात येत असतात.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उद्यान अधिक्षक पदनामाची दोन पदे मंजूर असुन सध्यस्थितीत केवळ दोन उद्यान अधिक्षक विभागामध्ये कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त या विभागाकरीता तांत्रीक, अनुभवी कर्मचारी कार्यरत नसल्याने दैनंदिन कामकाज करणे जिकीरीचे होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका विकास आराखड्यातील विविध आरक्षित उद्याने, मैदाने उत्तम प्रकारे विकसीत करणेसाठी या विभागाकडे तांत्रिक कर्मचारी असणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेत सद्यस्थितीत सहा प्रभाग समित्या असुन हरित सुंदर मिरा भाईंदर महानगरपालिका शहराचा विकास झपाटयाने होत असुन महानगरपालिकेचा कारभार मोठया जोमाने वाढलेला आहे व भविष्यात देखील यात वाढ होणार आहे. उद्यान विभागाच्या कामात गतिमानता आणणेसाठी आढावा बैठका घेणे, कामावर नियंत्रण ठेवणे, कामाच्या आवश्यकतेनुसार पत्रक तयार करणे, वरिष्ठांची मान्यता घेणे, कार्यादेश देणे तसेच अस्तित्वातील उद्यानांची देखभाल व उद्यानांतील खेळ साहित्यांची दुरुस्ती करणे, उद्यानांतील पिण्याच्या पाण्याची सोय करणे, मातीचे परिक्षण करणे, उद्यानांतील पालापाचोळया पासुन कंपोस्ट खत तयार करणे, उद्यानांतील विद्युत विषयक कामांची दुरुस्ती व देखभाल करणे. उद्यानांची देखरेख करणे अशा प्रकारचे कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने खालील पदनिर्मिती करणे आवश्यक आहे. प्रशासकीय कामकाज पारदर्शक होण्यासाठी सध्या आवश्यक कर्मचारी वर्ग नाही, प्रशासकीय काम गतिमान व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात अधिक अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे व त्या करीता खालील पदे उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात मंजूर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रस्तावित पदे मंजुरी करिता | वेतनश्रेणी / कर्तव्य |
|---|---|---|---|
| १. | मुख्य उद्यान अधिक्षक<br>वर्ग – १ | ०१ | वेतनश्रेणी – १५६०० - ३९१००<br>ग्रेड पे - ५४००<br>**कर्तव्य** - उद्यान विभागाचे नियंत्रण व पर्यवेक्षण करणे वेगवेगळया सेवाभावी संस्थाना उद्यानात सांस्कृतिक व पर्यावरणविषयक कार्यक्रम घेण्यास मान्यता देणे. उद्यान विकासकामे आराखडा तयार करणे. तसेच उद्यान विभागाच्या कामात गतिमानता आणणेसाठी आढावा बैठका घेणे. तसेच मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ नुसार नेमुन दिलेली सर्व कर्तव्ये पार पाडणे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संवर्धन आणि संवर्धन नियम, २००९ सह शासन आदेश अधिसुचनाचे कर्तव्य पार पाडणे. |

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रस्तावित पदे मंजुरी करिता | वेतनश्रेणी / कर्तव्य |
|---|---|---|---|
| २. | उप मुख्य उद्यान अधिक्षक<br>वर्ग – २ | ०२ | **वेतनश्रेणी – ९३०० - ३४८००**<br>**ग्रेड पे – ५४००**<br>**कर्तव्य** - मुख्य उद्यान अधिक्षक यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ नुसार नेमुन दिलेली सर्व कर्तव्ये पार पाडणे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संवर्धन आणि संवर्धन नियम, २००९ सह शासन आदेश अधिसुचनाचे कर्तव्य पार पाडणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ३. | सहाय्यक उद्यान अधिक्षक<br>वर्ग – ३ | ०६ | **वेतनश्रेणी – ९३०० - ३४८००**<br>**ग्रेड पे – ४२००**<br>**कर्तव्य** - अस्तित्वातील सर्व उद्यानांची देखरेख करणे व मुख्य उद्यान अधिक्षक/उप मुख्य उद्यान अधिक्षक यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. सर्व पर्यवेक्षक यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे व कामाचे आदेश देणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ४. | कनिष्ठ अभियंता<br>वर्ग – ३ | ०१ | **वेतनश्रेणी – ९३०० - ३४८००**<br>**ग्रेड पे - ४२००**<br>**कर्तव्य** - नियंत्रणा खालील क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत येणाऱ्या उद्यानातील स्थापत्य विषयक कामांची प्रत्यक्ष जागा पाहणी करुन कामाची कार्यवाही करणे. कामाच्या आवश्यकतेनुसार पूर्वगणक पत्रक तयार करणे, वरिष्ठांची मान्यता घेणे. कार्यादेश तयार करणे. कामाचा दर्जा राखणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ५. | वरिष्ठ लिपीक<br>वर्ग – ३ | ०१ | **वेतनश्रेणी – ५२०० - २०२००**<br>**ग्रेड पे - २४००**<br>**कर्तव्य** - कार्यालयातील प्रशासकीय कामकाजात सरलेखनिक यांना सहकार्य करणे. अंदाजपत्रकाबाबतची सर्व कामे तसेच तसलमात करणे. माहिती अधिकार पत्रव्यवहार कामकाज करणे, कार्यालयातील सेवकांवर नियंत्रण ठेवणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ६. | कनिष्ठ लिपीक<br>वर्ग – ३ | ०४ | **वेतनश्रेणी – ५२०० - २०२००**<br>**ग्रेड पे - १९००**<br>**कर्तव्य** - आवक जावक बारनिशी, निविदा प्रक्रियेतील सर्व कामे, रजा प्रकरणे तयार करणे, वरिष्ठांनी नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण करणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ७. | हेड माळी<br>वर्ग - ३ | १२ | **वेतनश्रेणी – ५२०० - २०२००**<br>**ग्रेड पे - १९००**<br>**कर्तव्य** - उद्यान देखभाल/वृक्षारोपणाची संबंधित सर्व कामे करणे. |
| ८. | प्लंबर<br>वर्ग - ४ | ०२ | **वेतनश्रेणी – ५२०० - २०२००**<br>**ग्रेड पे - १९००**<br>**कर्तव्य** - उद्यानातील पाणीपुरवठ्याशी संबंधित सर्व कामे. |

वर नमुद प्रमाणे उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागास नविन पदनिर्मिती प्रस्तावास मा. महासभेची मान्यता मिळणेस विनंती आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**